

# हाकारा

वर्ष - अकरावे ः अंक - तिसरा
जुलै - सेप्टेंबर ११९०

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक

# हाकारा

## आदिवासी विश्व

अनुक्रमणिका

१) संपादकीय
२) आदिवासी जग - एक दृष्टीक्षेप : २
३) आदिवासी विकास : ८
४) उपेक्षित विश्व : १२
५) वनविनाश आणि मानव : २७
६) आंतरराष्ट्रीय मजूर संघटना आणि आदिवासी जमाती : २९
७) आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेची आचारसंहिता : ३४
८) सयुंक्त राष्ट्रसंघाचा आदिवासी लोकसंख्याविषयक कार्यगट : ४३
९) आदिवासी लोकांच्या हक्काविषयीच्या जागतिक जाहीरनाम्याचा मसुदा : ४६
१०) दलित जाती आणि आदिवासी जमाती यांच्यावर होणा-या अत्याचारांचा प्रतिबंध करण्यासाठी भारत सरकारने केलेला नवा कायदा : ४९

वर्ष - अकरावे : अंक - तिसरा
जुलै - सप्टेंबर १९९०
पत्रव्यवहाराचा पत्ता:
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध
पुणे - ४११ ००७.

संपादक
रामचंद्र मुटाटकर
संपादन सहाय्य:
ग. शां. पंडित
अभ्यागत संपादक:
शरद कुलकर्णी

प्रकाशक
रा. के. मुटाटकर
सचिव
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद,
यांच्यासाठी
दयाल अँड असोसिएट
ए - ३३, एच ब्लॉक,
एम. आय. डी. सी.
पिंपरी, पुणे - ४११ ०१८.
येथे छापून प्रसिध्द केले.
फोन ७७२७३७

'हाकारास' महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ व भारतीय सामाजिकशास्त्र अनुसंधान परिषद, पश्चिम विभागीय केंद्र, मुंबई यांजकडून अनुदान प्राप्त झाले आहे.

--------|||--------

# संपादकीय

## आदिवासी विश्वातील समस्या :

*आदिवासी कोण ? ते वनांत, डोंगर - कपारीत, द-याखो-यात कां राहतात ? विकासाच्या नावांखाली वनांचा -हास होत आहे. आदिवासी प्रदेशातील निसर्गसंपत्तिचा विनियोग राष्ट्राकरिता करावयाचा या भावनेने त्यांच्या भूभागावर कारखाने, धरणें होत आहेत आणि त्यातून आदिवासींचे विस्थापन होत आहे. आदिवासींना मूळ किंवा राष्ट्रीय प्रवाहात आणण्याच्या दृष्टीने ज्या विकासयोजना राबविल्या जात आहेत त्यामुळे त्यांची संस्कृति आणि अस्तित्व यावर आघात होत आहेत. या समस्यांचा उहापोह हाकारात वेळोवेळी झालेला आहे. परंतु त्या चर्चांचे संदर्भ भारतीय होते.*

*हाकाराच्या या आदिवासी विश्व अंकात आंतरराष्ट्रीय पातळीवर जे लिखाण झालेले आहे आणि आंतरराष्ट्रीय संस्थामध्ये आदिवासी समस्यांचे निराकरण करण्याच्या उद्देश्याने जे जाहीरनामे आणि आचारसंहिता घडविल्या गेल्या त्याचा आढावा घेण्यात आलेला आहे. सयुंक्त राष्ट्रसंघ आणि आंतरराष्ट्रीयमजूर संघटना यांनी हे मसुदे तयार केले आहेत.*

*महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे उपाध्यक्ष श्री. शरद कुलकर्णी यांनी हा अंक तयार केला आहे. त्यावरून आपण भारतात जे आदिवासींचे प्रश्न पाहतो, तेच प्रश्न आदिवासी असलेल्या विश्वातील सर्व राष्ट्रातील आदिवासींना भेडसावत आहेत हे कळते. बाहेरील लोकांची आक्रमणे होण्या अगोदर स्वतंत्र राहणारे व स्वत:ला वेगळे समजणारे ते आदिवासी, ते आजही स्वत:ला वेगळे मानतात. अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया सारख्या देशांत आक्रमकांनी वांशिक वर्चस्व आणि सांस्कृतिक वर्चस्व स्थापले. जगातआदिवासींची संख्या सुमारे २० कोटी आहे. त्यापैकी सुमारे एक तृतीयांश भारतीय उपखंडात आहेत.*

*आदिवासींवरील अत्याचारामुळे त्यांची संख्या ब-याच देशात घटली. अत्याचारामुळे त्यांच्यातील बेकारी, दारिद्रय आणि रोगराई यांचे प्रमाण वाढले. आदिवासी प्रदेशाचा विकास आणि तेथे सापडलेल्या खनिज संपत्तिचा विकास करण्याच्या उद्देश्याने वनांचा -हास होत आहे. या विकासाच्या प्रक्रियेत आदिवासींची परंपरागत उदरनिर्वाहाची साधने नष्ट होत आहेत. त्यांच्या भूमीवर आक्रमण वाढत आहे. या समस्यांचा विचार आंतरराष्ट्रीय मजूर संघटना आणि सयुंक्त राष्ट्रसंघाच्या पातळीवर झालेला आहे. आदिवासींच्या हक्काचा जाहीरनामा आदिवासी कार्यकर्त्यांनीं जरूर अभ्यासिला पाहिजे. तसेच विकासाचे कार्य करणा-यांनी विकासकार्याची काही मार्गदर्शक तत्वे 'आदिवासी लोक : ए फिल्डगाईड फॉर डेव्लपमेंट' या पुस्तकांत दिलेली आहेत, त्याचे मनन करावे.*

*हाकाराचा हा अंक वाचतांना कार्यकर्त्यांनीं आपापल्या भागात हक्काची पायमल्ली कशी होत आहे आणि आचारसंहितेचा भंग कसा होत आहे याची टिपणे तयार करावी आणि आमच्याकडे पाठवावी. आपण करीत असलेल्या कार्यास आंतरराष्ट्रीय संदर्भ आहे हे वाचकांना भासेल असा आम्हांला विश्वास आहे.*

# आदिवासी जग - एक दृष्टीक्षेप

(इंडिजिनिअस पिपल्स - अ ग्लोबल क्वेस्ट फॉर जस्टीस, अ रिपोर्ट फॉर द इंडिपेंडन्ट कमिशन ऑन इंटरनॅशनल ह्युमनटिरिअन इश्युज - लंडन, झेड बुक्स, १९८७)

## १) प्रास्ताविक -

आदिवासी जमातींचा उल्लेख वेगवेगळ्या नावांनी केला जातो. अमेरिकेत स्थानिक अमेरिकन वा रेड इंडियन या नावाने त्यांना ओळखतात तर ऑस्ट्रेलियात त्यांना अॅबओरिजन्स म्हणतात. भारतात काहीजण त्यांना गिरिजन किंवा वनवासी म्हणतात. खुद्द आदिवासींना मात्र या नावाचा तिटकारा वाटतो. त्यांच्या दृष्टीने 'इंडिजिनिअस पिपल' हे नाव योग्य आहे. ही संज्ञा आदिवासी या नावाशी जुळणारी आहे. या सर्वसामान्य नावांशिवाय विविध जमातींना त्यांच्या जमातींची स्वतंत्र नावे आहेत.

आतापर्यंत जगातील सर्व आदिवासींचा एकत्र असा विचार झाला नाही. सामाजिक शास्त्रज्ञांनी एखाद्या विशिष्ट आदिवासी जमातींचा किंवा आदिवासींची वस्ती असलेल्या विभागाचा अभ्यास केला. १९८० पर्यंत विविध आदिवासी जमातींना परस्पर ओळख फारशी नव्हती. १९८० नंतर विविध आदिवासी जमातीतील कार्यकर्ते एकत्र येऊ लागले. आदिवासी जमातींचा एकत्र अभ्यास प्रथम मानवी हक्क आयोगाच्या एका उपसमितीने नेमलेल्या खास समीक्षकांनी केला. मात्र त्यांचा हा अहवाल प्रसिध्द झाला नाही. त्यामुळे 'आदिवासी लोक - न्यायासाठी जागतिक शोध' हे या प्रकारचे पहिलेच पुस्तकआहे असे म्हणता येईल.

### पार्श्वभूमी -

या पुस्तकाच्या पहिल्या भागात आदिवासी लोक (इंडिजिनिअस पिपल) म्हणजे कोण? याची चर्चा व त्यांच्या एकंदर परिस्थितीचे वर्णन करण्यात आले आहे. आदिवासींचा अभ्यास करण्यासाठी नेमलेल्या खास समीक्षकांनी आपल्या अंतिम अहवालात दिलेली सर्वसाधारण व्याख्या पुढीलप्रमाणे आहे. 'आदिवासी जमाती वा लोक वा राष्ट्रे यांच्यावर आक्रमण होण्यापूर्वी स्वतंत्रपणे राहणारी आणि स्वतःला वेगळे मानणारे लोक होते. आजही या विभागातील वस्ती करणाऱ्या इतरांपासून ते आपल्याला वेगळे मानतात. हे लोक सध्या वर्चस्व न गाजविणाऱ्या समाजाच्या सदरात आहेत आणि त्यांचे परंपरागत विभाग आणि स्वतंत्र वांशिक अस्तित्व टिकविण्याचा निर्धार आहे. आपली संस्कृती, सामाजिकसंस्था व कायदा, न्याय पध्दती टिकवून धरण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.' या व्याख्येत युरोपात असलेल्या जिप्सींसारख्या भटक्या जमातींचा समावेश होत नाही पण शिकार व मच्छिमारी यावर प्रामुख्याने अवलंबून असणाऱ्या सामी (लॅप लँडर) आणि इनुईट (एस्किमो) यांचा समावेश होतो.

आदिवासी लोकांची प्रमुख वैशिष्ट्ये अशी -: त्यांचे अस्तित्व त्या विभागात दुसरे समाज येण्यापूर्वी होते. बाहेरुन आलेल्या लोकांनी त्यांच्या विभागात वसाहती निर्माण केल्या व त्यातून वांशिक वर्चस्व व सांस्कृतिक भिन्नता निर्माण झाली. आदिवासी लोक इतर समाजापासून आपल्याला वेगळे मानतात. वसाहती करण्याच्या प्रक्रियेत हे लोक वेगळे पडले आहेत आणि इतर समाजाच्या मानाने दुर्बल राहिलेआहेत. विकासाच्या मुख्य प्रवाहापासून ते अलग पडले आहेत. त्यांच्यापैकी कित्येकजण आजही भटके, अर्धभटके आणि स्थलांतरीत शेती करणारे आहेत.

आदिवासी लोकांचे एक मुख्य वैशिष्ट्य म्हणजे त्यांची भूमी व नैसर्गिक साधन संपत्ती विषयक एकस्वतंत्र संकल्पना होय. त्यांच्या दृष्टीने भूमि आणि नैसर्गिक साधनसंपत्ती ही एका पिढीला मिळालेली ठेव आहे. ही देणगी पूर्वीच्या पिढ्यांनी जपली असून प्रत्येक पिढीने तिचा किमान उपभोग घेऊन तिचे रक्षण केले पाहिजे व ती पुढील पिढ्यांच्या हवाली केली पाहिजे. प्रत्येक पिढी ही या देणगीची किंवा ठेवीची विश्वस्त आहे.

आदिवासी जमातींची लोकसंख्या सुमारे २० कोटी असून ती जगातील एकूण लोकसंख्येच्या

सुमारे चार टक्के आहे. आदिवासी लोकांची वस्ती विविध खंडात विविध देशात आहे. या देशात ऑस्ट्रेलिया, न्युझिलंड, कॅनडा, यु. एस्. ए., दक्षिण अमेरिकेतील विविध देश, भारत, पाकिस्तान, चीन, ब्रम्हदेश वगैरेंचा समावेश आहे. जगातील आदिवासींपैकी सुमारे एक तृतियांश जण भारतीय उपखंडात आहेत ग्वाटेमाला बोलीव्हीया यांसारख्या कांही देशात ते बहुसंख्य आहेत. या उलट ब्राझील सारख्या देशात ते अतिशय अल्पसंख्याक आहेत. भारत व चीन सारख्या देशात ते सुमारे ७ ते ९ टक्के आहेत. जगातील विविध आदिवासी जमातीत एकजिनसीपणा नाही. वेगवेगळ्या जमातींची संस्कृती वेगवेगळी आहे तसेच विविध जमाती आर्थिक विकासाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर आहेत. आजही अंदमानमधील आणि अमेझॉन खो-यामधील काही जमाती इतरांच्या संपर्कापासून दूर आहेत. या उलट अनेक आदिवासी जमातींचा बिगर आदिवासींशी निकटचा संपर्क आहे. अनेक बिगर आदिवासी लोकात आदिवासी जमातीसंबंधी गैरसमज आहेत आणि त्यांना सुसंस्कृत केले पाहिजे अशी या लोकांची धारणा आहे. वसाहत करणा-या लोकांनी अनेक देशात आदिवासींवर निघृण अत्याचार केले आहेत. दक्षिण अमेरिकेतील राष्ट्रात वसाहतींसाठी गेलेल्या स्पॅनिश लोकांच्या समजुतीप्रमाणे आदिवासींना ठार करणे हा गुन्हा नव्हता. ऑस्ट्रेलियात वसाहतीसाठी गेलेल्या ब्रिटिश लोकांत आदिवासींची शिकार करणा-या सहली काढण्याची पध्दत होती.

## सुधारणेचे बळी -

ज्यावेळी इतिहासकार अमेरिका किंवा ऑस्ट्रेलियाचा शोध लावला असे म्हणतात. त्यावेळी या विभागात अनेक आदिवासींची वस्ती होती आणि तेथे जाणा-या तथाकथित प्रगत लोकांनी आदिवासींचा मोठ्या प्रमाणावर संहार केला ही गोष्ट ते डोळ्याआड करतात. या विभागात आदिवासींची राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक समाजपध्दती होती आणि तिचा बाहेरुन आलेल्या लोकांनी नाश केला. अमेरिकेत आदिवासींना पकडून त्यांचा लिलाव केला जात असे. अनेक जमातींना त्यांची वस्ती असलेल्या विभागातून हुसकावून लावण्यात आले. ऑस्ट्रेलियातील टास्मानिया विभागात आदिवासींची शिकार करणे हा एक रविवारचा आवडता खेळ होता. ऑस्ट्रेलियात बाहेरचे लोक गेले तेव्हा तेथील आदिवासींची लोकसंख्या सुमारे तीन लाख होती त्यानंतर एका शतकानंतर ती सुमारे साठ हजारांवर आली. अशा प्रकारचे वांशिक हत्याकांड युरोपियन लोक गेलेल्या अनेक देशात घडले. काही ठिकाणी आदिवासींच्या जमिनी बळकावून त्यांना विस्थापित केले गेले. या सर्व अत्याचारांची माहिती काही प्रमाणात उपलब्ध आहे. (ऑस्ट्रेलियातील न्यू साऊथ वेल्स प्रांतात आदिवासींच्यावर झालेल्या अत्याचाराचे वर्णन न्यू साऊथवेल्सच्या आदिवासी मंत्रालयाने प्रसिध्द केलेल्या 'सर्व्हायव्हल' या पुस्तकात सविस्तरपणे पाहायला मिळते.)

काही देशात विशेषत: कॅनडा व न्यूझीलंडमध्ये स्थानिक आदिवासी जमातीशी बाहेरील लोकांनी काही करार केले. परंतु हे करार नंतर पायदळी तुडविण्यात आले. आजच्या आदिवासींच्या दु:स्थितीचे मूळत्यांच्यावर झालेल्या या अत्याचारात आहेत. अनेक देशात आदिवासी लोकातील बेकारी, दारिद्र्य, रोगराई यांचे प्रमाण बिगर आदिवासींपेक्षा अधिक आहे. बालमृत्यूचे प्रमाणही अधिक असून अनेक आदिवासी बांधील गडी आहेत.

आदिवासीतील शिक्षणाचे प्रमाणही अतिशय कमी आहे आणि त्याची मुख्य कारणे सरकारची अनास्था, परकी भाषा आणि परकीय आशय वगैरे आहेत. काही देशात आदिवासींना आर्थिक मदत करुन, दवाखाने चालवून त्यांचे धर्मांतर करण्याचा प्रयत्न केला जातो.

काही देशातील राज्यघटनात आणि कायदे-कानुनात विशेष सवलती देण्याचे प्रयत्न करण्यात आले आहेत. भारतात आदिवासींसाठी संसदेत विधीमंडळात सरकारी सेवेत आणि उच्च शिक्षण देणा-या संस्थेत राखीव जागा आहेत. अशा सवलतींचा आदिवासींना काही प्रमाणात फायदा झाला आहे. मात्र बहुतेक सर्व देशात आदिवासींना भेदभावाची वागणूक मिळते आणि त्यांना बिगर आदिवासींकडून वाईट वागविले जाते, असा अनुभव आहे. एकंदरीत आदिवासी जमातीत सुधारणा व विकास यांचे लाभधारक न ठरता बळी ठरत

आहेत. याविषयी जनमत जागृत करण्याची आवश्यकता आहे.

**आक्रमण -**

काही वर्षापूर्वी आदिवासी जमातींची वस्ती असलेले भूभाग अविकसित मानले जात. बिगर आदिवासींची वस्ती वाढल्यामुळे वनोत्पादनाची मागणी वाढल्यामुळे आणि या भूभागात खनिज संपत्तीचे साठे आढळून आल्यामुळे त्यांच्याकडे शासनाचे लक्ष वळले आहे. बहुराष्ट्रीय कंपन्या या भूभागात खाणी सुरु करीत आहेत. अनेक ठिकाणी पशुपैदास केंद्रे सुरु करण्यात आली आहेत. कागदासाठी कच्चा माल म्हणून मोठ्या प्रमाणात वृक्षतोड सुरु झाली आहे. या सर्व गोष्टींमुळे आदिवासींच्या भूभागावर व एकूण अस्तित्वावरच गदा आली आहे. अनेक देशात बिगर आदिवासींनी आदिवासी विभागातील जमीन बळकावून तेथे शेती सुरु केली आहे. बांगला देश व इंडोनेशिया यामधील सरकारांनी बिगर आदिवासींना लोकसंख्येची घनता कमी असलेल्या आदिवासी विभागात स्थलांतर करण्यास प्रोत्साहन देणे सुरू केले आहे. त्यासाठी खास योजना बनविण्यात आल्या आहेत. या आक्रमणाविरुध्द या दोन्ही देशात आदिवासींनी प्रतिकार करण्यास सुरुवात केली आहे. अशीच प्रक्रिया इतर देशातही सुरु झाली आहे.

**आकांक्षा आणि चळवळी -**

बहुसंख्य ठिकाणी आदिवासी जमाती बिगर आदिवासींच्या वर्चस्वाखाली आहेत. देशातील परिस्थितीत व आदिवासींच्या परिस्थितीत विविध देशांत बरीच भिन्नता आहे. त्यामुळे विविध देशांतील आदिवासींच्या समस्या काहीशा भिन्न आहेत. विविध देशातील सरकारांच्या आदिवासींच्या धोरणातही भिन्नता आहे. आदिवासीं नेत्यांच्या आकांक्षा देखील परिस्थितीनुसार भिन्न आहेत. असे असून देखील आदिवासींचा आंतरराष्ट्रीय पातळीवर एक दबाव गट निर्माण करण्याचे प्रयत्न होत आहेत. आदिवासींच्या समस्यांचा अभ्यास करणारे आणि त्याविषयी जनजागरण करणा-या काही संस्था युरोप अमेरिकेत कार्यरत आहेत.

आपल्या मागण्यांसाठी आदिवासी जमातींनी विविध प्रकारचे संघर्ष चालविले आहेत. काही देशात कोर्ट-कचे-यांचा अवलंब करण्यात येत आहे. तर अनेक ठिकाणी निदर्शने व सविनय कायदेभंग यांचा अवलंब केला जात आहे. काही देशात तर सशस्त्र संघर्षही सुरु केला आहे. आदिवासींच्या मागण्या मुख्यत: दोन प्रकारच्या आहेत. पहिली मागणी स्वयंनिर्णयाची, राजकीय स्वरुपाची आहे. दुसरी मागणी मुख्यत्वेकरुन जमिनीवरील हक्क, रोजगार, शिक्षण यामधील वाटा अशी आर्थिक व सांस्कृतीक स्वरुपाची आहे.

स्वयंनिर्णयाचा अधिकार म्हणजे निश्चित काय? याविषयी विविध जमातीत मतभेद आहेत. स्वयं निर्णयाचा हक्क म्हणजे 'स्वतंत्र राष्ट्र' असे काही आदिवासी नेते मानतात, तर स्वयं निर्णय म्हणजे 'आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक विकासात देशातील इतर समाजाबरोबर योग्य स्थान' असे काही जण मानतात. मात्र बहुतेक आदिवासी लोकांना विकासाच्या प्रक्रियेतील आपली संस्कृती व वेगळे अस्तित्व टिकून राहावे असे वाटते. आपल्या भाषा, आपल्या चालीरीती, आपली कुटुंबपध्दती यात सरकारने व इतर समाजांनी ढवळाढवळ करु नये. असेच बहुसंख्य आदिवासींना वाटते. विकासाच्या प्रक्रियेत आदिवासी समाजाच्या अस्तित्वावरच घाला पडत आहे याची जाणीव बहुसंख्य आदिवासी नेत्यांना झाली आहे.

**समस्या -**

जगातील बहुसंख्य आदिवासी जमातींसमोर काही समान समस्या उभ्या आहेत असे दिसते. यातील प्रमुख समस्या पुढे दिल्याप्रमाणे आहेत -

१) खाणकाम - आदिवासी वस्ती असलेल्या विभागात विविध प्रकारची खनिज संपत्ती असल्याचा सुगावा आता लागला आहे. ही खनिजे बाहेर काढण्यासाठी मोठमोठ्या कंपन्यांनी खाणी सुरु केल्या आहेत आणि त्यासाठी मोठ्या प्रमाणावर कामगार वर्ग या विभागात हलविला आहे. त्यामुळे अनेक आदिवासी जमातींना विस्थापित व्हावे लागले आहे. त्याचबरोबर अशा बाहेरील लोकांच्या

संपर्कात आल्यामुळे आदिवासी समाजात वेगवेगळे रोग पसरु लागले आहेत.

२) धरणे - सिंचनासाठी आणि विद्युत निर्मितीसाठी विविध देशातील आदिवासी विभागात मोठ मोठी धरणे बांधली जात आहेत त्यामुळे श्रीलंका, भारत, फिलिपाईन्स इत्यादी अनेक देशातील लक्षावधी आदिवासींना विस्थापित होण्याची वेळ आली आहे. या धरणांविरुध्द अनेक देशात आदिवासींनी आणि पर्यावरणवाद्यांनी संघर्ष सुरु केले आहेत. विस्थापित आदिवासींच्या पुनर्वसनाच्या योजना कागदावरच राहतात असा आजवरचा अनुभव आहे.

३) जंगले - बहुसंख्य आदिवासी दाट जंगले असलेल्या प्रदेशात राहतात. या जंगलापासून त्यांना जळण, फळे, कंदमुळे, शेती व घरबांधणीसाठी लागणारे लाकूड, जनावरांसाठी लागणारा चारा तसेच खाण्यासाठी लहान लहान पशुपक्षी मिळतात. आदिवासी संस्कृती जंगलाशी निगडीत आहे.वाढत्या वनोत्पादनांची विशेषत: लाकडाची मागणी पुरविण्यासाठी अनेक सरकारांनी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड सुरु केली आहे. त्यामुळे आदिवासींचे अस्तित्वच धोक्यात येत आहे. १९५० ते १९८५ या काळात जगातील सुमारे ५० टक्के जंगलांचा नाश झाला असा अंदाज आहे. या विनाशाला व्यापारासाठी शासनाने व खासगी कंपन्यानी केलेल्या वृक्षतोडीबरोबर बिगर आदिवासींचे जंगल जमिनीवर लागवडीसाठी आक्रमण हेही एक कारण आहे.

४) स्थलांतराच्या सरकारी योजना - सर्वसाधारणपणे आदिवासी प्रदेशातील लोकसंख्येची घनता देशातील इतर भागातील घनतेपेक्षा कमी असते ही विषमता दूर करण्यासाठी तसेच काही भागातील भूमीवरील लोकसंख्येचा दाब कमी करण्यासाठी अनेक सरकारे बिगर आदिवासींना आदिवासी विभागात स्थलांतरीत करण्याच्या योजना आखीत आहेत. अशा प्रकारचे प्रयत्न बांगला देश, ब्राझील, इंडोनेशिया वगैरे देशात केले जात आहेत. इंडोनेशियातील या कार्यक्रमाला तर जागतिक बँकेचे आर्थिक सहाय्य मिळालेले आहे. स्थलांतरातून अनेक ठिकाणी आदिवासी व बिगर आदिवासी असे संघर्ष निर्माण झाले आहेत. अशा स्थलांतरामुळे स्थानिक आदिवासींचे अस्तित्व धोक्यात आले आहे.

५) लष्करीकरण - दुस-या महायुध्दापूर्वी आदिवासी जमातींची वस्ती असलेले विभाग महत्त्वाचे मानले जात नव्हते. दुस-या महायुध्दानंतर बड्या राष्ट्रांची स्पर्धा सुरु झाली आणि ठिकठिकाणी सैन्य व अण्वस्त्रे विखरुन ठेवण्याची स्पर्धा सुरु झाली. त्याबरोबर आतापर्यंत दुर्लक्षित ठिकाणांना एकदम महत्त्व प्राप्त झाले आणि ती ठिकाणे आपल्या वर्चस्वाखाली ठेवण्याचा प्रयत्न सुरु झाला. अनेक ठिकाणी अण्वस्त्रांची चाचणी प्रयोग झाले. उत्तर कॅनडात एस्किमो राहत असलेल्या प्रदेशात अमेरिकेने अनेक चाचणी केंद्रे स्थापन केली आहेत. पॅसिफिक विभागात १९६४ पासून आत्तापर्यंत अण्वस्त्रांच्या दोनशेहून अधिक वेळा चाचण्या घेण्यात आल्या आहेत. याचे विपरित परिणाम आदिवासी जीवनावर झाले आहेत.

६) वंशहत्त्या - युनोच्या व्याख्येप्रमाणे कोणत्याही राष्ट्रीय, सांस्कृतिक, वांशिक किंवा धार्मिक गटाचा पूर्ण किंवा अंशिक नाश करण्याचा प्रयत्न करणारे कोणतेही कृत्य होय. संस्कृती विच्छेद म्हणजे कोणत्याही सांस्कृतिक गटाला त्यांची संस्कृती व भाषा वापरण्यास प्रतिबंध करणारी गोष्ट होय. आदिवासींच्या वाट्याला वंश विच्छेद आणि संस्कृती विच्छेद या दोन्ही गोष्टी येत आहेत. ब्रह्मदेश, बांगलादेश व इतरही काही देशात आदिवासींची पध्दतशीर हत्या होत असल्याच्या बातम्या आहेत. अनेक राष्ट्रात आदिवासी संस्कृती, भाषा यांचा वापर करण्यापासून आदिवासींना परावृत्त करण्याचे प्रयत्न होत आहे. असे प्रयत्न ब्राझील, ग्वाटेमाला, इक्वेडोर या सारख्या दक्षिण अमेरिकेतील देशांत आदिवासींच्या अनुभवास येत आहेत.

**आदिवासींच्या संरक्षणाचे व विकासाचे प्रयत्न -**

अनेक देशात आदिवासींची संस्कृती व भाषा कमी प्रतीच्या मानल्या जाऊन त्या बदलण्याचे प्रयत्न होत आहेत. आदिवासींच्या जमीनी बिगर आदिवासी बळकावीत आहेत. अनेक प्रकल्पामुळे ते विस्थापित केले जात आहेत. एकंदरीत त्यांच्या अस्तित्वालाच धोका निर्माण

झाला आहे. या विरुध्द विविध देशातील सरकारांनी खास उपाय योजना करणे आवश्यक आहे. त्यासाठी आदिवासींच्या जमिनींचे हस्तांतरण होणार नाही, त्यांच्या विभागात बिगर आदिवासींचे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होणार नाही यासाठी खास कायदे केले पाहिजेत. तसेच आदिवासींच्या विकासाच्या योजना आखतांना त्यांच्याशी विचार विनिमय करुनच त्या आखल्या पाहिजेत.

भारत, ब्राझील, निकारग्वा या सारख्या देशात आदिवासींच्या रक्षणासाठी व विकासासाठी खास कायदे व योजना आहेत. मात्र अनेकदा त्यांची अंमलबजावणी व्यवस्थित होत नाही असा अनुभव आहे. त्यामुळे आदिवासीत असंतोष निर्माण होत असून आदिवासी व बिगर आदिवासी यात संघर्ष सुरु झाले आहेत. या संघर्षाची व त्यामागील कारणांची दखल सरकारांनी घेतली पाहिजे. अनेक ठिकाणी बहुद्देशिय कंपन्या आदिवासी विभागात वृक्षतोड, खाणी, रस्तेबांधणी यासारखे प्रकल्प चालवीत आहेत. अशा कंपन्यांच्या कामकाजावर काही निर्बंध लादण्याची आवश्यकता आहे.

### आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रयत्न -

(१) जागतिक बँक - विकसनशील राष्ट्रातील अनेक मोठ्या प्रकल्पांना जागतिक बँक आर्थिक मदत देते. अशी मदत देताना प्रकल्पापासून मिळणारे फायदे प्रामुख्याने बँक लक्षात घेत असे. या प्रकल्पामुळे अनेक ठिकाणी आदिवासी समाजावर विपरीत परिणाम होत आहेत. असा ओरडा झाल्यानंतर बँकेने याविषयी आपले धोरण काय राहील हे मे, १९८२ मध्ये प्रसिध्द केले. त्यानंतर बँक अशा प्रकल्पात विस्थापित होणाऱ्या आदिवासींच्या पुनर्वसनाची योजना हा या प्रकल्पाचा एक भाग असला पाहिजे अशी खबरदारी घ्यावी लागेल. तरी पण या विषयी नर्मदा प्रकल्पग्रस्त आदिवासींच्या व इतर प्रकल्पग्रस्त आदिवासींच्याही तक्रारी आहेत.

(२) युनो - युनोच्या मानवी हक्क व मूलभूत स्वातंत्र्ये या जाहिरनाम्यात सरकारांनी वंश, लिंग, भाषा किंवा धर्म यात भेदाभेद न करता सर्व लोकांना मूलभूत मानवी हक्क व स्वातंत्र्ये उपभोगण्यास मिळाली पाहिजेत असे नमूद केले आहे. त्याची अंमलबजावणी पाहण्यासाठी मानवी हक्क आयोग स्थापन करण्यात आला आहे. या आयोगाने अनेक उप-आयोगही निर्माण केले आहेत. यापैकी अल्पसंख्याकांचे रक्षण व त्यांच्या बाबतीतील भेदाभेदाला प्रतिबंध करण्यासाठी निर्माण झालेल्याआयोगाने १९७१ मध्ये श्री. मार्टिनो कोबो यांची आदिवासी जमातींच्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठीखास समीक्षक म्हणून नेमणूक केली. या समीक्षा गटांनी दीर्घकाळ अभ्यास करुन आपल्या अभ्यासाचे ५ खंड प्रसिध्द केले आहेत. सध्या अस्तित्वात असलेले आंतरराष्ट्रीय जाहिरनामे वनिवाडे आदिवासींच्या संरक्षणासाठी अपुरे आहेत असा निष्कर्ष त्यातून निघाला आहे.

या अहवालाची दखल घेऊन उप-आयोगाने १९८२ मध्ये आदिवासी समाजाविषयी एक कार्यगट (वर्कींगग्रुप) स्थापन केला. या गटाला आदिवासी जमातींना मूलभूत मानवी हक्क व स्वातंत्र्ये उपभोगता यावी यासाठी नियम बनविण्यास सांगण्यात आले आहेत. या गटाची बैठक प्रत्येक वर्षी ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यात जिनीव्हा येथे होते. या बैठकीस विविध देशातून आदिवासी व बिगर आदिवासी समाजात काम करणारे कार्यकर्ते उपस्थित राहतात आणि आपापल्या देशातील परिस्थितीचे वर्णन करतात. विविध सरकारांचे प्रतिनिधीही या बैठकीत भाग घेतात. या कार्यगटामुळे विविध देशातील आदिवासी कार्यकर्त्यांना एकत्र येण्याची संधी मिळाली असून एक आदिवासी आंतरराष्ट्रीय व्यासपीठ तयार होत आहे.

### आंतरराष्ट्रीय मजूर संघटना -

विविध प्रकारच्या आंतरराष्ट्रीय संघटनात प्रथम लक्ष देणारी आंतरराष्ट्रीय मजूर संघटना आहे. या संघटनेने आदिवासी समाजातील मजुरांवर काही अभ्यास १९२१ मध्ये प्रसिध्द केले. त्यानंतर अशा मजुरांच्या संरक्षणासाठी १९२६ मध्ये एक तज्ञगट नेमला. १९५३ मध्ये आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेने आदिवासी लोकांच्या परिस्थितीवर एक विस्तृत अभ्यास प्रसिध्द केला. ५ जून १९५७ मध्ये

आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेने आदिवासी जमातींचे संरक्षण आणि एकरुपता (इंटिग्रेशन) या विषयी एक आचारसंहिता (कन्व्हेन्शन १०७ / १९५७) स्वीकारली. आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेची आचारसंहिता कोणत्याही देशाने स्वीकारल्यानंतर त्या तेथे लागू होतात. १९५७ मधील आदिवासी विषयक आचारसंहिता फक्त १४ देशातील सरकारांनी स्वीकारली. त्यामध्ये भारताचा समावेश होतो. ही आचारसंहिता बनवितांना त्यात आदिवासीत काम करणा-या कार्यकर्त्यांचा काहीही सहभाग नव्हता. या आचारसंहितेचा भर आदिवासी समाज देशातील इतर समाजाशी एकरुप व्हावे यावर होता. ही गोष्ट अनेक आदिवासी जमातींना मंजूर नव्हती. १९८३ पासून आदिवासी कार्यकर्ते एकत्र आल्यानंतर या आचार संहितेतील दोषांची चर्चा सुरु झाली. आचारसंहिता सुधारली पाहिजे अशी मागणी पुढे आली. ही मागणी मान्य करुन आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेने एक तज्ञांची बैठक घेतली. त्यानंतर सुधारीत आचारसंहितेचा एक मसुदा प्रसिध्द केला. त्यावर सरकारे, मालक व मजूर यांच्या प्रतिनिधींची मते मागविण्यात आली. १९८८ मध्ये जिनीव्हा येथे भरलेल्या ७५ व्या आंतरराष्ट्रीय मजूर परिषदेच्या आचारसंहितेवर चर्चा झाली. त्यानंतर पुन्हा ७६ व्या मजूर परिषदेत चर्चा होऊन सुधारित आचारसंहिता जून १९८९ मध्ये स्वीकारण्यात आली (कन्व्हेन्शन १०९ / १९८९). ही आचारसंहिता सरकारांनी मान्य केल्यावर त्या त्या देशांना लागू होईल.

लेखाच्या सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे आधी वर्णन केलेले सर्व विचार व माहिती देणारे 'इंडिजिनअस पिपल्स अ ग्लोबल क्वेस्ट फॉर जस्टीस' हे पहिलेच पुस्तक आहे. पुस्तक प्रसिध्द झाल्यानंतर सुधारित आदिवासी आचारसंहिता स्वीकारण्यात आली. युनोच्या आदिवासी गटाच्या कामातही बरीच प्रगती झाली. जागतिक पातळीवर आदिवासी संस्कृतीची आणि समस्यांचा अभ्यास करणारी काही पुस्तकेही प्रसिध्द झाली आहेत. आदिवासी समाजात कार्य करणा-या कार्यकर्त्यांच्या दृष्टीने ही सर्व पुस्तके उपयुक्त आहेत. त्या दृष्टीने हे पहिले पुस्तक सर्व कार्यकर्त्यांनी व अभ्यासकाने जरूर अभ्यासले पाहिजे.

पान ११ वरून

एक गट करीत आहे. अशा कामांना सहाय्य करणे आवश्यक आहे.

मार्गदर्शिकेचा वापर करतांना अनेक बाबतीत भारतातील आदिवासींची परिस्थिती अमेरिका, ऑस्ट्रेलियातील आदिवासींपेक्षा वेगळी आहे याचे भान ठेवले पाहिजे. वरील गोष्टी लक्षात धरून आदिवासीत काम करणा-या कार्यकर्त्यांनी आपले कार्य चालविले पाहिजे. अशा कार्याची योजना आखतांना व त्यांची अंमलबजावणी करतांना या पुस्तकातील अनेक सूचना अतिशय उपयुक्त आहेत.

# आदिवासी विकास

(आदिवासी लोक : अ फिल्डगाई फॉर डेव्हलपमेंट, लेखक - जॉन ब्युओकुर्क अँड जेरेमी नारबी उईथ जॅनेट टॉउनसेंड, ऑक्सफोर्ड, ऑक्सफाम, १९८८, पृष्ठे १२१)

**प्रास्ताविक-**

विविध देशात आदिवासी जमाती विखुरलेल्या आहेत. अशा जमातीत जाणीवजागृती. संघटना आणि आर्थिक विकासाचे कार्य करणाऱ्या अनेक संस्था व गट आहेत. या जमातीत आर्थिक विकासाचे प्रकल्प तयार करताना व त्यांची अंमलबजावणी करताना या जमातींची वैशिष्ट्ये लक्षात घ्यावी लागतात. ही वैशिष्ट्ये विविध जमातीत भिन्न भिन्न आढळतात. तरी देखील या सर्व जमातीत काही समान वैशिष्ट्ये आढळतात.

वर नमूद केलेल्या पुस्तकात या जमातीत विकास कार्य करणा-या संस्थांना हे कार्य करण्यासाठी काही मार्गदर्शक तत्वे सांगितली आहेत. पुस्तकाचे दोन विभाग आहेत. पहिल्या विभागात आदिवासी जमातींची वैशिष्ट्ये, या जमातींच्या व्यवहारात होणारी बाहेरुन येणारी स्थित्यंतरे आणि विकास कार्याच्या यशासाठी आवश्यक त्या शर्ती यांचे विष्लेषण करण्यात आले आहे. दुस-या भागात या जमातींच्या विकासासाठी स्वयंसेवी संस्थानी कोणती पथ्ये पाळली पाहिजेत आणि कोणते कार्य केले पाहिजे या विषयी विश्लेषण आहे.

**आदिवासी लोक -**

विविध देशात आदिवासी जमातींना वेगवेगळ्या नावांनी संबोधले जाते. सर्व जमातींची नावे वेगवेगळी आहेत. मात्र आंतरराष्ट्रीय स्तरावर या जमातींच्या सर्व लोकांचा उल्लेख इंडिजिनअस पिपल्स म्हणजेच आदिवासी असाच केला जातो. अनेक देशात आदिवासींचा समावेश त्या देशातील अल्पसंख्यांकात आहे. अनेक देशात त्यांच्या अनुभवाला पक्षपात, शोषण आणि जुलूम - जबरदस्ती अनुभवाला येते. काही देशात तर या जमाती किंवा त्यांची संस्कृती नष्ट करण्याचे प्रयत्न होत आहेत. आजमितीस जगातील आदिवासींची संख्या सुमारे वीस कोटी असून ती एकूण लोकसंख्येच्या सुमारे ४ टक्के आहे आदिवासी जमाती वेगवेगळ्या देशात वेगवेगळ्या परिस्थितीत आहेत. काही थोड्या विभागात अजूनही या जमातींच्या निर्वाहाची साधने शिकार, मच्छिमारी आणि वन उत्पादनाचे एकत्रिकरण आणि वापरणे हेच आहे. काही जमाती पशुपालन करणा-या भटक्या जमाती आहेत. काही जमाती शेती करतात तर काहीजमाती देशातील इतर लोकांप्रमाणे विविध प्रकारच्या कामात गुंतलेल्या आहेत.

सर्वसाधारणपणे अनेक आदिवासी जमातींची अर्थव्यवस्था त्यांच्या भोवतालच्या नैसर्गिक साधनसंपत्तीशी अनुरुप अशी आहे. अनेक जमातीत भूमी जमातीच्या मालकीची असून वैयक्तिक मालकीची पध्दत नाही. अनेक जमातीत संपत्तीवर समान मालकी आहे. आणि संपत्तीच्या वैयक्तिक संचयाला विरोध करणा-या चालीरीती आहेत. आदिवासी जमातींचे संघटन देखील रक्तसंबंधांवर अवलंबून आहे. इतर जमातींशी संबंध आल्याबरोबर हे संघटन शिथिल होत आहे.

आज बहुसंख्य राष्ट्रात तांत्रिक विकासाची व उत्पादन वाढविण्याची जबरदस्त आकांक्षा निर्माण झाली आहे. त्यामुळे आत्तापर्यंत कमी महत्वाची गणली जाणारी आदिवासी भागातील नैसर्गिक साधन संपत्ती ही महत्वाची ठरत आहे. अनेक आदिवासी भागात खनिज-संपत्ती असल्याचे शोध लागले आहेत. आदिवासी भागात लोकसंख्येची घनता कमी असल्यामुळे तेथे अधिक घनता असलेल्या विभागातून लोकांना हलविले जात आहे. आदिवासी भागात सिंचन आणि विद्युत प्रकल्प निर्माण होत आहेत. वनसंपत्तीचे शोषण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर रस्ते बांधणी होत आहे. या सर्व गोष्टींमुळेबिगर आदिवासी लोक आदिवासी भागात स्थलांतर करीत आहेत तर आदिवासी विस्थापित होत आहेत. यापुढे आदिवासी लोक इतर लोकांपासून अलग राहणे शक्य नाही. आदिवासी व बिगर आदिवासी यांचा संपर्क वाढत जाणारा आहे. आदिवासींच्या नैसर्गिक साधनसंपत्तीच्या वापरावर गदा येणार आहे. हे

सर्व बदल होत असताना आदिवासी समाज नष्ट होणार नाही आणि त्यांच्या अस्तित्वाला धोका निर्माण होणार नाही हे पाहणे आवश्यक आहे. यासाठी प्रत्यक्षात काय करावे लागेल याची सरळ-धोपट उत्तरे देणे अशक्य आहे आणि हे प्रश्न प्रत्येक वेळेची परिस्थिती लक्षात घेऊनच सोडवावे लागतील.

विविध राष्ट्रांची आदिवासींच्या बाबतीतील नीती वेगवेगळी आहे. काही सरकारांना आदिवासींनी मुख्य प्रवाहाशी एकरुप व्हावे असे वाटते. अशा राष्ट्रात आदिवासींच्या मानवी हक्कांवर अमानुष हल्ले केले जात आहेत. काही राष्ट्रात आदिवासीं जमातींना संरक्षण देण्याचे प्रयत्न होत आहेत. बहुसंख्य देशात आदिवासींची सामाजिक आर्थिक स्थिती वाईट असून त्यांचा समावेश त्या देशातील दुर्बल घटकात होतो. ही परिस्थिती बदलण्यासाठी आदिवासींना नवीन संघटना पध्दती व कौशल्ये आत्मसात करावी लागतील. परंपरागत पध्दती आणि कौशल्ये सोडून नवी पध्दती व कौशल्ये आत्मसात करण्याची प्रक्रिया दीर्घकलीन आणि त्रासदायक आहे परंतु ती आत्मसात न करण्याचे प्रयत्न विनाशकारी आहेत.

विघातक हस्तक्षेप -

राष्ट्रीय समाजाच्या संपर्कामुळे आणि सरकारी धोरणामुळे अनेकदा आदिवासी लोकांच्या नैसर्गिक साधनसंपत्तीच्या वापरावर विपरीत परिणाम होतात आणि त्यांचे अस्तित्व व भवितव्य धोक्यात येते. वास्तविक विकासाच्या प्रक्रियेत त्यांचे भवितव्य सुधारले पाहिजे देशातील इतर समाजाशी त्यांचे संबंध सुधारले पाहिजे. अनेक सरकारांची काही धोरणे आदिवासींची साधनसंपत्ती हिरावून घेण्याला कारणीभूत ठरतात. नवल म्हणजे हे सर्व विकास कार्ये राष्ट्रीय हिताच्या नावाखाली चालते. प्रत्यक्षात त्याचा फायदा मूठभर उच्चभ्रूनांच होतो. आदिवासींच्या प्रश्नाविषयी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर बरीच जागृती निर्माण झाली असल्याने काही राष्ट्रांच्या आदिवासींच्या विरुध्दच्या धोरणाला विरोध होत आहे. आज जागतिक स्तरावर आदिवासींना विस्थापित करणा-या मोठ्या प्रकल्पांविरुध्द आवाज उठविला जात आहे. त्याचा परिणाम म्हणून ब्राझील सरकारला आपला एक प्रचंड धरण प्रकल्प सोडून द्यावा लागला आहे. इंडोनेशियाच्या बिगर आदिवासींचे आदिवासी विभागात स्थलांतर करण्याच्या प्रकल्पाला अर्थसहाय्य देणे जागतिक बँकेला थांबवावे लागले आहे. मात्र अजूनही अनेक राष्ट्रे जबरदस्तीने आदिवासींना मुख्य प्रवाहात सामील करुन घेण्यासाठी प्रयत्न करु लागले आहेत. या राष्ट्रांना आदिवासी विभागातील साधन संपत्तीचा विकासासाठी वापर करावयाचा आहे. या प्रक्रियेत आदिवासी जीवनात हस्तक्षेप होत असून त्याचे दुष्परिणाम ठिकठिकाणी आढळून येत आहेत. अनेक आदिवासी विभागांची वेगवेगळया राष्ट्रात विभाजन झाले आहे. त्यामुळे आदिवासी जमातीला आपले भाईबंद दुस-या राष्ट्राच्या प्रदेशात गेलेले आढळून येतात आणि परस्पर व्यवहारात अडथळे येतात. अनेक राष्ट्रात आदिवासींच्या वाटयाला एकप्रकारचा वसाहतवाद येत आहे. स्थलांतरीत शेती आणि पशुपालन यावर मर्यादा घातल्या जात आहेत. आदिवासींच्या जमिनींचे मोठया प्रमाणावर हस्तांतरण होत आहे. अनेक राष्ट्रात आदिवासींचे अस्तित्वच धोक्यात आले असून ठिकठिकाणी संघर्ष निर्माण झालेआहेत. अशा परिस्थितीत आदिवासी समाजात कार्य करणा-या स्वयंसेवी संस्थांनी जागरुक राहाणे आवश्यक आहे.

मात्र अशा स्वयंसेवी संस्थांनी आपले धोरण अतिशय काळजीपूर्वक आखणे आवश्यक आहे. काही स्वयंसेवी संस्था आपली राजकीय विचारसरणी आदिवासींवर लादताना दिसतात तर काही संस्था धर्मप्रसाराचे कार्य करताना दिसतात. या दोन्हीमुळे आदिवासींची संस्कृती व समाजसंघटन यावर आघात होतात. काही संस्था लोकांना वस्तु व सेवा यांचा पुरवठा करुन एक प्रकारचे परावलंबन निर्माण करतात. काही संस्था आदिवासी व बिगर आदिवासी यामधले मध्यस्थ बनण्याचा प्रयत्न करतात. आदिवासींच्या व्यवहारात हस्तक्षेप करण्यापूर्वी स्वयंसेवी संस्थानी त्यांच्या गरजा व दृष्टीकोन यांचा विचार करणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांना आपले कार्यक्रम लवचिक ठेवावे लागतील आणि वेळोवेळी त्यात बदल करण्याची तयारी ठेवावी लागेल. आपल्या कार्यक्रमांमुळे आदिवासींची प्रगती

होते किंवा नाही हे वेळोवेळी पारखून घ्यावे लागेल.

**यशाच्या पूर्वशर्ती-**

आदिवासींचा विकास म्हणजे त्यांना त्यांच्या जीवनावर परिणाम करणा-या गोष्टी ठरविण्याचा जास्तीतजास्त अधिकार मिळवून देणे. आज आदिवासीं विषयी अनेक कार्यक्रम त्यांची संस्कृती व विचार लक्षात न घेता आखले जातात. कित्येकदा अशा कार्यक्रमांचा हेतू त्यांनी बिगर आदिवासींची संस्कृती आत्मसात करावी असा असतो. संस्कारांच्या नावाखाली आदिवासींना त्यांच्या सर्व चालीरीती अनिष्ट आहेत असे सांगितले जाते. अशा सर्व कार्यक्रमांना विरोध करण्याची शक्ती आदिवासी समाजात निर्माण झाली पाहिजे. आदिवासींच्या विकासाचे कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी काही शर्ती पाळणे आवश्यक आहे.

आदिवासींचे संघटन करुन त्यांना शासनव्यवस्थेत प्रतिनिधीत्व मिळेल यावर भर दिला पाहिजे. वेगवेगळ्या आदिवासी जमातींचे एक समान व्यासपीठ तयार होईल हे पहावे लागेल. विकास प्रकल्पातआदिवासींचा जास्तीत जास्त सहभाग असेल अशा दृष्टीनेच ते आखले पाहिजेत आणि त्यांचा मुख्य उद्देश त्यांना जाणवणा-या गरजा पूर्ण करणे हा असला पाहिजे.

बिगर आदिवासींच्या संपर्कामुळे आणि हस्तक्षेपामुळे आदिवासींचा विशेषत: काही जमातींचा आत्मविश्वास कमी झाला आहे. हा आत्मविश्वास परत निर्माण झाला पाहिजे आणि आदिवासी समाजावर दुष्परिणाम करणारे कार्यक्रम व धोरणे या विरुध्द आदिवासींना आवाज उठविता आला पाहिजे. सामाजिक बदलांची गती नेहमीच मंद असते याचे भान स्वयंसेवी संस्थानी ठेवले पाहिजे. आदिवासींच्या उदरनिर्वाहाच्या साधनांचे रक्षण होईल आणि आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत त्यांच्या अस्तित्वाला धोका येणार नाही यासाठी प्रयत्न करावे लागतील. बिगर आदिवासींशी आलेल्या संपर्कामुळे आदिवासी समाजात नव्या नव्या गरजा निर्माण झाल्या आहेत. त्या पूर्ण होण्यासाठी उत्पन्न वाढविणारे प्रकल्प हाती घेणे जरुर आहे. असे प्रकल्प चालविण्यासाठी नवी कौशल्ये आत्मसात करावी लागतात. तसेच अधिक वेळ काम करावे लागते. त्या दृष्टीने शेती पध्दतीत सुधारणा होईल आणि शेतीला पूरक उद्योगधंदे सुरु करता येतील यासाठी प्रकल्प आखावे लागतील. आदिवासी महिलांसाठी विशेष प्रकल्प राबविण्याची आवश्यकता आहे.

**मार्गदर्शक तत्त्वे -**

पुस्तकाच्या दुस-या भागात स्वयंसेवी संस्थासाठी काही मार्गदर्शक तत्त्वे सांगण्यात आली आहेत. आदिवासीत काम करणा-या स्वयंसेवी संस्थांनी आदिवासींचे मुलभूत हक्क जपण्याच्या दृष्टीने कायद्याचा व त्यांच्या अंमलबजावणीचा अभ्यास केला पाहिजे. आवश्यक तेथे कायद्याचा सल्ला व सहाय्य पुरविले पाहिजे. अनेक देशात आदिवासींच्या जमिनीचे मोठया प्रमाणावर हस्तांतरण होत आहे. त्याला आळा घालण्याचे उपाय योजले पाहिजेत. शक्यतो धान्याचे वाटप हा कार्यक्रम स्वयंसेवी संस्थानी टाळावा. कारण त्यामुळे लोकांचे परावलंबित्व वाढते. त्याऐवजी लागवडीची पध्दत सुधारुन जमीन व पाणी यांचे योग्य व्यवस्थापन करुन शेती उत्पादन वाढविण्यावर भर असावा. पशु - पालन करणा-या भटक्या जमातींसाठी पशुसुधार कार्यक्रम आखणे आवश्यक आहे.

व्यक्तिगत गरजा भागविण्यासाठी उत्पन्न वाढविणारे कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे. असे कार्यक्रम आखतांना कमीतकमी भांडवल लागणारे उत्पादनतंत्र वापरावे तसेच हिशेब ठेवणे, यंत्र दुरूस्ती, खरेदी विक्री यांचेही ज्ञान देणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने हस्तव्यवसाय आणि सामाजिक वनीकरण यासारखेकार्यक्रम उपयोगी पडतील. अनेक कारणांमुळे आदिवासी कुटुंबांना पतपुरवठा करण्यास व्यापारी व सरकारी संस्था हरकत घेतात. त्यादृष्टीने त्यांच्या पतपुरवठयातील अडचणी दूर करणे आवश्यक आहे.काही वेळा स्वयंसेवी संस्थांना असा पतपुरवठा करावा लागेल.

सर्व विकास कार्यक्रमात प्रशिक्षणावर भर द्यावा. या प्रशिक्षणाचा उद्देश आदिवासींचा कार्यक्रमातील सहभाग वाढून त्यांनाच ते चालविता येतील अशी परिस्थिती निर्माण करणे हा असावा. नवीन परिस्थितीशी जुळवून घ्यावयाचे असेल तर आदिवासी समाजात

शिक्षणाचा जास्तीत जास्त प्रसार करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने स्वयंसेवी संस्थांना औपचारिक आणि अनौपचारिक अशा दोन्ही प्रकारच्या शिक्षणावर भर द्यावा लागेल.

प्रकल्प चालविणा-या स्वयंसेवी संस्थांचा कारभार त्यांचे कार्यालय वगैरे गोष्टी स्थानिक परिस्थितीशी फार विसंगत नसाव्यात. कार्यकर्त्यांनी शक्यतो वाहतुकीसाठी सामान्य साधनांचाच वापर करावा. आदिवासी विभागात काम करणा-या स्वयंसेवी संस्थाची कार्यालये, कार्यकर्त्यांची निवासस्थाने, त्यांची वाहतुकीची साधने, आधुनिक पध्दतीची व खर्चिक असल्यास त्यामुळे आदिवासी समाज आणि कार्यकर्तेयांच्यात अंतर पडते व दुरावा निर्माण होतो. आदिवासींच्या स्थानिक संघटना बांधून त्यांचा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील साधनांशी संपर्क वाढविण्याचे प्रयत्न करावे लागते.

**कार्यपध्दती -**

आदिवासी विभागात गावोगाव काम करणा-या कार्यकर्त्यांना पाळण्यासाठी काही सूचना देण्यात आल्या आहेत. विकास कार्य सुरू करण्याआधी तेथील आदिवासींची सामाजिक आर्थिक परिस्थिती त्यांचे संघटन रिती रिवाज, बिगर आदिवासींचे त्यांचे संबंध आणि त्यांच्या विषयीचे शासकीय धोरण यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर आदिवासी समाजातील स्थानिक नेतृत्व कोणते व कसे आहे याचाही अभ्यास केला पाहिजे. परोपकारी कामातून परावलंबन निर्माण होते. तर संघर्षात्मक कामातून शांतता बिघडते याचे भान ठेवूनच काम केले पाहिजे.

क्षेत्रिय कार्यकर्त्यासाठी नऊ नियम सांगण्यात आले आहेत -

१. ते निष्ठावान असले पाहिजे. २. समाजात काम करतांना प्रथमच निर्माण झालेल्या भावना व कल्पना त्याने लक्षात ठेवल्या पाहिजेत. ३. सर्व काम धीमेपणाने केलेले पाहिजे. ४. खोट्या आशा निर्माण करणे टाळले पाहिजे. ५. सुरुवात हळू छोट्या प्रमाणावर केली पाहिजे आणि धीर धरला पाहिजे. ६. लोकांच्या सहभागाला प्रोत्साहन दिले पाहिजे. ७. काम करीत असतांनाच लोकशिक्षण केले पाहिजे. ८. लोक आत्मनिर्भर बनले पाहिजेत. ९. कामापासून कधीतरी वेगळे होण्याची तयारी ठेवली पाहिजे.

आदिवासीत काम करणा-या कार्यकर्त्याजवळ नम्रता, आत्मविश्वास आणि कार्यक्षमता असली पाहिजे.

**टिकाटिपणी -**

आदिवासी समाजामध्ये कार्य करणा-या कार्यकर्त्यांना हे पुस्तक अतिशय उपयुक्त आहे. जगभर चालणा-या विकास कार्याची उदाहरणे जागोजागी देण्यात आली आहेत. मात्र अशा प्रकारच्या मार्गदर्शिकांचा उपयोग प्रत्यक्ष परिस्थितीचे भान ठेवूनच करावा लागतो. काही मार्गदर्शक तत्वे सकृतदर्शनी का होईना परस्पर विरोधी असतात. कार्याची सुरूवात धीमेपणाने झाली पाहिजे असे म्हणतांना सुरूवातीला एकदम यश मिळेल अशी कामे निवडली पाहिजेत असे ही सांगणे यात काहीसापरस्पर विरोध आहे. अशावेळी घ्यावयाचा निर्णय प्रत्यक्ष परिस्थितीनुसारच घ्यावा लागतो. आदिवासीत विकास कार्य करतांना मोठे संघर्ष टाळावेत कारण त्यामुळे अशांत परिस्थिती निर्माण होते आणि आदिवासी व बिगर आदिवासी यांच्यात तणाव निर्माण होतात हे खरे. परंतु आदिवासींच्या जमिनींचे हस्तांतरण कमी करावयाचे असेल किंवा त्यांच्यावर होणा-या अत्याचारांचा मुकाबला करावयाचा असेलतर संघर्ष टाळता येत नाही. वेगवेगळया विभागातील आदिवासींची परिस्थिती वेगवेगळी असते. काही विभागात मुख्य प्रश्न शोषणाचा असतो तर काही विभागात शेती सुधारणेचा असतो. आदिवासींतील रूढी समजावून घेतल्या पाहिजे व त्यांचा आदर केला पाहिजे हे म्हणणेही मर्यादित अर्थानेच खरे आहे. डाकीन म्हणून स्त्रियांना जाळणे वगैरे काही अनिष्ट चालीरितीही आदिवासी समाजात प्रचलीत आहेत. अगदी सुरूवातीला कार्यकर्त्यांनीं याविषयी बोलले नाही तरी कालांतराने याविषयी भूमिका घ्यावीच लागेल. मात्र हे करतांना तरूण आदिवासी कार्यकर्त्याच्या पुढाकारानेच हे करावे लागेल. उदा. राजस्थानातील एका विभागात एकाच जमातीच्या विविध गावात वैर आहे त्यातूनच दंगेधोपे व खून होतात. याविषयी आवाज उठविण्याचे काम तेथील आदिवासी तरूणांचा

पान ७ वर पहा

# उपेक्षित विश्व - एक अभ्यास

( ज्युलियन बर्गर - 'रिपोर्ट फ्रॉम द फ्रॉंटियर', लंडन, झेड बुक लिमिटेड, १९८७)

**प्रास्ताविक -**

आदिवासी जमातीचा अभ्यास आतापर्यंत प्रामुख्याने मानववंशशास्त्रज्ञांनी केला आहे. अशा अभ्यासांचे लक्ष एखाद्या विशिष्ट विभागातील एखादी विशिष्ट जमात असे राहीले आहे. कधीकधी तर जमातीच्या कुळपध्दती, कुटुंबपध्दती, चालीरिती, आभुषणे अशासारख्या एखाद्याच अंगावर अभ्यासकांनी लक्ष केंद्रीत केलेले दिसते. गेल्या काही वर्षात आदिवासी जमातीच्या प्रचलीत प्रश्नांचा अभ्यास काही संशोधक करतांना दिसतात. सामाजिक व राजकीय क्षितीजावर आदिवासी जमाती दिसू लागल्या आहेत. ज्युलियन बर्गर हे आदिवासी जमातींच्या प्रचलित प्रश्नांचा अभ्यास करून, त्यांच्या चळवळींना सक्रियपाठिंबा देणारे अभ्यासक आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवर मानवजातीला भेडसावणा-या प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी जिनिव्हात एक बिगर-सरकारी समिती आहे. या समितीचे ते एक सदस्य आहेत. या समितीने प्रसिध्द केलेल्या आदिवासीविषयक अहवाल तयार करण्यात त्यांचा मोठा सहभाग होता. प्रस्तुत ग्रंथात त्यांनी विविध देशातील आदिवासी जमातीच्या समस्यांचे विश्लेषण केले आहे.

**विकास -**

आज आदिवासी जमातींसमोरील मुख्य प्रश्न म्हणजे विकासाच्या प्रक्रियेत त्यांच्या उदरनिर्वाहासाठी लागणा-या नैसर्गिक साधनसपंत्तीचे अपहरण हा आहे. आतापर्यंत आदिवासी जमाती राहात असलेले विभाग, वाळवंटे, बर्फाळ प्रदेश, जंगले, डोंगराळ प्रदेश, हे फारसे महत्वाचे गणले जात नव्हते. एकाअर्थाने हे विभाग उपेक्षित होते. परंतु आता सर्व राष्ट्रे आपले सर्व विभाग विकसित करण्याच्या मागे आहेत. वाढत्या लोकसंख्येमुळे या आतापर्यंतच्या दुर्लक्षित विभागाकडे सरकारांचे लक्ष वेधले गेले आहे. या विभागात वसाहती आणि पशुपालनकेंद्रे निर्माण होत आहेत. त्याचबरोबर अनेक ठिकाणी खनिजे असल्याचे आढळून आल्यामुळे खाणी खोदल्या जात आहेत. कित्येक ठिकाणी मोठमोठया धरण प्रकल्पांच्या योजना कार्यान्वित होत आहेत. या सर्वासाठी आदिवासी विभागात मोठ्या प्रमाणावर रस्ते बांधले जात आहेत. या विभागात लोकवस्ती नाही आणि नैसर्गिक साधनसंपत्ती भरपूर आहे अशी बहुतेक सरकारंची समजूत आहे. आपल्याला काही थोडया आदिवासी जमातींच्या रक्षणाची चैन विकासाला फाटा देऊन परवडण्यासारखे नाही, असे प्रतिपादन अनेक सरकारे करीत आहेत. यामधून दोन असमान समाजात संघर्ष निर्माण झाला आहे. त्यापैकी एक समाज आर्थिक व राजकीयदृष्टया सामर्थ्यशील असून जागतिक बाजारपेठ आणि बडया राष्ट्रातील सत्तासंघर्ष यांच्याशी तो जोडला गेलेलाआहे. दुस-या समाजात सापेक्षत: साध्या तंत्रज्ञानावर कमी उत्पादनांवर आधारलेली आत्मनिर्भर अर्थव्यवस्था आहे. हा समाज आंतरराष्ट्रीय प्रवाहांपासून बराच अलिप्त आहे. काही विभागात तर तो अजून भटका आहे. या दोन समाजांच्या संघर्षात दुर्बल समाजावर हरण्याची वेळ येणार, हे अटळ आहे. सुदैवाने या परिस्थितीकडे आंतरराष्ट्रीय पातळीवरील संस्थांचे लक्ष वेधले आहे. आदिवासी जमाती संघटित होत आहेत. प्रस्तुत ग्रंथाचा उद्देश, या विकासाच्या प्रक्रियेत आदिवासी समाजांची होतअसलेली हानी दाखविणे हा आहे. त्यामुळे सर्व जगातील विचारवंतांचे लक्ष विकास प्रक्रियेतील आदिवासी समाजाच्या होणा-या हानीकडे वेधले आणि ती टाळण्यासाठी ते प्रयत्न करतील, अशी लेखकाला आशा वाटते. आदिवासी जमाती मागासलेल्या आहेत, आणि त्या राहात असलेले विभाग नैसर्गिक साधनसंपत्तीने समृध्द आहेत, या समजुती सर्वस्वी ख-या नाहीत, हे सर्वसामान्य लोकांच्यासमोर मांडणे आवश्यक आहे.

**आदिवासी समाज -**

आदिवासी लोक म्हणजे निश्चित कोण, याची व्याख्या अस्तित्वात नाही आणि विविध

आदिवासी परिस्थितीतील भिन्नता लक्षात घेता, अशी व्याख्या करणे शक्यही नाही. आदिवासी समाजाच्या व्याख्या करण्याचे प्रयत्न आदिवासी समाजाच्या कार्यगटाने व आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेने केले आहे. युनो कार्यगटाची व्याख्या पुढीलप्रमाणे आहे, दुस-या संस्कृतीच्या किंवा वंशाच्या लोकांनी वसाहत करून भूभाग ताब्यात घेण्याचे वेळी, त्या भूभागात रहाणा-या लोकांचे, आदिवासी लोक वंशज आहेत. ही वसाहत भूभाग जिंकल्यामुळे किंवा इतर मार्गांनी झाली आहे. परंतु त्यामुळे आदिवासी लोक वर्चस्वहीन बनले आहेत. या लोकांच्या सामाजिक आर्थिक आणि सांस्कृतिक चालीरिती आणि परंपरा त्यांच्या देशात वसाहत करणा-या इतर लोकांपेक्षा वेगळे आहेत. या देशातील सरकारे सामर्थ्यवान समाजाच्या सामाजिक व सांस्कृतिक प्रभावाखाली आहेत.

काही देशात अशा प्रकारचे आक्रमण किंवा वसाहतीकरण झाले नसले तरीदेखील या देशातील काही समाजांना आदिवासी मानण्याची कारणे पुढे दिली आहेत -

१) दुस-या वंशाचे किंवा संस्कृतीचे लोक त्या प्रदेशात येण्याआधी राहात असलेल्या लोकांचे ते वंशज आहेत.

२) देशातील इतर समाजापासून अलग राहून त्यांनी आपल्या पूर्वजांच्या चालीरीती व परंपरा जतन केल्या आहेत.

३) औपचारिकरित्या का होईना हे समाज त्यांच्या चालीरितीहून भिन्न असणा-या समाजाच्या राष्ट्रीय, सामाजिक आणि सांस्कृतिक वैशिष्टयांच्या प्रभावाखाली असलेल्या राष्ट्राच्या प्रभावाखाली आहेत.

**आंतरराष्ट्रीय मजूर संघटना -**

आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेने आदिवासी जमातींसंबंधी एक आचारसंहिता तयार केलेली आहे. या आचारसंहितेत आदिवासी लोकांची पुढील वैशिष्टये सांगितली आहेत. राष्ट्रीय समाजाच्या इतर विभागाच्या मानाने आदिवासी जमाती सामाजिक व आर्थिक परिस्थिती बाबतीत मागास आहेत. त्यांचा दर्जा त्यांच्या समाजाच्या चालीरिती किंवा परंपरा किंवा खास कायदे यानुसार नियंत्रित केला जातो.

लेखकाने आदिवासी जमातींची सांगितलेली लक्षणे पुढे दिली आहेत. -

१) एखाद्या भूप्रदेशावर आक्रमण होऊन तो आक्रमकांच्या ताब्यात जातेवेळी असणा-या मूळ रहिवाशांचे आदिवासी वंशज आहेत.

२) आदिवासी जमाती भटक्या किंवा निमभटक्या आहेत. त्यापैकी बरेच जण बदलती शेती करतात. किंवा पशुपालन, शिकार अथवा वनउपज गोळा करणारे आहेत. शेतीसाठी ते श्रमप्रधान पध्दतीचा अवलंब करतात. त्याला फारशी ऊर्जा लागत नाही आणि त्यातून फारसे उत्पादन निघत नाही.

३) आदिवासी जमातींमध्ये केंद्रीय राजकीय संस्था नाहीत, आणि समाजाचे संघटन समाजपातळीवर होते. व निर्णय सर्वानुमते घेतले जातात.

४) राष्ट्रातील अल्पसंख्याकांची सर्व वैशिष्टये आदिवासी समाजाला लागू पडतात. समान भाषा, धर्म, सस्कृती, वेगळे अस्तित्व दाखवणारी वैशिष्टये आणि एखाद्या विशिष्ट भूभागाशी संबंध ही ती वैशिष्टयेहोत. परंतु आदिवासी लोक, प्रबल संस्कृती आणि समाज हयांच्या कहयात आहेत.

५) आदिवासी लोकांचा जगाकडे पहाण्याचा दृष्टीकोन भिन्न आहे. भूमी आणि इतर साधनसंपत्ती यांचे आपण विश्वस्त आहोत, असे ते मानतात. त्यांचा दृष्टीकोन फारसा भौतिकवादी नसतो आणि प्रबल समाजाने देऊ केलेल्या विकासनीतीपेक्षा अलग विकासनीती अवलंबिण्याची त्यांची इच्छा असते.

६) आदिवासी समाज, आपल्याला आदिवासी मानणा-या आणि आदिवासी म्हणून जमातीने व्यक्तींचा मिळून बनतो.

प्रत्येक आदिवासी जमातीत वरील सर्व वैशिष्टये आढळून येतीलच असे नाही. यापैकी काही वैशिष्टयेच आढळून येतील. उदा. स्वाहिलीयन आफ्रिकेतील तुरेग जमात तेथील मूळची रहिवासी नाही. परंतु ते त्या राष्ट्रातील अल्पसंख्यांकात मोडतात. आणि ते प्रामुख्याने पशुचारणजीवी भटके आहेत. ग्वाटेमालातील माया लोक भटके नसून स्थिर शेती करणारे आहेत. परंतु ते तो प्रदेश आक्रमकांनी ताब्यात घेतला त्यावेळी असलेल्या मूळ रहिवाशांचे वंशज आहेत. वेगवेगळया देशातील आदिवासी

जमातींच्या परिस्थितीत बराच फरक आढळतो. कधी कधी तर एकाच आदिवासी जमातीतील वेगवेगळया कुटुंबातसुध्दा फार फरक असलेला दिसून येतो. आदिवासींची काही कुटुंबे नागरी विभागात स्थिर झाली आहेत. आणि त्यांनी आधुनिक जीवनशैली स्विकारली आहे. याउलट त्याच जमातीतील काही कुटुंबे ग्रामीण विभागात आणि परंपरागत जीवनपध्दतीने रहातात. जगातील आदिवासींची लोकसंख्या सुमारे २० कोटी आहे. २० कोटी म्हणजे एकूण लोकसंख्येच्या ४अ आहे. जगातील पाचही खंडातसमाजवादी, आणि भाडवलशाही राष्ट्रात आदिवासी जमाती अस्तित्वात आहेत. बहुतेक देशात लोकसंख्येच्या दृष्टीने ते अल्पसंख्य आहेत. मात्र ग्रीनलंडमध्ये त्यांचे प्रमाण एकूण लोकसंख्येतील ९०टक्के आहे. तर ग्वाटेमाला आणि बोलिव्हिया या देशात त्यांचे प्रमाण अर्ध्याहून अधिक आहे. आस्ट्रेलियात दर १०० व्यक्तींमध्ये दोन व्यक्ती आदिवासी जमातीच्या आहेत. अमेरिकेत दर दोनशे व्यक्तींमध्ये एक व्यक्ती आदिवासी आहे. चीन व भारतात आदिवासी लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येतीलप्रमाण सुमारे ७ टक्के आहे.

अनेक प्रदेशातील आदिवासी, तो प्रदेश आक्रमकांनी ताब्यात घेतला त्यावेळी तेथे रहाणा-या मूळ लोकांचे वंशज आहेत. अशा आक्रमणाच्यावेळी आदिवासी समाजाची मोठया प्रमाणावर हानी झालेली आहे. मात्र त्यांचे आक्रमणविषयक अनुभव सर्वत्र सारखेच आहेत, असे नाही. काही देशात आक्रमकांनी वंशहत्येवरच भर दिला. त्यामानाने आशियातील जमातींना वंशहत्येचा बळी बनावे लागलेनाही. अजूनही अनेक जमाती ब-याच स्वायत्त स्थितीत जगत आहेत. फारच थोडया आदिवासी जमाती त्यांचे परंपरागत जीवन कंठताना दिसतात. अशा जमातीत आफ्रिकेतील कलहरी वाळवंटातील बुशमेन व दक्षिण अमेरिकेतील ॲमेझॉन खो-यात रहाणा-या जमातींचा समावेश होतो. बहुसंख्य आदिवासी लोक शेतकरी आहेत. आणि त्यापैकी बहुतेकजण निर्वाहापुरतीच शेती करतात. उत्पन्न वाढविण्याच्या अपेक्षेने अनेक आदिवासींना उद्योगधंदे व दळणवळण यात नोक-या शोधणे भाग पडले आहे. आर्थिक क्रियांच्यापायावर आदिवासी जमाती वेगळया म्हणून ओळखणे कठीण आहे. या जमातींची ओळख भाषा, भूषा, चालीरिती आणि संस्कृती यांच्या आधारानेच होऊ शकते.

**भूमी आणि तत्वज्ञान -**

भूमिविषयक दृष्टीकोनाच्या बाबतीत आदिवासी लोक, बिगर आदिवासींपेक्षा फार वेगळे आहेत. ते भूमीलापवित्र मानतात. त्यांचा इतिहास व्रजमातीची जाण, भूमीशी निगडीत असतात. आणि भूमीमुळेच त्यांनाआर्थिक आधार मिळून ते स्वतंत्र लोक म्हणून जगू शकतात. पाश्चिमात्य दृष्टीकोनातून जमीन, ही जास्तीतजास्त शोषण करावयाची विक्रेय वस्तू आहे. सर्व आधुनिक राष्ट्रे, भूमी आणि सागरसंपत्तीचा जास्तीत जास्त उपयोग करून घेत आहेत. त्यामुळे आदिवासी जमातींवर एकूण समाजात विलीन होण्यासाठी दबाव येत आहे. विकासाच्या प्रक्रियेत त्यांच्या साधनसंपत्तीचे आणि संस्कृतीचे पध्दतशीर दहन चालू आहे.

**आदिवासी जमातींची परिस्थिती**

आजही बहुसंख्य राष्ट्रात आदिवासी जमाती आर्थिक व सामाजिकदृष्टया अतिशय कनिष्ठ स्तरावरच आहेत. बहुसंख्य लोकांना किमान वेतन देणारी कामेच करावी लागतात. काही देशात तर त्यांची स्थिती गुलामासारखी होती. उत्तर अमेरिका, मध्य अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया या देशात वसाहती करण्याच्या काळात, त्यांच्यावर अनान्वित अत्याचार झाले. आज काही देशांत त्यांच्या रक्षणासाठी व विकासासाठी खास कायदेकानू व योजना आहेत. तरीदेखील ब-याच आदिवासी समाजांना मोठया प्रमाणावर बेरोजगारी, न्यूनतम प्राप्ती आणि कामाची वाईट परिस्थिती या समस्यांना तोंड द्यावे लागते. काही प्रमाणात आदिवासींच्या बाबतीत भेदभाव केला जातो. १९७६ मध्ये भारत सरकाने बांधील श्रमपध्दती बेकायदा ठरविणारा वटहुकूम जाहीर केला. अनेक बांधील गडी शोधून मुक्त करण्यात आले. त्यापैकी बहुसंख्य जण आदिवासी जमातींचे होते.

किमान आरोग्यसेवा आणि सामाजिक सुरक्षा सोयी, आदिवासींच्या वाटयाला, बिगर आदिवासींच्या मानाने कमी येतात. त्यामुळे

अशा जमातीत बालमृत्यूचे प्रमाण अधिक तर सरासरी आयुमर्यादा कमी असे दिसून येते. कामाच्या ठिकाणची वाईट परिस्थिती, राहत्या घरांची दुःस्थिती आणि दारिद्रय यांची परिणीती आरोग्य धोक्यात येण्यात होते. काही जमातीत बाहेरील लोकांच्या संपर्कातून,नविन रोग निर्माण झालेले आहेत. आणि त्यातूनच काही आदिवासी जमाती पूर्णपणे नष्ट झाल्या आहेतब्राझीलमध्ये अशा प्रकारे ८७ स्थानिक आदिवासी जमाती नष्ट झाल्या आहेत.

बहुसंख्य आदिवासी जमातीत औपचारिक शिक्षणाचा स्तर कनिष्ठ दर्जाचा आहे. अनेक ठिकाणी शाळांचा अभाव आहे. काही आदिवासी जमाती अतिशय दुर्गम विभागात रहातात आणि त्यामुळे त्यांना औपचारिक शिक्षण सोयींपासून वंचित रहावे लागते. भटक्या जमातींच्या बाबतीत नेहमीची शिक्षणपध्दती गैरलागू ठरते. अनेक बोलीभाषांमुळे शिक्षण कोणत्या भाषेत द्यावे, असे प्रश्न निर्माण होतात. ब्राझीलमध्ये विविध आदिवासी जमातीत सुमारे १२० भाषा बोलल्या जातात. भारतातही अशीच परिस्थिती आहे. त्याखेरीज औपचारिक शिक्षण पध्दतीत आदिवासी चालीरीतींचा व परंपराचा तिटकारा कधीकधी अभिप्रेत असतो. बिगर आदिवासी शिक्षक आदिवासी विद्यार्थ्यांची हेटाळणी करतात. त्यामुळे विद्यार्थी आणखी दुरावला जातो. काही देशातील सरकारे, शिक्षण हे आदिवासी विद्यार्थ्यांना एकूण समाजात विलीन करण्याचे एक साधन मानतात.

**भेदभाव -**

काही देशात कायद्याने औपचारिकरीत्या पूर्ण समानता घोषित केली असली तरी प्रत्यक्षात आदिवासींच्याबाबतीत थोडाफार तरी भेदभाव केला जातो. आदिवासी जमाती त्यांचा कारभार चालविण्यास समर्थ नाहीत, असे मानले जाते. आदिवासी लोक कामचुकार व आळशी आहेत, अशाही समजुती आहेत. काही सरकारांनी आदिवासी कल्याणासाठी खास यंत्रणा उभारल्या आहेत. या यंत्रणेतील अधिकारी कार्यक्षम व आदिवासींविषयी आस्था बाळगणारे असल्यासच त्यांचा फायदा आदिवासींना होतो. अनेकदा शासकीय अधिकारी आपले काम आदिवासींना सुसंस्कृत करण्याचे आहे, असे मानतात. आदिवासी अर्थव्यवस्थेचे आधुनिकीकरण करणे आणि आदिवासींना राष्ट्रीय प्रक्रियेत सामील करणे हे आपले कामआहे, असेही बरेच शासकीय अधिकारी मानतात.

**सीमांतीकरण -**

विकासाच्या या प्रक्रियेत व जीवघेण्या चढाओढीत मागे पडलेले आदिवासी, वैफल्य आणि निराशा यांनीवेढलेले आहेत. गुन्हेगारीचे आणि आत्महत्येचे प्रमाण बरेच असून, ते वाढत आहे. व्यसनाधीनता आणि वेश्याव्यवसाय यातही भयावह वाढ होत आहे. बेरोजगारी, दारिद्रय आणि विरोधी वातावरण यामुळे अनेक आदिवासींचे नीतीधैर्य खचत आहे. अशा परिस्थितीत आपले स्वतंत्र सांस्कृतिक अस्तित्व जपून ठेवणे, ही एक गंभीर समस्या झाली आहे.

**वसाहतीकरणाचा अनुभव -**

अनेक पाश्चिमात्य लोक, वसाहतींचा इतिहास, त्या भागात युरोपियन लोक गेल्यापासून सुरू झाला असे मानतात. त्याआधी तेथे रहात असलेले समाज कसे होते, याची दखल घेतली जात नाही. वसाहतीकरणाचा अनुभव वेगवेगळया खंडात आणि वेगवेगळया विभागात बहुविध प्रकारचा आहे. अमेरिकेत आणि ऑस्ट्रेलियात वसाहत करणा-या लोकांनी स्थानिक आदिवासींचे हाल करून त्यांची संख्या कमी करण्याचे धोरण अवलंबिले असा अनुभव आशिया खंडातील देशात आला नाही. दक्षिण अमेरिकेतही वसाहतीकरणाच्या काळात जुलूमजबरदस्ती झाली. माया आणि ऑल्मेक यासारख्या प्राचीन संस्कृतींची ओळख जगाला अलिकडेच झाली आहे. ऑस्ट्रेलियात युरोपियन लोक जाण्याआधी तेथील स्थानिक जमाती गुण्यागोविंदाने रहात होत्या आणि त्यांची आपापसात दीर्घकाळ युध्दे होत होती, असे उपलब्ध माहितीवरून आढळून येत नाही.

काही ठिकाणी तर आदिवासी लोकांनी नवी वसाहत करणा-या लोकांना मदत केली. त्यांच्याबरोबर तहकरण्यात आले. दुर्दैवाने वसाहती करणारे बाहेरील लोक स्थिरावल्यानंतर त्यांनी हे करारनामे मोडून आदिवासींच्या जमिनी बळकावल्या व त्यांना

परागंदा केले. १८५० ते १८८० या तीस वर्षाच्या कालावधीत कॅलिफोर्नियातील आदिवासींची लोकसंख्या एक लाख वीस हजारापासून, वीस हजारापर्यंत घसरली. १७८८ मध्ये ऑस्ट्रेलियात बाहेरील लोक गेले. त्यावेळी तेथील स्थानिक आदिवासी लोकसंख्या तीन लाख होती. त्यानंतर १०० वर्षानीं ती साठ हजारांवर आली. बाहेरील लोकांनी आणलेल्या विविध रोगांना अनेक आदिवासी बळी पडले. आदिवासी विभाग बळकावले गेल्यामुळे त्यांना परागंदा व्हावे लागले. तसेच अनेक आदिवासींना ठार मारण्यात आले. या सर्वाचा परिणाम लोकसंख्या कमी होण्यात झाला. त्याशिवाय अनेक आदिवासींच्या वाटयाला सक्तीची वेठबिगारी, गुलामी आणि शारिरीक कष्टाचे काम आले. युरोपियनांच्या वसाहतीचा झपाटयाने विस्तार होत गेला. त्याबरोबर आदिवासींच्यासामाजिक आणि आर्थिक व्यवस्थांवर आणि सांस्कृतिक चालीरितींवर बंधने आली. जमीन हस्तांतरणामुळेअनेक आदिवासी कुटुंबे अन्नाला मोताद झाली. अनेक विभागातील जमीन निर्यात होणा-या साखर, कॉफी वगैरे पिकांखाली आणली गेली. या प्रक्रियेत अनेक आदिवासी शेतकरी, शेतमजूर बनले तर अनेकांनी डोंगराळ विभागात जंगली किंवा वाळवंटी विभागात आश्रय घेतला. काही ठिकाणी स्थानिकआदिवासी जमातींनी या आक्रमणाविरूध्द झुंज देण्याचा प्रयत्न केला. मात्र आक्रमकांच्या आधुनिक शस्त्रांस्त्रांसमोर त्यांचा टिकाव लागला नाही. कॅनडा व मेक्सिकोमध्ये मात्र अशा प्रतिकारांमुळे बाहेरील लोकांना आदिवासींबरोबर तह करावे लागले. सुदैवाने आज आदिवासी समाजात जागृती झाली असून आपल्या अस्तित्वासाठी झगडण्यासाठीची उमेद निर्माण झाली आहे. त्यामुळे हे तह, आंतरराष्ट्रीयकरार मानून ते प्रामाणिकपणे अंमलात आणले पाहिजेत, अशी मागणी तेथील आदिवासी करीत आहे.

विविध देशातील आदिवासींच्या अनुभवाला, त्यांची उदरनिर्वाहाची साधने त्यांच्याकडून हिरावून घेतली जात आहेत, असे येत आहे. त्यामुळे त्यांची संस्कृती आणि अस्तित्वच धोक्यात आले आहे. विकासाच्याप्रक्रियेत जंगलांचा नाश होत असल्यामुळे आदिवासींना लाकूडफाटा मिळण्यात अडथळा निर्माण झाला आहे. विविध देशात सिंचनाचे आणि वीजनिर्मितीचे प्रचंड प्रकल्प उभारले जात आहेत. दक्षिण अमेरिकेत मोठमोठी पशुपालन केंद्रे उभारली जात आहेत तर अनक मोठया खाणी सुरू झाल्या आहेत. त्यामुळे अनेक आदिवासींवर विस्थापित होण्याची वेळ आली आहे. अशा अनेक प्रकल्पांना जागतिक बँकेने मदत दिली आहे. या धोरणाविरूध्द अनेक आदिवासी संघटनांनी व त्यांच्या मित्रसंघटनांनी असंतोष व्यक्त केला आहे.

काही देशातील आदिवासी स्वयंनिर्णयाच्या हक्कासाठी झगडत आहेत. हा हक्क म्हणजे राष्ट्रातून फुटून निघण्याचा हक्क आहे, अशा समजुतीमुळे या मागणीला जोराचा विरोध होत आहे. अनेक देशातील आदिवासी स्वयंनिर्णयाचा हक्क न मागता आपले स्वतंत्र अस्तित्व टिकून रहावे, यासाठी झगडत आहेत.हे संघर्ष आता केवळ स्थानिक राहिले नसून, त्यांचे पडसाद आंतरराष्ट्रीय मजूर संघटना आणि युनोच्या काही समित्या, यांच्या बैठकीतही उमटत आहेत.

अनेक देशात आदिवासी समाज समाजातील इतर गरिबांबरोबर जवळजवळ एकरूप झाल्यासारखे वाटतात.अशी परिस्थिती ज्या देशात आदिवासींचं प्रमाण कमी आहे आणि वसाहतीकरण प्राचीन आहे, अशा देशात विशेष आहे. आदिवासी जमातींचे संघटन होण्याच्या मार्गातील प्रमुख अडचण म्हणजे प्रत्येक देशात आदिवासी समाज अनेक जमातीत विखुरलेला नाही.

**दक्षिण अमेरिकेतील आदिवासी समाज -**

दक्षिण अमेरिकेतील आदिवासी जमातींच्या अस्तित्वावर घाला आला आहे. सरकारे मोठमोठया मळयांसाठी जंगल साफ करून जमिनी देत आहेत. मोठया प्रमाणावर रस्तेबांधणी होत आहे. त्याचबरोबरप्रचंड धरणे आणि वीजनिर्मिती प्रकल्प उभारले जात आहेत. त्यामुळे या विभागातील पावसाळी जंगले कमीकमी होत आहेत. ॲमेझॉन खो-यात काही जमाती बिगर आदिवासींच्या संपर्कात फारशा आलेल्या नाहीत. त्यांचे व तेथे स्थलांतर करणा-या लोकांचे संघर्ष वाढत

आहेत. पेरू, बोलिव्हिया आणि इक्वेडोर यामधील आदिवासी जमाती प्राचीन इन्का संस्कृती निर्माण करणाऱ्यांचे वंशज आहेत. यापैकीबहुतेक लोक डोंगरउतारावरील कमी सुपीक जमिनीत शेती करतात. पठारावरील चांगल्या जमिनी बिगरआदिवासींनी मोठमोठे मळे करून व्यापल्या आहेत. काही आदिवासी भूमीहीन शेतमजूर आहेत तर काही पेरू आणि बोलिव्हियातील खाणीत काम करतात. अलिकडे या लोकांनी संघटना बांधून आपले प्रश्न सोडविण्यासाठी कंबर कसली आहे.

या भागात न्यू ट्राइब मिशन, समर इन्स्टिटयूट ऑफ लिंग्विस्टीक आणि साऊथ अमेरिकन मिशनरी सोसायटी यासारख्या कट्टर धार्मिक चर्च संघटनांनी आदिवासींना ख्रिश्चन धर्मात आणण्यासाठी जोराचेप्रयत्न चालवले आहेत. कित्येकदा सक्तीची धर्मांतरे झाली आहेत व आदिवासींचे धर्म त्यांच्या चालीरीती आणि परंपरा यांची अवहेलना सुरू झाली आहे. काही ठिकाणी या संघटना आदिवासींना आरोग्याच्या सुविधा पुरवतात. परंतु त्यामुळे स्थानिक लोकांची उपक्रमशीलता कमी होत आहे याचे उदाहरण म्हणजे चिलीमधील मापूची लोक होत. ते आज अस्तित्वात असलेल्या चिलीतील मूळ रहिवासी आहेत. स्पॅनिश आक्रमकांशी त्यांनी अनेक वर्षे यशस्वी टक्कर दिली. मात्र १९८८ मध्ये चिली सरकारने त्यांचा प्रतिकार मोडून काढला आणि त्यांच्या जमिनी ताब्यात घेतल्या. छोटया छोटया आरक्षित भूभागांवर त्यांच्यासाठी वसाहती निर्माण करण्यात आल्या. त्यांच्या चांगल्या जमिनी मोठमोठया मळयांसाठी देण्यात आल्या. १९७० मध्ये सत्तेवर आलेल्या पुरोगामी सरकारचे अध्यक्ष आयंदे यांनी जमीनसुधारणेचा एक कार्यक्रम अंमलात आणला. अनेक मापुचींना त्यांच्या जमिनी परत करण्यात आल्या. १९७३ मध्ये लष्कराने त्या सरकारला हटवले आणि त्याबरोबर जमीन सुधारणेचा कार्यक्रमही संपुष्टात आला. आज अनेक मापुची तुरूंगात आहेत तर अनेक जणांचा सैन्याकडून छळ होत आहे. आता मापूची लोकांनी आपले एक राष्ट्रीय संघटन बनविले आहे.

**ब्राझीलमधील आदिवासी -**

आकारमानाने ब्राझील हा जगातील मोठया देशांपैकी एक आहे. लोकवस्ती विरळ असून दळणवळणाची साधनेही विकसित झालेली नाहीत. आदिवासी लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येतील प्रमाण ५०अ पेक्षा थोडेसे कमी आहे. अजूनही ब्राझीलमधील काही जमातींचा बिगर आदिवासींशी संपर्क आलेला नाही. १९६० नंतर ब्राझील सरकारने आर्थिक विकासाचे प्रकल्प राबविण्यास सुरूवात केली. काही ठिकाणी आदिवासी जमातींना सक्तीने स्थलांतर करण्यास भाग पाडले. १९६४ मध्ये लष्कराने सत्ता बळकावली,आणि १९६६ पासुन 'ऑपरेशन ॲमेझॉन' या नावाने सर्व ॲमेझॉन खोऱ्यांचा विकास करण्याचा कार्यक्रम आखला. या कार्यक्रमात प्रचंड लांबीचे रस्ते, विद्युत निर्मिती योजना, खाणींचा विकास, जंगलतोड आणि मोठमोठया पशुपैदास केंद्रांची स्थापना याचा समावेश आहे. यासाठी लागणाऱ्या जमिनी आदिवासी लोकांकडून बळकावण्यात आल्या आहेत. यापैकी बऱ्याच प्रकल्पांना जागतिक बँकेने भरघोस अर्थसहाय्य केले आहे. अनेक आदिवासी लोकांचा तेथे नव्याने येणाऱ्या लोकांशी संपर्क आलाआणि त्यांच्यात नव्या रोगांचा फैलाव झाला. जंगलाच्या विनाशामुळे त्यांच्या किमान गरजा भागविणेकठीण झाले आहे. काही वर्षे याची दखल घेतली गेली नाही. परंतु आदिवासी लोकांवर होणाऱ्या या अत्याचारांविरूध्द काही चर्च संघटनांनी आवाज उठवला. आदिवासींना पाठिंबा देणाऱ्या युरोपातील काही गटांनी या अत्याचारांना मोठया प्रमाणावर प्रसिध्दी दिली. १९८४ मध्ये ब्राझीलमधील आदिवासींनीएक राष्ट्रीय परिषद भरवली. आणि त्यानंतर त्यांच्या प्रश्नांना आंतरराष्ट्रीय बैठकीत वाचा फोडणे, सुरू केले.

**आशिया खंडातील आदिवासी -**

जगातील आदिवासींपैकी बहुसंख्य आदिवासी आशिया खंडातील वेगवेगळया देशात रहातात. आशिया खंडातील अनेक देशात निरनिराळया लोकांनी पूर्वीपासून स्थलांतर केले आहे. त्यामुळे या देशातील मूळ लोक कोण व बाहेरून आलेले कोण, हे सांगणे जवळजवळ अशक्यच आहे. त्याशिवाय वेगवेगळया आदिवासी जमाती वेगवेगळया आर्थिक व सांस्कृतिक अवस्थेत रहात आहेत. मात्र या देशातही आदिवासींच्या बाबतीत दुजाभाव

केला जातो. त्यांच्या धार्मिक व राजकीय संस्थांवर आघात केले जातात आणि त्यांचे आर्थिक सीमांतीकरण होत आहे, असे आढळून येते. आशिया खंडातील काही देशात युरोपियन लोक येण्याआधी ब-याच जमाती इतर समाजापासून वेगळया रहात होत्या. या देशांचे वसाहतीकण झाल्याबरोबर नैसर्गिक साधनसंपत्तीच्या वापराला मोठया प्रमाणावर सुरूवात झाली. दळणवळणाची साधने वाढली आणि आदिवासी विभाग, इतर विभागांच्या अधिक संपर्कात आले. यापैकी अनेक देश दुस-या महायुध्दानंतर स्वतंत्र झाले. त्यानंतर तर या प्रक्रियेने अधिकच जोर धरला. यातील काही जमातींना स्वातंत्र्य हवे आहे तर काही जमाती स्वायत्तेची मागणी करीत आहेत. ब्रम्हदेशातकरिन जमातीच्या लोकांनी सरकारविरूध्द बंडच पुकारले आहे. भारतासारख्या काही देशात आदिवासी लोकांना घटनेने विशेष संरक्षण दिले आहे. त्यांच्यासाठी ग्रामपंचायतीपासून लोकसभेपर्यंत काही जागा आरक्षित आहेत. उच्च शिक्षण देणा-या संस्था आणि सरकारी नोक-या यातही त्यांच्यासाठी जागा राखून ठेवल्या जातात. आदिवासींच्या विकासासाठी विशेष योजना आहेत. मात्र यापैकी अनेक योजनांची अंमलबजावणी व्यवस्थित होत नाही. त्यामुळे विकासाच्या योजनांचे अनेक फायदे आदिवासींपर्यंत पोहोचले नाहीत. काही ठिकाणी तर त्यांच्या अस्तित्वालाच धोका निर्माण झाला आहे. सर्वात वाईट स्थिती बांगला देशातील चितगाँग विभागातील डोंगरी जमातींची आहे. या विभागात सुमारे १३ जमाती रहातात. बांगला देशी मुसलमानांहून ते बरेच वेगळे आहेत. एकतर ते चिनी तिबेटी वंशाचे आहेत. त्यांची शारिरीक ठेवण ब्रम्हदेशातील जमातींसारखी आहे आणि त्यांचा धर्म बौध्द आहे. सन १९०० साली एक कायदा करून, ब्रिटीश शासनाने त्यांना बरीच स्वायत्तता बहाल केली. त्रिपुरा, बिहार, आसाम आणि चितगाँग यामधील आदिवासी जमातींना एकत्र आणून त्यांचा एक महासंघ बनवावा अशी कल्पना होती. दुदैवाने या कल्पनेचा पाठपुरावा झाला नाही आणि चितगाँगचा डोंगरी भाग, पूर्व पाकिस्तानात घालण्यात आला. १९७१ मधे बांगला देशाची स्थापना झाल्यानंतर सरकारने सर्व ठिकाणी एकसूत्री राजवट आणण्याचे ठरविले. बांगला देशातील लष्करी हुकूमशाहीच्या धोरणाला चितगाँगमधील आदिवासींनी कडवा विरोध केला. त्यात हजारो लोक मारले गेले तर हजारो लोकांनी नजीकच्या भारतीय प्रदेशात आश्रय घेतला. अशीच परिस्थीती मलेशिया आणि ब्रम्हदेशमधील ओरांग असरी जमातीच्या वाटयाला आली आहे.

थायलंडमधील एकूण लोकसंख्येपैकी सुमारे १टक्के लोकसंख्या आदिवासी जमातींची आहे. हे लोक ६ मोठया वांशिक गटात आणि इतर छोटया छोटया गटात विखुरले आहेत. ते वेगवेगळया धर्मांचे आहेत. अगदी अलिकडेपर्यंत ते जवळजवळ स्वायत्त होते. परंतु लोकसंख्येची वाढ आणि वाढती शेती व्यवसाय यामुळे बिगर आदिवासींनी, आदिवासींची जमीन बळकावण्यास सुरूवात केली आहे.सरकारने सरकत्या शेतीला पायबंद घालावयाचे ठरविले आहे. जंगलवस्तूचा जास्तीत जास्त उपयोग करण्याचा सरकारी प्रयत्न चालू आहे. त्यामुळे आदिवासींना या वस्तू मिळणे कठीण झाले आहे. इंडोनिशियातील परिस्थिती याहून भयानक आहे. इंडोनिशिया हा देश सुमारे १३०० बेटांचा बनलेला असून त्यात तीनशेहून अधिक वांशिक गट वस्ती करतात. तेथे बोलल्या जाणा-या भाषांची संख्या २४०पेक्षा अधिक आहे. इंडोनिशिया आज लष्करी हुकूमशहाच्या हातात आहे. त्यांनी वेगवेगळे प्रयोग चालवले आहेत. उदा. मालेनेशियन जमातीचे लोक, दक्षिण मोलुकासमध्ये वस्ती करून होते. आता, इंडोनेशियन सरकार, बिगर आदिवासी मुस्लिम आणि जावा येथील लोक यांची या भागात वस्ती वाढविण्याचा प्रयत्न करीत आहेत. स्थानिक पोषाख आणि भाषा वापरण्यावर निर्बंध घातले जात आहेत.गेल्या काही वर्षात अशा रितीने जवळजवळ पाच लाख बिगर आदिवासींची वस्ती या भागात करण्यात आली. मात्र या प्रयत्नांना फारसा विरोध झाला नाही. याउलट असा प्रयत्न देशाच्या पूर्व भागातील इस्ट तिमोरमध्ये करण्याचा प्रयत्न झाला. त्याला अतिशय कडवा विरोध झाला. या प्रयत्नांवर आदिवासी प्रश्नांना प्रसिध्दी देणा-या मित्रगटांनी जोरदार आवाज उठवला. आज या कार्यक्रमाची गती

काहीशी मंदावली आहे. परंतु हजारो आदिवासी मारले जात आहेत. कित्येक जण तुरूंगात आहेत आणि अनेकांचा छळ होत आहे.

फिलीपाईन्सची गोष्ट अशीच आहे. फिलीपन सरकारने आदिवासींचा विचार न करता आणि त्यांना विश्वासात न घेता, विकासाचे अनेक प्रकल्प सुरू केले. फिलीपिन्समधील आदिवासींच्या तीव्र विरोधामुळे यापैकी काही सोडून देण्यात आले. फिलीपिन्समधील कार्डिलेरासारख्या मोठया जमाती, विभागीय स्वायत्तता मागत आहेत.

**आफ्रिकेतील आदिवासी -**

आफ्रिकेतील अनेक वसाहती युरोपातील लोकांनी स्थापल्या होत्या. दुस-या महायुध्दानंतर साऊथ आफ्रिका वगळता इतर जवळजवळ सर्व वसाहती स्वतंत्र झाल्या. सुरूवातीच्या काळात युरोपियनांनी मोठया प्रमाणावर धडधाकट स्त्रीपुरूषांना पळवून नेऊन त्यांची गुलाम म्हणून विक्री केली. धडधाकट स्त्रीपुरूषांच्या अभावी आफ्रिकन अर्थव्यवस्था बिघडली आणि तिची वाट खुंटली. त्यानंतर युरोपातील विविध देशांनी आफ्रिकेतील भूभाग व्यापावयाला सुरूवात केली. त्याचा एक परिणाम म्हणून एकाच जमातीचे लोक विविध भूभागात विखूरले गेले आणि हया भूभागातील तंटयात त्यांना भाग घ्यावा लागला. युरोपियनांनी आफ्रिकेत नगदी पिके आणली आणि आफ्रिकन लोक निर्यात आणि बाहय बाजारी प्रभाव यावर अवलंबून राहीले.

दुस-या महायुध्दानंतर यापैकी ब-याचशा वसाहती स्वतंत्र राष्ट्रे झाल्या. मात्र राष्ट्रीय सरहद्दी पूर्वीच्याच राहील्या. त्यामुळे आजही प्रत्येक देशात अनेक जमाती आहेत आणि त्यांच्यात सत्तास्पर्धा चालू आहे. प्रत्येक देशात अनेक जमाती आहेत आणि त्यांच्यात सत्तास्पर्धा चालू आहे. मायजेरियात सुमारे दोनशे जमाती आहेत तर घानामध्ये नऊ आहे. टांझानियात १२० जमाती आहेत. यापैकी बहुतेकदेशात मुख्य जमातीने राजकीय सत्ता हातात घेतली असून विविध जमातीत सारखे संघर्ष चालू आहेत : खरेतर एका राष्ट्राचे पाश्चिमात्य उदकरण या देशानां लागू पडणार नाही. त्यातून काही उपाय काढला नाही तर आजचीच अस्थिर परिस्थिती दीर्घकाळ टिकणार आहे. छाड आणि इथिओपिया या देशात एकछत्री राज्यव्यवस्था स्थापण्याचे प्रयत्न होत आहेत परंतु त्यांचेही यश अद्याप सिध्द झालेले नाही. आफ्रिकेतदेखील त्यांच्याविरूध्द भेदभाव केला जातो. ज्या दुस-यांच्या प्रभावाखाली आहेत आणि ज्यांची लोकसंख्या घटत आहे, अशा जमाती आढळून येतात. या जमाती मुख्यत: चारण जमातींपैकी आहेत. या जमातींना आतापर्यंत फार कठीण परिस्थितींशी तोंड देऊन, आपले अस्तित्व टिकवून धरले आहे. वाळवंटात उगवणा-या झाडो-यावर ते आपली जनावरे चारतात. मात्र आता सरकारांनी फिरती शेती बंद करावयाचे आणि भटकते पशुपालन बंद करावयाचे, निर्णय घेतले आहेत. सारखी दुष्काळी परिस्थिती निर्माण होत आहे. चारणासाठी उपलब्ध असणारी जमीन कमी होत आहे. आणि आदिवासींना त्यांच्या जमिनीवरील व पाण्याच्या साधनांवरील हक्काला मुकावे लागत आहे. या बहुतेक देशातील राज्यकर्ते शहरी, शिकलेले, उच्चभ्रू आहेत. त्यांना या जमातीची दु:स्थिती कळू शकत नाही. त्यांच्या दृष्टीने सरकारने स्थिर शेतीला आणि निर्यातीसाठी लागणा-या नगदी पिकांना महत्व दिले पाहिजे. आफ्रिकेतील पिग्मी आणि सॅन बुश मेन या जमातींची स्थिती तर अतिशय वाईट आहे. सॅन लोकांची कलहरी वाळवंटात हकालपट्टी करण्यात आली आहे. पिग्मींच्या प्रदेशात बांटू लोकांनी वस्ती केली आहे. पिग्मी जमातीला इतरांसारखे करण्यासाठी, खास प्रयत्न केले जात आहेत. जंगलाच्या व्यापारीकरणामुळे त्यांच्या हालात भरच पडली आहे. **दुर्दैवाने** या जमातींच्या स्थितीविषयी जागतिक स्तरावर फारशी जाणीव नाही आणि त्यांचे भवितव्य अनिश्चित आहे.

**श्रीमंत देशातील आदिवासी जमाती -**

ज्यावेळी बाहेरील लोक अमेरिकेत, आस्ट्रेलियात किंवा न्यूझीलंडमध्ये वस्ती करण्यास आले त्यावेळी तेथील आदिवासी जमातींची स्थिती बाहेरील लोक आशिया, आफ्रिका खंडात वस्तीला आले, त्यापेक्षा वेगळी होती. आदिवासी जमाती ब-याच मोठया भूभागात रहात होत्या आणि सुरूवातीला तरी युरोपियन वसाहतवादयांच्या विरूध्द नव्हत्या. नंतर वसाहतींसाठी येणा-यांची संख्या

झपाट्याने वाढली आणि बहुसंख्य आदिवासी अल्पसंख्य बनू लागले. युरोपातून आलेल्या वसाहतवाद्यांनी हळूहळू आदिवासींच्या चांगल्या जमिनी बळकावल्या आणि त्यांना अंतर्गत विभागात हुसकावून लावले. मिशन-यांनीधर्मातराचे प्रयत्न केले. सरकारने आदिवासींविरूध्द भेदभाव करण्याच्या धोरणाला उत्तेजन दिले. सांस्कृतीकरणाच्या नावाखाली बिगर आदिवासींचे रितीरीवाज आदिवासींनी आत्मसात करावेत असे प्रयत्न सुरू झाले. ही परिस्थिती गेल्या दहा वर्षात बदलत आहे, आदिवासी आपल्या स्वतंत्र संघटना, चर्चेस आणि कामगार संघटना उभारित आहेत.

जपानमधील होक्किडू या छोट्या बेटावर आयनू जमातीचे अस्तित्व आहे. जपानी सरकारने हे बेट नवव्या शतकातच जिंकून घेतले परंतु औपचारिकरित्या ते १८६९ मध्ये जपानचा भाग बनले. जपानी सरकारने, जपानी तरूणांनी आयनु तरूणींशी लग्ने करावीत म्हणून प्रोत्साहन दिले. जपानी भाषेतील शिक्षण सक्तीचे करण्यात आले. अलिकडे आयनु लोकही संघटित होत आहेत आणि त्यांची स्वतंत्र संस्कृती आणि अस्तित्व यांचे रक्षण करण्यासाठी सिध्द झाले आहेत.

सामी जमातीचे लोक शेकडो वर्षे जगातील अत्यंत थंड भागात रहातात. पारंपारिकदृष्ट्या ते शिकारी.मच्छिमार आणि छोटे शेतकरी आहेत. दुर्दैवाने ही छोटी जमातदेखील नॉर्वे, स्वीडन, फिनलंड आणि सोव्हिएट युनियन या राष्ट्रात विभागली गेली आहेत. त्यांचा प्रमुख व्यवसाय रेनडियर पाळणे, आता उतरणीला लागला आहे. बरेचसे सामी लोक उद्योगधंद्यात आणि शासनयंत्रणेत नोकरी करत आहेत. १९८२ मध्ये या लोकांनी अल्टा नदीवर होणा-या धरणाला विरोध करून ती योजना हाणून पाडली. सुदैवाने नॉर्वे आणि स्वीडनची सरकारे, या लोकांना अनुकूल आहेत.

सामीप्रमाणेच इनुइट ( एस्किमो) जमातीचे लोकही कॅनडा, यु.एस. ए., ग्रीनलंड आणि सोव्हिएट युनियन या देशात विभागले आहेत. त्यांचे मुख्य व्यवसाय मच्छिमारी, शिकारी आणि अल्प प्रमाणात शेती, हे आहेत. मात्र अलिकडे काही जणांना उद्योगधंदे आणि शासनयंत्रणेतही नोक-या मिळाल्या आहेत. शिक्षणाच्या प्रसारामुळे जाणीव जागृती आणि सांस्कृतिक स्वातंत्र्याची भावना जागृत होण्यास मदत झाली आहे. हे लोक आता संघटित होत आहेत आणि आपले हक्क मिळविण्यासाठी लढा देत आहेत.

ऑस्ट्रेलियात १७८८ मध्ये बाहेरील देशातील लोकांच्या वसाहती होण्यास सुरूवात झाली. या वसाहती करणा-यांपैकी बरेचजण गुन्हेगार, स्वतःच्या देशातून हाकलून दिले गेलेले असे होते. ही वसाहत करणा-यांची संख्या झपाट्याने वाढली आणि तेथे असलेले मूळ रहिवासी आपल्या प्रदेशातून हाकलले गेले. त्यांचेवर होणा-या अनन्वित अत्याचारांमुळे त्यांची लोकसंख्या भराभर कमी होऊ लागली. हया मूळ रहिवासींची संख्या आता केवळ २,५०,००० एवढी असून ते भिन्न भिन्न जमातीत आणि प्रदेशांमध्ये विभागले गेले आहेत. बेकारांचे प्रमाण व आजाराचे प्रमाण हया आदिवासींच्या बाबतीत बिगर आदिवासींच्या प्रमाणापेक्षा पुष्कळच जास्त आहे. जरी वांशिक वर्चस्वाचा उघडपणे तिरस्कार केला जात असला तरी आजही अनेक गोरे ऑस्ट्रेलियन वांशिक वर्चस्वाचा पुरस्कार करतांना आढळतात. इतर देशातील आदिवासीप्रमाणेच ऑस्ट्रेलियातील आदिवासीही संघटित होत असून त्यांचे हक्क संरक्षणासाठी आणि त्यांच्या अस्तित्वाची दखल घेण्याची मागणी करत आहेत लढे देत आहेत. संघराज्याने नियुक्त केलेल्या वुडवर्ड आयोगाने अशी सूचना दिली की, आदिवासीसाठी खाण कंपन्यांनी कित्येक आदिवासींचे प्रदेश ताब्यात घेतले असून त्या ठिकाणी आता बिगर आदिवासी येऊन राहिले आहेत. राज्य सरकारे जरी लोकांच्या जमिनीच्या हक्काबाबत तोंडदेखील सहानुभूती दाखवत असले तरीखाणकाम बंद करण्यास तयार नाहीत. काही राज्य सरकारांनी आणि संघराज्यांनी या जमातींसाठी विकासाची कामे सुरू केली आहेत. जून १९८४ मध्ये ऑस्ट्रेलियन संसदेने आदिवासी परंपरागत हक्क संरक्षण कायदा, आदिवासी प्रदेशांचे आणि त्यांच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या गोष्टींचे संरक्षण करण्यासाठी व त्या टिकवण्यासाठी लागू केला. तरीही सरकारला या खाणकंपन्यांकडून प्रचंड कर मिळत असल्यामुळे खाणी बंद

करण्यास सरकार तयार नाही, त्यामुळे आदिवासींचे जमीन हस्तांतरण चालूच आहे.

कित्येक देशात वसाहत करणा-यांनी आदिवासींबरोबर कुठलेही करार न करता, त्यांच्या प्रदेशात रहाण्यास सुरूवात केली. मात्र १८४० मध्ये ब्रिटीश वसाहतवाल्यांनी न्यूझीलंडमधील माओरी जमातीच्या लोकांबरोबर करार केला आणि त्यांची जमीन जंगले, आणि मासे पकडण्याच्या जागांवरील त्यांचे हक्क पूर्णपणे मान्य केले. परंतु हा करार कधीच मंजूर केला गेला नाही व त्याला पूर्णपणे मान्यता मिळाली नाही. इतर देशांप्रमाणेच, हया वसाहत करणा-यांनी त्यांचेवर अत्याचार मात्र केले नाहीत. माओरी जमातीत जमिनींची खाजगी मालकी अस्तित्वात नव्हती. ही व हयाबरोबर इतर संकल्पना त्यांचेवर लादल्या गेल्या. वसाहत करणा-यांची संख्या झपाटयाने वाढत गेली आणि माओरींचा प्रदेश त्यांचेकडून हिसकावला गेला. हयाला खूप विरोध झाला. अनेक ठिकाणी जमिनीवरून युध्देही झाली. आज एकूण लोकसंख्येपैकी १० टक्के माओरी जमातीचे लोक असून, ते न्यूझीलंडच्या भूभागापैकी ४ टक्के भूभागाचे मालक आहेत. आता ते संघटित होत असून, समान हक्क व समान वागणूकीसाठी लढा देत आहेत.

युनायटेड स्टेट ऑफ अमेरिकेमधील आदिवासी जमाती -

अमेरिकेतील १५ लाख आदिवासी हे अमेरिकेच्या एकूण लोकसंख्येच्या अर्ध्या टक्क्यापेक्षा कमी भरतात. ते एकूण २५० जमातींमध्ये विभागले गेले आहेत. वसाहतीकरणाच्या प्रक्रियेत अतिशय मोठया प्रमाणातहालअपेष्टा त्यांना सहन कराव्या लागल्या. आजही हा भेदभाव काही प्रमाणात आढळत असून, आदिवासी जमातींना आपण वेगळे असल्याची भावना जाणवत असते. काही जमातींसाठी जमिनी आरक्षित असून त्या स्वायत्तता उपभोगू शकतात परंतु अनेक आदिवासी शहरात असुविधा किंवा विकासात्मक कामांची कमतरता, सहन करतात. दारूचे व्यसन आणि क्षयाचे प्रमाण बरेच आढळते. त्यापैकी बरेच लोक अर्धकुशल आणि अकुशल बिगारी काम या कमी रोजगाराचे काम करत असलेले आढळतात.

१८८७ मध्ये जमिनीवरची एकत्रित मालकी पूर्णपणे संपुष्टात येऊन जमिन, वैयक्तिक कुटुंबांना देण्यात आली. १९३४ मध्ये अधिक जमीन हस्तांतरण थांबविण्यासाठी 'इंडियन मान्यता कायदा' लागू करण्यात आला. हया कायद्यान्वये आदिवासींच्या जमिनीवरील त्यांची मालकी मान्य करण्यात आली आणि जमिनीच्या पूर्ण ताब्यासाठी आदिवासी शासन नेमणुकीबाबत सूचना करण्यात आली. इंडियन कामकाज खात्याकडे या आदिवासींच्या विकासकामात मध्यवर्ती भूमिका देण्यात आली.हया खात्याच्या आयुक्तांची जोपर्यंत आदिवासी लोकांना सहानुभूती होती, तोपर्यंतच त्या खात्याने चांगली कामगिरी बजावली.

शिक्षणाच्या प्रसारामुळे अनेक तरूण जागृत होऊ लागले व आदिवासींच्या अनेक संघटना स्थापन झाल्या. त्यांच्यासाठी आरक्षित असलेल्या जमिनीत अनेक मूल्यवान खनिजे होती आणि या आदिवासींच्या नेत्यांनी कानाडोळा केल्यामुळे अनेक मोठया खाण कंपन्यांनी या जमिनीत खोदकाम सुरू केले होते. नवीन स्थापना झालेल्या आदिवासी संघटनांनी या खोदकामास विरोध केला. या संघटनांपैकी अनेक संघटना लढाऊ वृत्तीच्या होत्या. संस्कृतीच्या बदलत्या साच्यात, एकत्रीकरण अपरिहार्य व अपेक्षित आहे. असे कित्येक गो-या अमेरिकनांना व काही आदिवासी संघटनांना वाटत होते परंतु अनेक आदिवासी लोकांना असेही वाटत होते की त्यांची संस्कृती इतरांपेक्षा भिन्न असून ती टिकविण्याचा त्यांना हक्क आहे. आदिवासी नेत्यांपैकी काही जण आंतरराष्ट्रीय मंचाचे काम करीत आहेत.

कॅनडामधील आदिवासी जमातीत, नोंदले गेलेले इनुइट मेटी आणि बिगर दर्जाच्या आदिवासींचा समावेश होत. नोंदले गेलेले आदिवासी आरक्षित प्रदेशात रहातात. पांढ-या लोकरीचे व्यापारी आणि स्थानिक आदिवासी यांचे वंशज म्हणजे मेटी जमातीचे लोक होत. काही लोक त्यांना आदिवासी मानतच नाहीत. परंतु मेटी जमातीची एक विशिष्ट भाषा आणि विशिष्ट संस्कृती असून, ते स्वतःला आदिवासी जमातीचे म्हणवून घेतात. १८८० च्या इंडियन कायद्याप्रमाणे आदिवासी जमातींची नोंदणी

होऊ लागली. शासन आणि आदिवासी जमातींमध्ये अनेक करारमदार करण्यात आले. इंडियन कामकाज खात्याकडे या जमातीच्या विकासाची जबाबदारी आहे. यू.एस.ए. प्रमाणेच कॅनडामध्येही या जमातीतील अनेक लोक मोठया प्रमाणावर बेकार आहेत किंवा कमी रोजगारावर काम करतांना आढळतात. त्यांचेमध्ये शिक्षणाचे प्रमाणही बरेच कमी आढळते. दारूचे व्यसन मोठया प्रमाणावर आढळते. अनेक आदिवासींनी आपला दर्जा झिडकारला असून, ते आपल्या आरक्षित प्रदेशाबाहेर पडले आहेत. काही प्रदेशात आदिवासी प्रमुख आढळतात. आदिवासी प्रदेश मूल्यवान खनिजांनी समृध्द असून त्या खनिजांच्या खोदकामास सरकार उत्तेजन देत असते. ह्यामुळे संघर्ष उभा राहिला असून, काही केसेसमध्ये न्यायालयाने आदिवासी जमातीच्या बाजूने निर्णय दिला आहे.

उदा. एका लांब पाईपलाईनच्या प्रकल्पात, आदिवासी संघटनांच्या आणि त्यांच्या बिगर आदिवासींमधील मित्रसंघटनांच्या संघटित विरोधामुळे फेरफार करावा लागला. स्वतंत्र राष्ट्रीयत्व मागणा-यांमध्ये कॅनडामधील आदिवासी जमाती आघाडीवर आहेत. त्यांच्या देशाच्या अधिराज्यास आणि त्यांच्या जमिनीवरील अधिकारास, कॅनेडियन सरकारने आणि आंतरराष्ट्रीय जमातींनी मान्यता द्यावी, असे त्यांना वाटते. कॅनेडियन सरकारने त्यांना अनेक सवलती दिल्या आहेत परंतु ते त्यावर समाधानी नाहीत. ----स्वतंत्र निर्णयाचा हक्क आणि जमिनीवरची संपूर्ण मालकी त्यांना देण्यास सरकार कबूल नाही. त्यांच्या जमिनीतील खनिजांची उपलब्धता, हे आहे.

पॅसिफिक महासागरातील अनेक बेटांवर आदिवासी जमातींच्या वस्त्या आहेत. युरोपमधील राष्ट्रांनी अमेरिका, जपान आणि ऑस्ट्रेलियन सरकारांनी हा प्रदेश, आण्विक चाचण्या करण्यासाठी आणि किरणोत्सर्गी अवशेष टाकून देण्यासाठी वापरण्यास सुरूवात केली. या बेटांवरील आदिवासी जमातींवर अधिकार जमवण्यासाठी, या देशांमध्ये स्पर्धा चालू आहेत. या जमाती मलेनेशियन, मायक्रोनेशियन आणि पॉलिनेशियन या तीन गटात विभागल्या जाऊ शकतात. नैऋत्य पॅसिफिकमधील बेटांवर आणि पापुआ बेटांवर, मलेनेशियन गटातील जमाती वस्ती करून आहेत. या बेटांचा पश्चिमेकडचा अर्धा भाग इंडोनेशियाने व्यापलेला आहे. मलेनेशियाच्या पूर्वेस असलेल्या पॉलिनेशियन बेटांपैकी कित्येक बेटे फ्रेंच वसाहतीच्या अधिकाराखाली आहेत. हवाई बेटे अमेरिकनांनी व्यापलेली आहेत. मलेनेशियाच्या उत्तरेला मायक्रोनेशिया येतो. यू.एस.ए. सरकार या बेटांवरील लोकांशी करारनामे करण्यास उत्सूक आहे. पॅसिफिकमधील या बेटांपैकी पापुआ गिनी बेट १९७५ मध्ये तर वानुआटु बेट १९८० मध्ये स्वतंत्र झाले. न्यू कॅलिडोनिया या फ्रेंचांनी वसाहत केलेल्या भूभागातील कनक ही आदिवासी जमात आपल्या स्वातंत्र्यासाठी झगडते आहे. हा भूभाग निकेलने समृध्द असून, फ्रेंच सरकारने या भागातील कनक जमातीचे प्रमाण कमी व्हावे म्हणून मोठया प्रमाणात बिगर आदिवासींच्या स्थलांतरास उत्तेजन दिले आहे. फ्रेंच शासन या भागाचा ताबा सोडण्यास अजिबात तयार नाही. अशाच प्रकारची स्वातंत्र्याची मागणी ही इतरही बेटांवरील आदिवासींकडून केली जाईल, अशी त्यांना भीती वाटते. या बेटांपैकी काही बेटे अमेरिकन सरकारच्या अखत्यारीखाली विश्वस्त विभाग म्हणून येतात. मोठमोठया आंतरराष्ट्रीय कंपन्यांकडून होणारे जंगलसाधनांचे आणि खनिजांचे अपहरणास आणि युरोप, यु.एस.ए. मधील लोकांचे या जमातींवर होऊ बघणा-या वर्चस्वास विरोध करण्यासाठी, या भूभागातील आदिवासी जमाती, एकत्र संघटित होत आहेत.

यानंतर लेखकाने भांडवलशाही देशातील आणि भांडवलशाही देशांच्या प्रभुत्वाखाली असलेल्या देशातील आदिवासी जमातींची परिस्थिती सारांशाने पुढीलप्रमाणे वर्णन केली आहे. यापैकी कित्येक देशांमध्ये राष्ट्रीय विकास प्रकल्पांमुळे, मूळ रहिवासी त्यांच्या परंपरागत भूभागांवरून हटविले जात आहेत. याचा परिणाम म्हणून, आपली विशिष्ट संस्कृती आणि आपली साधने टिकविण्यासाठी आदिवासी जमाती संघटित होत आहेत. आपल्या जमिनीबाबतच्या आणि संस्कृती टिकविण्याबाबतच्या हक्कांसाठी लढतांना, या

आदिवासी जमातींना कित्येकांच्या अव्याहत स्वार्थाला हितसंबंधांना तोंड द्यावे लागले.

आदिवासी जमिनींचा आर्थिक विकास ही बहुधा राष्ट्रीय योजना असते. आणि त्यामुळे शासनाचा पूर्ण ताबा त्यावर असतो. अनेकदा बहुराष्ट्रीय बँकांनी आणि बहुराष्ट्रीय संस्थांनी या प्रकल्पांना अर्थसाहाय्य केलेले असते. त्यामुळे या संस्थांचा आदिवासींच्या जमिनीचे अपहरण करण्यात सहभाग असतो. तसेच भांडवलशाही देशाच्या खाजगी जमिनीच्या मालकीबाबतच्या कल्पना, आदिवासी जमातींच्या कल्पनांच्या बरोबर विरोधी आहेत.

**समाजवादी देशांमधील आदिवासी जमाती -**

समाजवादी देशांमधील आदिवासी जमातींच्या परिस्थितीबाबत फार थोडी माहिती उपलब्ध आहे. या देशातील त्यांची लोकसंख्या एकूण दहा कोटी असून , त्यापैकी सहा कोटी सत्तर लाख आदिवासी एकटया चीनमध्ये रहातात.

सोव्हिएट रशियाच्या घटनेने अल्पसंख्याकांना विशेष दर्जा दिला असून, त्यांचे सामाजिक आणि सांस्कृतिक हक्क मान्य केले आहेत. सोव्हिएट संघराज्याची संकल्पना अनेक राष्ट्रांनी एकत्र येऊन स्वेच्छेने उभारलेले एक संघराज्य अशीच आहे. या घटनेत सामील झालेले प्रत्येक राज्य एक स्वतंत्र रिपब्लिक आहे आणि त्याला संघराज्यातून फुटून निघण्याचा हक्क आहे. मात्र हे झाले कागदी वर्णन. सोव्हिएट राज्यावर रशियन जमातीचे वर्चस्व आहे. सरकारने अतिशय जलद गतीचे औद्योगिकरण आणि आधुनिकीकरण ही धोरणे अंगिकारली आहेत. सोव्हिएट राज्यात शिक्षणाच्या सोयी सर्व लोकांना उपलब्ध आहेत. त्यामुळे इतर बिगर आदिवासी जमातींप्रमाणे आदिवासी जमातींच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीत खूपच सुधारणा झाली आहे. मात्र त्याबरोबर आदिवासी जमातींवर बरेच निर्बंधही लादण्यात आले आहेत. शेतीचे सामुदायीकरण झाले आहे आणि त्यामुळे शेतक-यांच्या एकूण जीवनमानावर त्याचा परिणाम झाला आहे. रशियात गुरे चारणा-या अनेक जमाती होत्या. त्यांचे एकत्रीकरण करून हे काम सरकारमार्फत करावे, असा निर्णय घेतला गेला. चुकची, एस्किमो यासारख्या भटक्या गुरे चारणा-या जमातींनी, आपली गुरे सरकारच्या ताब्यात देण्यापेक्षा ती मारून टाकणे पसंत केले. त्यामुळे मोठया प्रमाणावर पशुसंहार झाला. अनेक आदिवासींना दडपशाहीला तोंड द्यावे लागले. मध्य आशियातल्या विभागात गोरे, रशियन स्थलांतर करू लागले. त्यांनी तेथील उत्तम जमिनी बळकावल्या आणि स्थानिक आदिवासींची हकालपट्टी केली. सायबेरियात निकेल, टीन, कोळसा, तांबे, ॲल्युमिनीयम यांचे साठे मोठया प्रमाणावर आहेत, असे आढळून आल्यावर रशियानेतेथे मोठया प्रमाणावर खाणकाम सुरू केले. त्यासाठी त्या भागात अनेक लोकांचे स्थलांतर झाले. नवी शहरे वसवली गेली. नव्या रेल्वे सुरू झाल्या. त्याचबरोबर सरकारने तेथे लष्करी विमानतळे आणि अग्नीबाण प्रक्षेपण केंद्रे उभारली. लोकांच्या साक्षरतेत शिक्षणात आरोग्य व इतर सुविधात वाढझाल्यामुळे त्यांचे जीवनमान सुधारले. सर्वसाधारणपणे इतर समाजवादी देशातील आदिवासी जमातींपेक्षारशियातील आदिवासी जमाती शिक्षण व राहणीमान याबाबतीत अधिक पुढे गेल्या. मात्र काही प्रमाणात त्यांना मुख्य प्रवाहाशी सामावून घ्यावे लागले.

मंगोलियातील परिस्थिती जवळजवळ रशियातील परिस्थितीसारखीच आहे. परंतु मंगोलियातील भटक्या पशुचारण जमातींची संख्या खूपच मोठी आहे. त्यामुळे त्यांच्या परिस्थितीत बदल झाला नाही.

चीनमधील आदिवासी जमातींची संख्या सुमारे ६,७०,००,००० आहे. मात्र त्या वेगवेगळया जमातीत आणि विभागात विखुरल्या गेल्या आहेत. त्यापैकी काही जमाती परंपरागत पशुपालन करणा-या आहेत. काही भटक्या आहेत तर काही स्थिर शेती करणा-या आहेत. यापैकी काही जमाती अतिशय दुर्गम, डोंगराळ विभागात रहातात. बिगर आदिवासी हान समाज हा चीनमधील प्रभावी समाज आहे. समाजवादी क्रांतीनंतर सरकारने सर्व राष्ट्रगटांना समान जाहीर केले आणि कोणत्याही जमातीविरूध्द दुजाभाव करण्यास किंवा तिचे आणि शोषण करण्यास प्रतिबंध केला. वेगवेगळया स्वयंचलित संस्था उभारण्यात आल्या. जलद गतीने झालेल्या

आर्थिक विकासाचे फायदे इतर जमातींसारखेच आदिवासी जमातींनाही मिळाले. मात्र त्यामुळे आदिवासी जमातींच्या इतर जमातींबरोबरच्या एकत्रीकरणाला सुरूवात झाली. हान लोक सर्व देशभर पसरले. त्यामुळे तिबेटसारख्या अनेक ठिकाणी आदिवासी, बिगर आदिवासींबरोबर रहाणे क्रमप्राप्त आहे, असे मानू लागले तर काही ठिकाणी त्यातून संघर्ष उभे राहीले. थोडक्यात आदिवासी जमातींबाबतच चिनी सरकारचे धोरण म्हणजे आदिवासींना शिक्षित करून आणि हान लोकांची आदिवासी विभागात वस्ती करून त्यांना मुख्य राष्ट्रीय प्रवाहात सामील करून घ्यावे, ही आहे.

निकारागुआमधील अंतर्गत युध्दामुळे मिस्कीटो लोक विचित्र परिस्थितीत सापडले. क्रांतीविरोधी लोकांना मिस्कीटो साहाय्य करतात, असे समाजवादी राज्यकर्त्यांना वाटले. शेजारच्या होंडुरास बेटांवर अनेक जण स्थलांतर करते झाले. मात्र मिस्कीटोंच्या संरक्षणाबाबत, शासनाने घटनेतच निश्चिती दिली आहेत्यामुळे पुन्हा काहीजण निकारागुआमध्ये परतले. सरकारने त्यांना मोठया प्रमाणावर स्वायत्तता दिली आहे.

अशा प्रकारे समाजवादी देशांमधील आदिवासी जमातींची भौतिक परिस्थिती सुधारलेली आढळते. हया जमातींमध्ये शिक्षणाचा प्रसार बराच झालेला आढळतो तरीही समाजवादी सरकारे त्यांना आदिम व भांडवलशाहीपूर्व परिस्थितीतील समजत असल्यामुळे आजही त्यांना काही प्रमाणात दुजाभाव सहन करावालागतो. ही सरकारे औद्योगिकीकरण करू इच्छितात आणि औद्योगिकीकरणाच्या आणि आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत आदिवासी जमाती समाजाच्या मुख्य प्रवाहाशी एकरूप होत आहेत.

## आंतरराष्ट्रीय चित्र -

गेल्या दोन दशकात विकसनशील देशात सुरू केल्या गेलेल्या मोठया विकासात्मक प्रकल्पांमुळे आदिवासी जमाती मोठया प्रमाणावर स्थानभ्रष्ट झाल्याचे आढळून येते. यापैकी अनेक प्रकल्पांना जागतिक बँकेने अर्थसाहाय्य दिले आहे. जागतिक बँकेची स्थापना १९४४ साली झाली आणि तिचा मुख्यउद्देश, विकसनशील देशातील प्रकल्पांना साहाय्य करून तेथील जनतेच्या जीवनमानात वाढ करण्यास मदत करणे, हा होता. जागतिक बँक, जलद आर्थिक विकास हाच मुख्य उद्देश मानून स्थानिक आदिवासींच्या परिस्थितीकडे लक्ष देत नाही, असा आरोप वारंवार करण्यात आला. बँकेने ग्वाटेमालातील जलविद्युत निर्मिती प्रकल्पांना साहाय्य केले. या प्रकल्पामुळे अनेक माया लोकांना स्थलांतर करावे लागले. इंडोनेशियामधील लोकसंख्येच्या पुनर्वसाहत कार्यक्रमाला बँकेने साहाय्य केले. या कार्यक्रमाला वेस्ट पापुआमधील आदिवासींनी प्रचंड विरोध केला. फिलिपाईन्समधील अनेक धरणांचासमावेश असलेल्या एका मोठया प्रकल्पाला जागतिक बँकेने साहाय्य केले. स्थानिक आदिवासींच्या विरोधामुळे या प्रकल्पात बदल करावे लागले. भारतातील नर्मदासागर आणि सरदारसरोवर प्रकल्पामुळे अनेक आदिवासी आणि बिगर आदिवासी कुटुंबांना स्थलांतर करावे लागणार आहे. या प्रकल्पासही जागतीक बँकेचे साहाय्य आहे. जागतिक बँकेच्या कार्यक्रमावर केल्या जाणा-या टीकेला उत्तर म्हणून बँकेने १९८२ मध्ये 'आदिवासींविषयीचे बँकेचे धोरण' या नावाचे पुस्तक प्रसिध्द केले. मात्र अजूनहीआदिवासी व त्यांचे मित्र बँकेचे हे धोरण दाखवण्यापुरतेच आहे, ते अंमलात येत नाही,अशी टीका करतात. अशीच टीका विकसनशील देशातील प्रकल्पांना आर्थिक साहाय्य देणा-या इंटर अमेरिकन डेवलपमेंट बँक आणि एशियन डेवलपमेंट बँक यांच्या बाबतीतही करण्यात आली आहे.

बहुराष्ट्रीय कंपन्या अनेक देशात विविध प्रकारच्या खाणी चालवीत आहेत. त्याचे अतिशय विपरीत परिणाम आदिवासी जीवनावर होत आहेत. ही गोष्ट बोलिव्हिया, चिली, पेरू यासारख्या दक्षिण अमेरिकेतील देशात जास्त आढळते. मांसाचा पुरवठा करता यावा, यासाठी अमेरिकेतील अनेक कंपन्यांनी मोठमोठी पशुपालन केंद्रे उभारली आहेत. या केंद्रामुळे कित्येक आदिवासींना आपल्या जागेसमुकावे लागले आहे. यापैकी काही प्रकल्पाना स्थानिक रहिवाशांनी विरोध केला. अशा प्रकारच्या खाजगी आणि सार्वजनिक

प्रकल्पांचे आदिवासी जमातींवर काय परिणाम झाले आहेत, याचा अभ्यास करायची वेळ आली आहे.

**आंतरराष्ट्रीय कृती -**

अलिकडच्या काही वर्षात, आदिवासींच्या संस्कृतीवर होणा-या अतिक्रमणाविरोधी, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक संघटना स्थापन झाल्या आहेत. आदिवासींच्या या लढयाला अनेक बिगर-शासकीय संघटनांचादेखील पाठिंबा आहे. हा लढा पुढे नेण्यासाठी आंतरराष्ट्रीय संघटना कसे प्रयत्न करीत आहेत, हे बघणे उद्‌बोधक ठरू शकेल.

युनोच्या कित्येक घटक संघटनांनी त्यांच्या लोकांचे हक्क सुरक्षित रहावेत, यासाठी आंतरराष्ट्रीय आचारसंहिता बनवल्या आहेत. हया संहितेमुळे आदिवासी जमातींचे हक्क सुरक्षित रहाण्यास मदत होते. १९७६ मध्ये नागरी आणि राजकीय हक्कांबाबतची एक आंतरराष्ट्रीय संहिता बनविण्यात आली. या संहितेत असे जाहीर करण्यात आले की, सर्व लोकांना स्वयंनिर्णयाचा हक्क असून, त्या हक्काव्दारे प्रत्येक आपला राजकीय दर्जा ठरवू शकतो. तसेच त्यांचा आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकास करून घेऊ शकतो. मानवी हक्क आयोगाने १९४७ साली अल्पसंख्याकांचे संरक्षण आणि त्यांच्या बाबतीतील भेदाभेदाला प्रतिबंध करण्यासाठी एक उपआयोग स्थापन केला. हया उपआयोगाने १९७२ मध्येआदिवासी जमातींच्या बाबतीत होणा-या भेदाभेदांच्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी एक खास समिक्षक नेमला. हया समिक्षकाने जगातील आदिवासींच्या परिस्थितीबाबत दिलेला अहवाल सर्वसमावेशकअसा आहे. हा अहवाल प्रसिध्द झाल्यावर आदिवासी समाजाविषयी एकाकार्यगटाची स्थापना केली गेली.आदिवासी जमातींच्या विकासाचे परिक्षण करण्यासाठी हा कार्यगट नियमितपणे बैठका आयोजित करतो.आदिवासी जमातींच्या संरक्षणासाठी काही नियमसंहितेचा मसुदा तयार करावा, असे या गटाला सांगण्यात आले आहे. या गटाच्या वार्षिक बैठकीस विविध देशातील आदिवासींचे प्रतिनिधी आणि मित्रसंस्थांचे प्रतिनिधी जमतात. त्यामुळे जगाच्या वेगवेगळया विभागातील आदिवासी नेते एकत्र येण्यास मदत झाली आहे. आदिवासी लोकांच्या समस्येकडे लक्ष देणारी आंतरराष्ट्रीय मजूर संघटना ही पहिली आंतरराष्ट्रीय संघटना आहे. १९५३ मध्ये या संघटनेने आदिवासी कामगारांच्या कामाच्या व राहण्याच्या परिस्थितीसंबंधी एक विस्तृत अहवाल प्रसिध्द केला. १९५७ मध्ये आदिवासी आणि इतर जमातींच्या लोकांचे रक्षण करण्यासाठी एक आचारसंहिता प्रसिध्द केली. या आचारसंहितेला २६ देशातील सरकारांनी मंजुरी दिली. परंतु या संहितेचा उद्देश आदिवासी समाजाचे इतर समाजाबरोबर सामीलकीकरण करणे, असा आहे अशी टीका त्यावर करण्यात आली. त्यामुळे ही संहिता दुरूस्त करून जून १९८९ मध्ये आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेने एक सुधारित संहिता स्वीकारली आहे.

अलिकडे अनेक देशातील चर्चेसनी धर्मातरावर भर देण्यापेक्षा आदिवासी लोकांच्या हक्कसंरक्षणावर भर देणे सुरू केले आहे. आदिवासी समाजाच्या प्रश्नांचा अभ्यास करणारे, त्यावर संशोधन करणारे, आणि आदिवासींना त्यांच्या जीवनावर व संस्कृतीवर होणा-या आक्रमणाविरूध्द संघटित करणारे अनेक बिगर सरकारी गट निर्माण झाले आहेत. यातील काही गट तर आदिवासींचे प्रश्न आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर मांडत आहेत. इंग्लंडमधील 'ॲंटी - स्लेव्हरी सोसायटी ' आणि 'सर्व्हायव्हल इंटरनॅशनल', हॉलंड आणि डेन्मार्कमधील 'इंटरनॅशनल वर्किंग ग्रुप ऑन इंडिजिनस अफेअर्स' हे त्यापैकी प्रमुख म्हणून सांगता येतील. यापैकी काही गटांना युनोच्या काही विभागांची मान्यता मिळालेली आहे.

**पश्चिमेस पडसाद -**

विकासाच्या वाढत्या आणि अटळ शक्तींनी आदिवासींच्या जमिनी त्यांच्याकडून हिरावून घेतल्या आहेत. त्यांच्या ब-याचशा एकाकी जगातून त्यांना गावात व शहरात ढकलले आहे. त्यांची संस्कृती, चालीरीती बदलणे त्यांना भाग पडले आहे. स्थानिक आदिवासींच्या विरोधामुळे काही वेळेला काही ठिकाणी, अशा प्रवृत्तींना तात्पुरता आळा बसला आहे. मात्र एका बाजूला सरकारे, बँका, बहुराष्ट्रीय कंपन्यांसारख्या प्रबल संस्था आणि दुस-या बाजूला अल्पसंख्य आदिवासी

यांच्यातील संघर्ष चालू आहे. अनेक ठिकाणी आदिवासी जमातीत जाणीवतेची पातळी कमी आहे. याउलट विकसनशील आणि विकसित राष्ट्रातील बहुसंख्य लोक, विकासाच्या प्रक्रियेत आदिवासींची जीवनपध्दती बदलणे अटळ आणि इष्ट आहे, असे मानतात. आदिवासी जमाती विकासाच्या विरूध्द नाहीत. मात्र त्यांच्या मते विकासामध्ये भौतिक साधनांपेक्षा व्यक्तींचा विचार अधिक व्हावयास हवा. पृथ्वी मानवाच्या मालकीची नसून मानव पृथ्वीचा भाग आहे, असा आदिवासी दृष्टीकोन आहे.

प्रस्तृत ग्रंथाच्या सुरूवातीसच या ग्रंथांचा उद्देश जगातील आदिवासींच्या परिस्थितीचा एक व्यापक आढावा घेणे हा आहे असे नमूद केले आहे. लेखकाने विकासाचे आदिवासी जीवनावर होणारे चांगले व वाईट परिणाम वर्णन केले आहेत. विकासाची प्रक्रिया सोडून दिली जाईल किंवा थोडीफार बदलली जाईल अशी शक्यता वाटत नाही. काही विचारवंत विशेषत: पर्यावरणवादी, टिकून राहील अशा रितीने विकास व्हावा असे मत मांडतात. परंतु आजतरी त्यांचा प्रभाव नगण्य आहे. सर्व जगात अधिकाधिक वस्तूंसाठी चांगल्या राहणीमानासाठी अशा अपेक्षा वाढत आहेत. अशावेळी बहुसंख्य लोक त्यांची जीवनपध्दती सुधारून साधी राहणी स्विकारण्यास तयार होतील, असे वाटत नाही.

अलिकडे स्वतंत्र झालेले देश, आपला भूभाग एकत्रित राखण्यात फार जागरूक आहेत. हे देश आदिवासी जमातींना स्वायत्तता देतील असे वाटत नाही. स्वायत्ततेचा शेवट स्वतंत्र देश मागण्यात होईल, अशी भीती या देशातील सरकारांना व लोकांना वाटेल. सोव्हिएट रशियामधील विविध वंशाच्या लोकांनी केलेल्या स्वांतत्र्याच्या मागणीमुळे ही भीती अधिकच वाढली आहे. एकंदरीत वातावरण आदिवासींच्या आणि विशेषत: त्यांच्या स्वायत्ततेच्या मागणीविरूध्दच आहे. अशा परिस्थितीत आदिवासी नेत्यांना तसेच आदिवासी समाजाच्या इतर गटांना लोकमत आपल्या बाजूला वळवून घेण्यासाठी फार प्रयत्न करावे लागतील. ज्यूलियन बर्गर यांनी, असे प्रयत्न करण्यासाठी भरपूर माहिती एकत्रित करून, प्रसिध्द केली आहे. याबद्दल सर्व जगातील आदिवासी जमाती आणि आदिवासीजमातींचे मित्र, त्यांचे ऋणी राहतील.

# वनविनाश आणि मानव

अतिशय द्रुत गतीने होणारा प्रचंड वनसंहार आणि त्याचे मानवी जीवानावर होणारे परिणाम याविषयी अनेक अभ्यास आजवर प्रसिध्द झाले आहेत. त्याशिवाय पर्यावरणविषयक अभ्यासात वनविनाशाचा अंतर्भाव जवळजवळ सर्वच ठिकाणी आहे. मानवी जीवनाशी निगडीत अशा काही महत्वाच्या प्रश्नांचा अभ्यास करून जनमत तयार करण्यासाठी जुलै १९८३ मध्ये एक स्वतंत्र आयोग स्थापण्यात आला.

'इंडिपेडंट कमिशन ऑन इंन्टरनॅशनल ह्युमॅनिटेरियन इशूज' असे या आयोगाचे नांव असून, त्याची स्थापना काही व्यक्तींनी मिळून केलेली आहे. या आयोगातर्फे काही अहवाल प्रसिध्द करण्यात आले आहेत. त्यापैकी 'दि व्हॅनिशिंग फॉरेस्ट' या अहवालाचा थोडक्यात परिचय करून देण्याचा हा प्रयत्न आहे.

**वनविनाश-**

जगातील वनविनाशाचे प्रमाण अतिशय प्रचंड असून, दर वर्षी जगातील एकूण ०.६% वनांचा संहार होतो असा अंदाज आहे. हे प्रमाण उष्ण कटिबंधाच्या प्रदेशात तर अधिकच जास्त आहे. जगात सुमारे १४कोटी लोक बंदिस्त किंवा दाट म्हणता येतील अशा वनात किंवा सभोवताली रहातात. याच वनांचा संहार झपाटयाने होऊ लागला आहे. त्या दृष्टीने या अहवालात चार प्रमुख प्रश्न उपस्थित केले आहेत ते पुढीलप्रमाणे---

१. वृक्षाच्छादित वन जमिनींचा उपयोग इतर आर्थिक कामांसाठी करणे शहाणपणाचे ठरेल काय?

२. वनविनाशामुळे जैविक संपत्तीचा मोठया प्रमाणावर विनाश होत आहे. त्यामुळे पृथ्वीवरील हवामानात बदल होऊन आपण एक भयानक संकट निर्माण करत आहोत का?

३. वनविनाशाचा आदिवासी जमातींवर कोणते परिणाम होतील? त्यांची वसतीस्थाने व जीवनपध्दती नष्ट होतील काय?

४. वनसंवर्धनासाठी स्थापण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय संस्थांच्या कार्याचे स्वरूप काय असावे?

वनविनाशामुळे जमीन संपादन करण्यासाठी वृक्ष तोडणारे आणि तेथे विस्तीर्ण पशुपालन केंद्रे चालवणारेएका बाजूला तर या वनात वास करणा-या आदिवासी जमाती दुस-या बाजूला असे तीव्र संघर्ष ठिकठिकाणी उभे राहिले आहेत. वनविनाशामुळे पर्यावरण संतुलन बिघडत असून त्याचे भीषण परिणाम भावी काळात जाणवणारे आहेत. वनविनाशामुळे जळण, चारा व रानटी फळे व कंदमुळे गोळा करणा-या लोकांवरील विशेषत: महिला व मुलांवरील कामाचा भार अधिक वाढला आहे. या छोटया अहवालात एकूण चार प्रकरणे आहेत. पहिल्या प्रकरणात वनविनाशामुळे उष्ण कटिबंधातील लोकांच्या जीवनावर होणा-या परिणामांचे वर्णन आहे. दुस-या प्रकरणात जगातील विविध प्रकारची जंगले आणि त्याचे महत्व स्पष्ट करण्यात आले आहे. तिस-या प्रकरणात आर्थिक विकासात कोणते बदल केल्यास वनात रहाणा-या लोकांच्या जीवानमानात सुधारणा करता येईल आणि वनसंपत्तीचे रक्षण करता येईल.चौथ्या प्रकरणात वनविनाशामुळे वनात रहाणा-या आदिवासी किंवा स्थलांतरित लोकांच्या आरोग्यविषयी कोणते प्रश्न निर्माण झाले आहेत याविषयी माहिती आहे.

**१. मानवी जीवनावरील परिणाम-**

वनविनाशामुळे वनात रहाणारे लोक वनात स्थलांतर करणा-या लोकांच्या संपर्कात येतात. त्यामुळे त्यांच्यात तोवर प्रचलित नसलेले नवीन रोग पसरू लागतात. त्याचवेळी वनात नव्याने स्थलांतर करणा-या लोकांना नवीन रोगाची लागण होते. वनविनाशामुळे वनातील उंदीर, घुशी व इतर सरपटणारे प्राणी यांच्या जीवन पध्दतीत बदल होऊन त्यांच्या संपर्कातून नवीन रोगाची लागण होते. वनात शेती व वृक्षतोड करण्यासाठी मोठया संख्येने लोक येतात. त्यांच्यासाठी निर्माण झालेल्या वसाहतीत अस्वच्छता असते.

वनविनाशामुळे जमिनीची धूप वाढते आणि पाणी साठवण्याची क्षमता कमी होते. याचा अनिष्ट परिणाम शेती उत्पादनावर होतो. ही

गोष्ट अनेक आफ्रिकन राष्ट्रांच्या बाबतीत प्रकर्षाने दिसून आली असून वाळवंटाचे प्रसरण आणि दुष्काळ यांनी या राष्ट्रातील लोकांचे जीवन संकटात आणले आहे.

जगातील अनेक विभागात लोकसंख्या झपाटयाने वाढत आहे. त्यामुळे लोकसंख्येची घनता कमी असलेल्या वनविभागात लोकांच्या स्थलांतराला सरकार पाठिंबा देत आहे. त्यामुळे वनात रहाणाऱ्या छोटया जमाती आणि बाहेरील लोक यांच्यातील संघर्ष वाढून काही जमाती समूळ नष्ट झाल्या आहेत. अशी परिस्थिती प्रामुख्याने ॲमॅझॉन प्रदेशातील राष्ट्रांच्या बाबतीत निर्माण झाली आहे. वनविनाशामुळे मोठया नद्यांना येणाऱ्या पुरांच्या प्रमाणात वाढ झाली असून प्राणहानी आणि वित्तहानी यांचे प्रमाण सारखे वाढत आहे.

## २. उष्ण कटिबंधातील वने-

उष्ण कटिबंधातील २ कोटी ९० लाख चौरस किमी क्षेत्रावर वनाच्छादन आहे. त्यापैकी १ कोटी दहा लाखघनदाट म्हणता येतील अशी आहेत, एक कोटी चाळीस लाख किमीवर कमी दाट वने आहेत तर चाळीस लक्ष किमी जमिनीवर अतिशय तुरळक पध्दतीने वृक्षाच्छादित आहेत. उष्ण कटिबंधातील वनात प्राण्यांच्या पक्ष्यांच्या व वृक्षांच्या अनेकविध जाती आहेत. वनविनाशामुळे यातील अनेक जाती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. आणि याचे निश्चित परिणाम कालांतराणे जाणवणार आहेत. वनविनाशाची मुख्य कारणे वनजमिनीवरील शेती, औद्योगिक वापरासाठी वृक्षतोड, पशुपालन केंद्रे आणि जळण व इतर उपयोगासाठी वृक्षतोड ही आहे. आधुनिकीकरण आणि औद्योगिकीकरण याबरोबर वनोपजीवी वस्तूंची मागणी वाढली असून त्यामानाने वनसंवर्धनात वाढ झालेली नाही. वनात रहाणाऱ्या आदिवासी जमातींनीआजवर त्यांची जीवनपध्दती, तेथील हवामान, वृक्ष व पशुपक्षी संपत्ती यांना अनुरूप अशी ठेवली होती . वनसंहारामुळे अशी जीवनपध्दती चालविणे अशक्य झाले आहे.

## ३. वनसंवर्धन-

आंतरराष्ट्रीय संस्थांच्या पुढाकाराने व स्थानिक सरकारच्या उत्तेजनाने वनसंवर्धनाचे लहान मोठे असे विविध प्रकल्प राबवतांना त्यांची आखणी अतिशय काळजीपूर्वक केली पाहिजे. असे प्रकल्प स्थानिक आदिवासींना धोकादायक वाटता कामा नयेत. तसेच ते तेथील भौगोलिक परिस्थितीशी जुळणारे असले पाहिजेत. (प्रकल्पाची आखणी करतांना व तो राबवितांना अशी काळजी न घेतल्यास काय होते याचे उदाहरण म्हणून बस्तंर मधील महत्वाकांक्षी प्रकल्पाचा उल्लेख करता येईल. हा प्रकल्प जागतिक बॅंकेच्या अर्थसहाय्यावर आधारित होता. हा प्रकल्प का अयशस्वी झाला याचे सविस्तर वर्णन ' दि अवरऑफ दि फॉक्स ' या पुस्तकात करण्यात आले आहे. )

अहवालात या दृष्टीने काही सूचना करण्यात आल्या आहेत. प्रकल्प विभागात वस्ती करणाऱ्या उंदीर, घूशी व सरपटणाऱ्या प्राण्यांची पहाणी तेथील जलनिःसारणाच्या पध्दतीची पहाणी आणि तेथे रहाणाऱ्या जमातींच्या जीवनमानाचा सखोल अभ्यास, या त्यापैकी प्रमुख सूचना आहेत.

अशा तऱ्हेने प्रकल्पाच्या विभागातील मानवी व पर्यावरणीय परिस्थितीचा अभ्यास करून त्याच्याशी जुळतील असे प्रकल्पच यशस्वी होतील आणि वनसंवर्धनाचा कार्यक्रम पुढे जाईल, असे या अहवालात शेवटी नमूद करण्यात आले आहे.

टीपा -:

१. दि व्हॅनिशिंग फॉरेस्ट : प्रकाशक झेड बुक्स, लंडन १९८६.

२. दि अवर ऑफ दि फॉक्स : लेखक रॉबर्ट ॲन्डरसन व वॉल्टर ह्यूबर

प्रकाशक - विस्तार पब्लिकेशन, नवी दिल्ली १९८८.

# आंतरराष्ट्रीय मजूर संघटना आणि आदिवासी जमाती

आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेने जून १९८९ मध्ये आदिवासींविषयी एक आचारसंहिता मान्य केली. या संहितेचा क्रमांक १९८९ ची १६९ वी आचारसंहिता असा आहे. सर्व जगातील आदिवासींच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय दृष्ट्या मान्य केलेली ही पहिलीच आचारसंहिता आहे. त्या दृष्टीने ती अतिशय महत्वाची आहे. या आचारसंहितेचा स्वैर अनुवाद प्रस्तुत लेखाच्या परिशिष्टात दिला आहे. मात्र त्याआधी ही आचारसंहिता स्वीकारण्यापूर्वीचे विविध प्रयत्न समजावून घेणे आवश्यक आहे.

**पार्श्वभूमी -**

आंतरराष्ट्रीय मजूर संघटना ही जिने आदिवासींच्या प्रश्नांकडे लक्ष दिले आहे अशी पहिली आंतरराष्ट्रीयसंघटना होय. १९२१ साली संघटनेने आदिवासींच्या कामगारांची परिस्थितीची पहाणी केली. १९२६ साली संघटनेने आदिवासी कामगारांच्या रक्षणासाठी आंतरराष्ट्रीय नियम बनवावे म्हणून एक तज्ञ समिती नेमली. त्यानंतर संघटनेने आदिवासी कामगारांच्या हितासाठी अनेक नियमावल्या बनवल्या. १९५३साली संघटनेने आदिवासी लोकांच्या कामासंबंधी आणि जीवनासंबंधी एक विस्तृत अभ्यास प्रसिध्द केला. जून १९५७ मध्ये आदिवासी समाजाच्या रक्षणासाठी आणि इतर समाजात त्यांचे सामीलीकरण व्हावे, यासाठी एक आचारसंहीता बनवली. ही संहिता '१९५७चे १०७ क्रमांकाचे कन्व्हेन्शन' म्हणून ओळखली जाते. जून १९८९ मध्ये सुधारित आचारसंहिता बनेपर्यंत १९५७ ची आचारसंहिता ही आदिवासींच्या प्रश्नांकडे विशेष लक्ष देणारी पहिली आंतरराष्ट्रीय संहिता होती. त्यामुळे या संहितेतील काही महत्वाच्या गोष्टी वर्णन करणे आवश्यक आहे.

**आदिवासी जमातीसंबंधीची आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेची आचारसंहिता (कन्व्हेन्शन १०७)**

या आचारसंहितेत एकूण ३७ कलमे असून ती ८ विभागात विखुरली आहेत, त्यात भूमिविषयक धोरण, कामाची परिस्थिती, व्यावसायिक शिक्षण, ग्रामीण उद्योगधंदे, सामाजिक सुरक्षा, शिक्षण आणि आरोग्यव्यवस्था यांचा समावेश आहे. १९५७ साली आदिवासींच्या संघटना फारशा नव्हत्या. आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांची जाणही नव्हती. त्यामुळे ही आचारसंहिता बनवितांना आदिवासींचा त्यातकाहीही सहभाग नव्हता. त्या आचारसंहितेत आदिवासी समाजाचे अखेरीस इतर समाजाबरोबर सामीलीकरण व्हावे, असा दृष्टीकोन स्वीकारण्यात आला. आचारसंहितेचा आदिवासींकडे पहाण्याचा दृष्टीकोन सहभागापेक्षा दयेचा किंवा सहानुभूतीचा होता. या आचारसंहितेच्या सूरूवातीसच आदिवासी समाजाचा विकास होऊन ते बिगर आदिवासींच्या बरोबरीला यावेत आणि एकूण समाजाशी एकरूप व्हावेत, असे म्हटले आहे.

आचारसंहितेच्या पहिल्या भागात आदिवासींविषयी एकूण धोरण काय असावे, याविषयी मार्गदर्शन आहे. आदिवासींचा आर्थिक विकास घडवून आणणे आणि ते इतर समाजाशी एकरूप होतील, हे पहाणे, हे स्वतंत्र राष्ट्रांच्या सरकारचे कर्तव्यच आहे. आदिवासी संस्कृतीच्या रक्षणासाठी काही खास कायदे लागतील. आदिवासीना इतर समाजाबरोबर आणण्यासाठी विकासाच्या विशेष योजना आखाव्या लागतील हे करतांना आदिवासींच्या पारंपारिक चालीरितींकडे लक्ष दिले जावे.

दुसऱ्या विभागात आदिवासींच्या जमीनविषयक हक्कांविषयी मार्गदर्शन आहे. आदिवासींचे जमीनीवरील वैयक्तिक आणि सामुदायिक हक्क मान्य केले पाहिजेत. आदिवासींना त्यांच्या वसतीस्थानापासून, त्यांची संमती घेतल्याशिवाय हलविण्यात येऊ नये आणि असे स्थलांतर सुध्दा राष्ट्रीय सुरक्षा आणि राष्ट्रीय विकास किंवा आदिवासींचे आरोग्य अशा गोष्टींशी निगडीत असलेल्या कारणांपुरतेच मर्यादित असावे. काही कारणामुळे आदिवासींना हलविणे भाग पडल्यास त्यांना ते उपभोगीत असलेल्या जमिनीएवढयाच दर्जाच्या जमिनी देण्यात याव्यात आणि त्यांच्या प्रचलीत गरजा आणि भावी विकासाच्या योजना पुऱ्या होतील, असे पहावे.

तिस-या भागात आदिवासींची नोकरीत भरती आणि कामाच्या ठिकाणची परिस्थिती याविषयी कोणत्याहीप्रकारचा भेदभाव केला जाऊ नये, असे स्पष्टपणे नोंदले आहे.

चौथ्या भागात आदिवासींना व्यावसायिक शिक्षण देण्याची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. त्यांचे हस्तव्यवसाय आणि ग्रामीण उद्योग यांना संरक्षण दिले पाहिजे, असेही नमूद केले आहे.

पाचव्या विभागात आदिवासींसाठी पुरेशी सामाजिक सुरक्षा व आरोग्यव्यवस्था असावी असे प्रतिपादन केले आहे.

सहाव्या विभागात, आदिवासी समाजात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी विशेष प्रयत्न केले पाहिजे असे प्रतिपादन केले आहे. शक्य तेथे सुरूवातीला आदिवासी मुलांना त्यांच्या मातृभाषेतून लिहिणेवाचणे शिकवण्याचा प्रयत्न करावा.

सातव्या विभागात राष्ट्रीय सरकारांनी, या संहितेच्या अंमलबजावणीसाठी विशेष यंत्रणा उभारली पाहिजेअसे प्रतिपादन केले आहे.

आठव्या विभागात आचारसंहितेला राष्ट्रीय सरकारांनी द्यावयाची मंजुरी, अंमलबजावणीची यंत्रणा वगैरे कामकाजाविषयक गोष्टींचे स्पष्टीकरण आहे.

## आचारसंहितेला मंजूरी आणि विरोध-

प्रत्यक्षात फक्त २६ देशाच्या सरकारांनी या आचारसंहितेला मंजुरी दिली. त्यात भारत सरकारचा समावेश होता. १९८० नंतर आदिवासींच्या वेगवेगळया संघटनानी या संहितेतील सामीलीकरणवादी आणि भूतदयावादी दृष्टीकोनाविरूध्द निषेध करावयास सुरूवात केली. १९८२ मध्ये आदिवासी समस्यांचा अभ्यास करणारा कार्यगट स्थापण्यात आला आणि दरवर्षीच्या ऑगस्ट महिन्यात त्याच्या बैठका भरू लागल्या. या बैठका सर्व आदिवासी संघटनांना आणि व्यक्तींना खुल्या असल्यामुळे त्यात भाग घेण्यासाठी विविध देशातून आदिवासी आणि त्यांचे मिळगट येऊ लागले. या सर्वांनी ही आचारसंहिता बदलली पाहिजे असे आग्रहाचे प्रतिपादन केले. आणि अखेरीस आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेने ही मागणी मान्य केली.

## संहिता दुरूस्तीची प्रक्रिया-

१९८६ मध्ये आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेने १०७ क्रमांकाच्या आचारसंहितेला सुधारणा सुचविण्यासाठी तज्ञांची एक समिती नेमली. या समितीत 'वर्ल्ड कौन्सिल ऑफ इंडिजिनस पीपल' तसेच आदिवासी प्रश्नांचा अभ्यास करणारी 'सर्व्हायव्हल इंटरनॅशनल' यांचे प्रतिनीधी घेण्यात आले. समितीची बैठक सप्टेंबर १९८६ मध्ये जिनिव्हा येथे झाली. या समितीने आचारसंहितेतील विविध कलमात अनेक दुरूस्त्या सुचविल्या. या दुरूस्त्यानंतर सरकारे, ऊद्योजक आणि कामगार यांच्या संघटना यांच्याकडे विचारासाठी पाठविण्यात आल्या. आणि त्यांच्याकडून प्रतिक्रिया मागविण्यात आल्या. अशी प्रतिक्रिया व्यक्त करतांना भारत सरकारने काही खास विचार व्यक्त केले. सरकारने जमातींच्या लोकसंख्येविषयी एकता आणि त्यांचे सांस्कृतिक रितीरिवाज धार्मिक श्रध्दा, सामाजिक चालीरिती या विषयीचे त्यांचे हक्क अबाधित राखण्याची हमी दिली पाहिजे. या जमातीच्या लोकांना राष्ट्रीय जीवनाच्या मुख्य प्रवाहात आणणे, आवश्यक आहे. त्यांना वेगळे ठेवणे, बरोबर नाही. आणि तसे केल्यास ते परदेशी प्रभावाखाली असलेल्या, त्यांच्याच लोकांकडून फसविले जाण्याच्या आणि चुकीच्या मार्गाने नेण्याचा धोका आहे. आदिवासी जमातींना त्यांचा जीवनक्रम, श्रध्दा, त्यांचा प्रदेश आणि संस्था यावर परिणाम करणा-या विकासाच्या प्रक्रियेत त्यांचे स्वतःचे अग्रक्रम ठरविण्याचा हक्क असावा, या सूचनेला भारत सरकारने आक्षेप घेतला. एकूण लोकसंख्येवर परिणाम करणा-या आर्थिकविकासाच्या बाबतीत अग्रक्रम ठरवून निर्णय घेण्याचा आपला हक्क सरकार कदापिही सोडणार नाही, असे सरकारने स्पष्ट केले. सरकारने, अशा लोकशाही मार्गाने आणि प्रतिनिधीक संस्थांच्या व्दारे व्यक्त केलेल्या मतांचा त्यांच्याशी प्रत्यक्ष संबंधित बाबींचा विचार करावा, एवढीच गोष्ट मान्य केली.

या सर्व प्रतिक्रियांचा विचार करून, संघटनेच्या सचिवालयाने सुधारित आचारसंहितेचा एक मसुदा बनविला. जून १९८८ मध्ये जिनिव्हा येथे भरलेल्या

इंटरनॅशनल लेबर कॉन्फरन्स ' च्या पंचाहत्तराव्या अधिवेशनात यावर भरपूर चर्चा झाली. संघटनेच्या बैठकीत सभासद सरकारे आणि मान्यताप्राप्त उद्योजक आणि कामगार संघटना यांच्या प्रतिनिधींनाच भाग घेता येतो. आदिवासी जमातीच्या प्रतिनिधींनाच भाग घेता यावा म्हणून काही मान्यताप्राप्त संघटनांच्या प्रतिनिधींना संहितेच्या वेगवेगळया भागांवर विचार व्यक्त करण्याची संधी देण्यात आली. मजूर संघटनेचे काम एका विशिष्ट पध्दतीने चालते. प्रथम वेगवेगळया विषयासाठी सरकारे, उद्योजक आणि कामगार संघटना, यांच्या प्रतिनिधींची समिती बनवण्यात येते. ही समिती तीन गटात काम करते. कामगार प्रतिनिधींचाउद्योजक प्रतिनिधींचा आणि सरकारी प्रतिनिधींचा, हे ते तीन गट होत. प्रत्येक गट आपली स्वतंत्र बैठक घेऊन आपले म्हणणे ठरविते. उदा. आदिवासी आचारसंहितेच्या सुधारणांसाठी तिन्ही गटांची स्वतंत्र बैठक भरत असते. नंतर दुपारी या तीनही गटांची संयुक्त बैठक भरून वेगवेगळया गटांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांवर चर्चा होई आणि एकमत न झाल्यास मतदानाने निर्णय घेतला जाईल. मतदानात कामगार संघटनांच्या प्रतिनिधींनी आणि उद्योजक संघटनांच्या प्रतिनीधींनी एकत्रित मत देण्याची परंपरा आहे. त्यामुळे कामगार संघटनेच्या प्रतिनिधीला आपल्या गटाने घेतलेली एखादी भूमिका मान्य नसली तरीदेखील मतदानाच्यावेळी तो विरोधी मतदान करीत नाही किंवा तटस्थही रहात नाही. सरकारी प्रतिनिधींच्या बाबतीत मात्र ही परंपरा नाही. त्यामुळे प्रत्येक सरकारचा प्रतिनिधी त्याला वाटेल त्याप्रमाणे किंवा आदेश असेल त्याप्रमाणे मत व्यक्त करतो आणि मतदानात भाग घेतोपरिषदेत आदिवासींच्या प्रतिनिधींना स्थान नाही आणि त्यांना दुरूस्त्या सुचविता येत नाहीत. यावर उपाय म्हणून आदिवासी गटांनी आपल्या दुरूस्त्या कामगार गटाकडे पाठवाव्यात आणि त्या गटाला मान्य झाल्यास त्या दुरूस्त्या त्यांनी कामगार गटाच्या दुरूस्त्या म्हणून संयुक्त बैठकीत मांडाव्यात असे ठरले. त्याप्रमाणे अधिवेशनासाठी आलेल्या आदिवासी आणि मित्रसंघटनांच्या प्रतिनिधींनी आपला एकअनौपचारिक गट बनवला. या गटातर्फे संहितेला अनेक दुरूस्त्या सुचविण्यात आल्या, त्यापैकी ब-याच कामगार गटाने मान्य करून, संयुक्त बैठकीत सुचविल्या. सर्वसाधारणपणे उद्योजक गटाचा कल, आदिवासी जमातींना कमीतकमी हक्क द्यावेत, याकडे होता. त्यामुळे या गटानें ही आचारसंहिता आदिवासींविषयी उदार दृष्टीकोन घेईल परंतु त्यांना फारसे हक्क देणार नाही, असा पवित्रा घेतला. प्रतिनिधी सरकारांपैकी कॅनडा, यू.एस.ए., ऑस्ट्रेलिया, जपान आणि भारत यांच्या प्रतिनिधींनी आदिवासींना हक्क देणा-या बहुतेक सूचनांना कडवा विरोध केला. त्यामानाने जर्मनी, नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क आणि निकारागुआ यांच्या प्रतिनिधींची भूमिका, आदिवासींचे हक्क मान्य करावेत अशी होती. प्रत्येक उपसूचनेस राष्ट्रीय कायद्यांना सुसंगत असेल तिथे, असे निर्बंधदायी उपकलम उद्योजकांनी आणि अनेक सरकारी प्रतिनिधींनी सुचविले. अनेकदा मतभेद विकोपाला गेल्यामुळे पेचप्रसंग निर्माण झाले. १९८८ च्या अधिवेशनात जमीन आणि प्रदेश यावरील तसेच संहितेत आदिवासी लोक की आदिवासी लोकसंख्या ही संज्ञा वापरावी यावरील निर्णय पुढे ढकलण्यात आले.

### शहात्तरावी आंतरराष्ट्रीय कामगार परिषद, १९८९-

१९८९ च्या अधिवेशनाला सर्व गट पूर्णतयारीनिशी आले होते. कामगार गटाचा उद्देश , आदिवासींना जास्तीत जास्त हक्क मिळवून देण्याचा होता. तर उद्योजक गटाचा आणि काही सरकारी प्रतिनिधींचा उददेश, आचारसंहितेत सर्वसाधारण तत्वे रहातील पण आदिवासींना फारसे हक्क प्राप्त होणार नाहीत, हे पहाणे, हा होता. सर्वात विवाद्य मुदद्दा संहितेत आदिवासी लोक की आदिवासी लोकसंख्या ही संज्ञावापरावी हा होता. सर्व आदिवासी जमातींना स्वतंत्र संस्कृती आहे आणि प्रत्येक जमात हा एकजिनसीगट आहे , त्यामुळे त्यांना लोक म्हणण्यात यावे. लोकसंख्या ही संज्ञा नुसताच समूह दाखवणारी आहे. त्यात संस्कृतीचा किंवा एकजिनसीपणाचा विचार नाही, अशी भूमिका 'लोक' संज्ञा वापरावी, म्हणणा-यांची होती. याउलट लोक हया संज्ञेला विरोध असणारे अनेकजण होते. त्यांच्या मते लोक हया संज्ञेला आंतरराष्ट्रीय कायद्यात एक खास अर्थ आहे. लोक म्हणजे स्वयंनिर्णयाचा

हक्कअसणारे एकजिनसी समूह. आदिवासींना लोक ही संज्ञा वापरली तर अनेक राष्ट्रात स्वयंनिर्णयाचा हक्कअसणारे वेगवेगळे समूह आहेत, असा त्याचा अर्थ होईल. त्यामुळे काही राष्ट्रे दुभंगण्याचा संभव आहे. अखेरीस यावर एक तोडगा काढण्यात आला. त्यानुसार 'लोक' ही संज्ञा वापरावी परंतु त्याचवेळी या संज्ञेमुळे आदिवासी लोकसमुहाला आंतरराष्ट्रीय कायद्यात अभिप्रेत असलेले हक्क आहेत, असे मानले जाणार नाही, हे स्पष्ट करावे असे ठरले. 'लोक' शब्दाच्या व्याप्तीला मर्यादा घालण्याच्या या प्रयत्नाला आदिवासी प्रतिनिधींचा विरोध होता आणि ज्यावेळी याबाबत निर्णय घेतला गेला त्यावेळी सभात्याग करून, त्यांनी आपली नापसंती व्यक्त केली.

आदिवासी समाजावर परिणाम होणारे कार्यक्रम ठरविण्याआधी आणि त्यांची अंमलबजावणी करण्याआधी आदिवासींची मान्यता मिळवावी, या गोष्टीलाही बऱ्याच सरकारी प्रतिनिधींचा विरोध होता. विकासात्मक कार्यक्रम राबविण्याच्या सरकारच्या सार्वभौम हक्काला त्यामुळे मर्यादा पडते, असे त्यांचे मत होते. त्यामुळे असे कार्यक्रम ठरविण्यापूर्वी व अंमलात आणण्यापूर्वी आदिवासी लोकांशी चर्चा करावी, असे त्यांनी सुचविले. भारत सरकारच्या प्रतिनिधीने तर अशा कार्यक्रमाच्या बाबत निर्णय घेण्यापूर्वी आदिवासींचे म्हणणे ऐकून घ्यावे, अशी सूचना केली. याबाबतीत अखेरीस उद्योजकगट आणि बहुसंख्य सरकारे यांचे प्रतिपादन प्रभावी ठरले आणि असे कार्यक्रम ठरण्यापूर्वी आदिवासी लोकांशी चर्चा करावी, ही चर्चा सदभावनेच्या वातावरणात व्हावी आणि तिचा उददेश, आदिवासींची अशा कार्यक्रमाला मान्यता मिळविणे, हा असावा, असे विधान आचारसंहितेत टाकण्यात आले. अर्थात अशी मान्यता मिळाली नाही तरी सरकारला आपली धोरणे अंमलात आणता येतील असा गर्भित अर्थ या विधानात आहे.

सर्वात जास्त चर्चा आदिवासींच्या भूमीविषयक हक्काविषयी झाली. आदिवासींचे म्हणणे, अपवादात्मक परिस्थिती सोडता, ते वापरीत असलेल्या त्यांच्या भूभागावरील सर्व हक्क मान्य करावेत आणि भूभागांत भूमीवरचा प्रदेश आणि भूमीखालील खनिजे यांचा समावेश असावा, असे होते. याला उद्योजक गटाचा आणि अनेक सरकारांचा कडवा विरोध होता. अखेरीस हा प्रश्न सरकारी प्रतिनिधी, उद्योजक आणि कामगार गटांचे प्रतिनिधी यांच्या एका संयुक्त कार्यकारी समितीकडे सोपविला गेला. या समितीने सर्वमान्य असा एक मसूदा तयार केला. १९५७ च्या आचारसंहितेच्या मानाने भूमीविषयक हक्कांची कल्पना अधिक स्पष्ट करण्याऐवजी संदिग्ध ठेवण्यात आली. आदिवासींचे ते वापरीत असलेल्या भूमीवरील हक्क जास्तीतजास्त जतन केले जावे, मात्र ही गोष्ट सर्वसाधारण राष्ट्रीय कायद्याच्या चौकटीच व्हावी, अशी विधाने या विभागात टाकण्यात आली. याबाबत निर्णय घेतला गेला, त्यावेळीही आपला निषेध व्यक्त करण्यासाठी आदिवासी आणि त्याचे मित्रगट यांच्या प्रतिनिधींनी सभात्याग केला.

त्यानंतर वेळेच्या अभावी वीस ते छतीस या कलमांवर चर्चा न करता संघटनेच्या सचिवालयाने सुचविलेली कलमे मान्य करावीत असा निर्णय सर्वानुमते घेतला गेला.

२७ जून १९८९ रोजी, ही आचारसंहिता आंतरराष्ट्रीय मजूर परिषदेने स्वीकृत केली आणि १९५७ च्या

१०७ क्रमांकाच्या आचारसंहितेऐवजी १९८९ ची १६९ क्रमांकाची आचारसंहिता म्हणून ती जाहीर करण्यात आली. या आचारसंहितेच्या बाजूने ३२८ मते पडली, एक मत आचारसंहितेच्या विरूध्द पडले, तर ४९ मते तटस्थ म्हणून जाहीर केली गेली. भारत सरकारच्या प्रतिनिधीने तसेच उद्योजक व कामगार संघटना यांच्या प्रतिनिधीनी संहितेच्या बाजूने मतदान केले.

**आढावा-**

काही बाबतीत ही सुधारित आचारसंहिता, जुन्या आचारसंहितेपेक्षा निश्चित चांगली आहे. आदिवासी समाज इतर समाजाशी एकरूप झाला पाहिजे, या जुन्या आचारसंहितेतील दृष्टीकोनाचा त्याग नव्या आचारसंहितेत आहे. नव्या आचारसंहितेत लोकांना जगातील इतर लोकांबरोबरचे कायम स्वरूपाचे सहकारी मानले आहे. त्यामुळे वैचारिकदृष्ट्या नवीन आचारसंहिता अधिक स्पष्ट आहे परंतु आदिवासींचे हक्क मान्य करतांना मात्र

ठिकठिकाणी 'शक्य असेल तेथे', 'शक्य तेवढे', वगैरे शब्दप्रयोग करून अशा हक्कांना मर्यादा घालण्यात आल्या आहेत. भूमीविषयक हक्काच्या बाबतीत तर या मर्यादा अधिकच कडक आहेत. स्वीकृत झाल्यानंतर एक वर्षाच्या आत किमान दोन सरकारांनी त्यास मंजुरी दिल्यास नवी आचारसंहिता अंमलात येईल. अशी मंजुरी मिळणे अडचणीचे जाईल असे वाटत नाही. भारतसरकार या आचारसंहितेला मान्यता देईल असे त्यांच्या अधिवेशनातील एकूण भूमिकेवरून वाटते.

आंतरराष्ट्रीय करारनाम्यात, आंतरराष्ट्रीय मजूरसंघटनेच्या आचारसंहितेला एक विशेष स्थान आहे. एखाद्या सरकारने तिला मंजुरी दिल्यास, तिची अंमलबजावणी करणे, हे त्या सरकारवर बंधनकारक असते. सरकार अशी अंमलबजावणी करत नाही, अशी तक्रार संघटनेची मान्यता असणाऱ्या कोणत्याही उद्योजक किंवा कामगार संघटनेस करता येते. संहितेच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवण्यासाठी संघटनेची एक खास यंत्रणा आहे. त्यानुसार अशा तक्रारीची चौकशी केली जाते, संबंधित सरकारला त्याविषयी खुलासा करावा लागतो आणि असा खुलासा, तक्रार आणि त्याविषयी आपले मत समिती प्रसिध्द करते. जुन्या आचारसंहितेला भारतसरकारने मान्यता दिली होती. त्याचा फायदा घेऊन युरोपातील एका कामगार संघटनेने नर्मदा प्रकल्पग्रस्त आदिवासींच्या पुनर्वसनाची योग्य व्यवस्था, योजनेच्या आराखडयात नाही, अशी तक्रार संघटनेकडे केली. त्याची दखल घेऊन, प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाच्या योजनेचा समावेश या योजनेत केलाच पाहिजे, असा आग्रह संघटनेने धरला आणि जागतिक बँक आणि संघटना यांच्या दबावाखाली तो मान्य करणे, भारत सरकारला भाग पडले. या प्रक्रियेतसुमारे दीड वर्षाचा काळ गेला आणि त्या काळात प्रकल्पग्रस्तांना संघटित करण्यास वेळ मिळाला. तसेच या प्रश्नावर आंतरराष्ट्रीय स्तरावर फार मोठी चर्चा आणि जागृती झाली.

बांगला देशात चितगॉंग डोंगर विभागात रहाणाऱ्या चकमा जमातीच्या आदिवासींवर सरकारी फौजांनी अनेक अत्याचार केले. त्याचीही दाद आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेने घेतली आणि या प्रश्नावर बांगला देश सरकारला काहीसे नमते घ्यावे लागले.

या गोष्टी लक्षात घेता नवीन आचारसंहितेचा काही फायदा विविध देशातील आदिवासींना निश्चितपणे होईल, असे वाटते. हा फायदा किती होईल हे आचारसंहितेतील विविध कलमांचा अर्थ, अंमलबजावणीकरणारी यंत्रणा कसा लावील, यावर अवलंबून राहिल. एकंदरीत या आचारसंहितेने आदिवासींच्या बाजूने जागतिक लोकमत तयार करण्यात काही मदत झाली आहे. युनोमध्ये आदिवासींविषयी स्वतंत्र आचारसंहिता बनविण्याची प्रक्रिया चालू आहे. तिच्यावरही या आचारसंहितेचा काही प्रभाव पडणार आहे. आदिवासी समाजाच्या दृष्टीने ही गोष्ट महत्वाची असून सर्व जगभर आदिवासी समाजात काम करणाऱ्या आदिवासी आणि बिगर आदिवासी कार्यकर्त्यांनी हे सर्व प्रयत्न समजावून घेतले पाहिजेत.

THE MAHARASHTRA ASSOCIATION OF ANTHROPOLOGICAL SCIENCES

# स्वतंत्र देशातील आदिवासी आणि वनवासी लोकांसंबंधी आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेची आचारसंहिता (क्र. १६९/१९८९)

ही आचारसंहिता २७ जून १९८९ रोजी संघटनेच्या शहात्तराव्या अधिवेशनात स्वीकृत करण्यात आली.

**प्रास्ताविक -:**

आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेची ७ जून १९८९ रोजी सुरू झालेल्या शहात्तराव्या अधिवेशनातील सर्वसाधारण सभा, १९५७ सालचे आदिवासी आणि वनवासी लोकसंख्याविषयीची आचारसंहिता दुरूस्त करीत आहे.

हे करतांना मानवी हक्कासंबंधीचा सार्वत्रिक जाहीरनामा, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्काविषयीची आंतरराष्ट्रीय करारपत्रे तसेच जातीजमातींना किंवा अल्पसंख्य गटांविरूध्द भेदभावांना प्रतिबंध करणारे आंतरराष्ट्रीय करारनामे यांची नोंद घेत आहे.

१९५७ सालानंतर आंतरराष्ट्रीय कायद्यात त्याचप्रमाणे आदिवासी आणि वनवासी लोकांच्या एकूण परिस्थितीत बदल झाले आहेत. त्यामुळे पूर्वीच्या आचारसंहितेतील सामीलीकरणवादी दृष्टीकोन काढून टाकून नवीन आचारसंहिता बनविण्याची आवश्यकता आहे.

आदिवासी लोकांची स्वतःच्या संस्था जीवनक्रम आणि आर्थिक विकासाची प्रक्रिया यावर नियंत्रण ठेवण्याची आकांक्षा आहे. त्याप्रमाणे ते रहात असलेल्या राज्यांच्या चौकटीत आपले अस्तित्व, भाषा आणि धर्म टिकविण्याची आणि त्यांचा विकास करण्याची त्यांची इच्छा आहे.

जगातील अनेक भागात आदिवासी लोकांना इतर लोकांसारखे मूलभूत मानवी हक्क उपभोगता येत नाहीत. त्यांचे कायदे, मूल्ये, चालीरिती आणि एकंदर जीवनविषयक दृष्टीकोन यावर आघात होत आहे. आदिवासी आणि वनवासी लोकांनी, मानवजातीच्या सांस्कृतिक विविधतेत आणि सामाजिक आणि पर्यावरणविषयक विचारात उल्लेखनीय भर घातली आहे.

वरील सर्व गोष्टींची नोंद घेऊन व युनायटेड नेशन्स, अन्न आणि शेती संघटना, युनेस्को, जागतिक आरोग्य संघटना, इंटर अमेरिकन इंडियन इन्स्टिटयूट या सर्वांच्या सहकार्याने ही संहिता बनविण्यात आली आहे.

१९५७ च्या १०७ क्रमांकाच्या आदिवासी आणि वनवासी लोकसंख्याविषयक आचारसंहितेऐवजी ही सुधारित आचारसंहिता २७ जून १९८९ रोजी स्वीकारण्यात आली आहे.

**भाग १ : सर्वसाधारण धोरण**

**कलम - १**

(१) ही आचारसंहिता खाली नमूद केलेल्या लोकांना लागू होईल.

अ. स्वतंत्र देशातील ज्यांची सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक परिस्थिती देशातील इतर प्रमुख समाजापेक्षा वेगळी आहे. आणि ज्यांचे स्थान त्यांच्या स्वतःच्या चालीरिती किंवा परंपरा किंवा खास कायदेकानू यांच्याव्दारे ठरविले जाते असे आदिवासी लोक.

ब. स्वतंत्र देशातील किंवा देशाच्या एखाद्या भौगोलिक विभागातील, तो देश किंवा विभाग पादाक्रांत करण्यात आला किंवा तेथे वसाहती करण्यात आल्या, त्याकाळच्या मूळ रहिवाशांचे वंशज, जे त्यांचा राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय संस्था टिकवून आहेत असे लोक.

(२) या आचारसंहितेतील तरतुदी कोणत्या गटाला लागू पडतात हे ठरवितांना त्या गटाची आदिवासी म्हणून स्वतःला असलेली जाणीव हा मूलभूत निकष मानला जाईल.

(३) या संहितेतील 'लोक' या संज्ञेचा अर्थ लावतांना या संज्ञेमागे अभिप्रेत असलेले आंतरराष्ट्रीय कायद्यातील हक्क यांचा विचार केला जाणार नाही.

### कलम - २

(१) या लोकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आणि त्यांच्या एकतेविषयी आदराची हमी देण्यासाठी त्यांच्या सहभागाने पध्दतशीर आणि सुनियंत्रित कृती आखण्याची जबाबदारी सरकारांची राहील.

(२) अशा कृतीत पुढील गोष्टींचा समावेश होईल.

अ. लोकसंख्येच्या इतर सभासदांना राष्ट्रीय कायदेकानू यांच्याव्दारे प्राप्त होणारे हक्क आणि संधी, यांचा फायदा आदिवासी लोकांना तेवढ्याच प्रमाणात मिळेल याविषयी खबरदारी घेणे.

ब. या लोकांची सामाजिक आणि सांस्कृतिक वैशिष्ट्ये त्यांच्या चालीरिती आणि परंपरा व संस्था यांच्या संदर्भात त्यांना आपले सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक हक्क पूर्णपणे उपभोगता येतील, यासाठी उपाययोजना करणे.

क. आदिवासी लोकांच्या आकांक्षांशी आणि जीवनपध्दतीशी सुसंगत अशा पध्दतीने आदिवासी आणि बिगर आदिवासी यामधील आर्थिक आणि सामाजिक अंतर दूर करण्यास या लोकांना मदत करणे.

### कलम - ३

(१) आदिवासी लोकांना कोणताही अडथळा किंवा पक्षपात न होता मानवी हक्क आणि मूलभूत स्वातंत्र्ये पूर्णपणे उपभोगता येतील. या संहितेतील कलमे स्त्रीपुरूष यात पक्षपात न करता आदिवासी समाजाच्या सर्व सभासदांना लागू पडतील.

(२) संबंधित लोकांच्या मानवी हक्क आणि मूलभूत स्वांतत्र्ये यांच्या विरोधात कोणत्याही प्रकारची जबरदस्ती किंवा सक्ती करता येणार नाही. या हक्कात, आचारसंहितेत असलेल्या हक्कांचाही समावेश होईल.

### कलम - ४

(१) संबंधित लोकांच्या व्यक्तिगत संस्था, संपत्ती, श्रम, संस्कृती आणि वातावरण यांच्या सुरक्षिततेसाठी योग्य ते खास उपाय योजले जातील.

(२) असे खास उपाय संबंधित लोकांनी खुलेपणाने व्यक्त केलेल्या इच्छांविरूध्द असणार नाहीत.

(३) अशा खास उपायांनी संबंधित लोकांचा पक्षपात न होता, नागरिकत्वाच्या सामान्य हक्कांच्या उपभोगावर कोणत्याही प्रकारे गदा येता कामा नये.

### कलम - ५

(१) या संहितेतील तरतुदींचा वापर करतांना पुढील गोष्टी लक्षात ठेवल्या जातील.

अ. संबंधित लोकांची सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि आध्यात्मिक मूल्ये आणि आचार मान्य केले जातील आणि त्यांचे रक्षण केले जाईल. तसेच संबंधित लोकांच्या प्रश्नांचा विचार गट आणि व्यक्ती या दोन्हीं दृष्टीने केला जाईल.

ब. संबंधित लोकांची मूल्ये, आचार आणि संस्था यांच्या अखंडत्वाविषयी आदर राखला जाईल.

क. संबंधित लोकांच्या सहभागाने आणि सहकार्याने या लोकांना जीवन आणि काम यामधील नव्या परिस्थितीशी तोंड देतांना येणा-या अडचणी कमी करण्यासाठी, योग्य ते धोरण आखले जाईल.

### कलम - ६

(१) या संहितेतील तरतुदींचा अंमल करतांना सरकारांनी पुढील खबरदारी घ्यावी.

अ. अशा लोकांवर प्रत्यक्षपणे परिणाम करणा-या कायदेशीर किंवा कारभारविषयक उपायांचा विचार करतांना योग्य पध्दतीत आणि प्रातिनिधीक संस्था यांच्याव्दारे त्यांच्याशी सल्लामसलत केली जाईल.

ब. त्यांच्याविषयी धोरणे आणि कार्यक्रम आखणा-या निवडणुकींवर आधारित संस्था आणि प्रशासकीय आणि इतर संस्था यांच्या निर्णयप्रक्रियेच्या सर्व पातळयांवर लोकसंख्येच्या इतर विभागांना घेता येतो तितका किमान मुक्त सहभाग घेता येईल यासाठी आवश्यक ती यंत्रणा उभारणे.

क. संबंधित लोकांच्या संस्था आणि उपक्रम यांचा पूर्ण विकास होईल यासाठी यंत्रणा

उभारणे आणियोग्य तेथे त्यासाठी आवश्यक ती साधनसामुग्री पुरविणे.

(२) या संहितेतील कलमांच्या अंमलबजावणीसाठी केली जाणारी सल्लामसलत सद्भावनेवर तसेच परिस्थितीशी अनुरूप अशी असली पाहिजे. आणि तिचे उदि्दष्ट संकल्पित उपायांना संमती किंवा मान्यतामिळविणे, असे असले पाहिजे.

### कलम - ७

(१) सदरहू लोकांना त्यांचा जीवनक्रम, श्रध्दा, संस्था आणि आध्यात्मिक स्वास्थ यावर परिणाम करणा-या विकासाच्या प्रक्रियेत आपला अग्रक्रम ठरविण्याचा हक्क असेल. त्याचप्रमाणे ते रहात असलेल्या किंवा वापरीत असलेल्या जमिनी तसेच शक्य तेवढे त्यांचा आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकास यांचे नियंत्रण करण्याचा अधिकार असेल. त्याशिवाय त्यांच्यावर प्रत्यक्ष परिणाम करणा-या राष्ट्रीय आणि विभागीय विकासाच्या योजनांचे आणि कार्यक्रमांचे नियोजन, अंमलबजावणी आणि मूल्यमापन यात त्यांचा सहभाग असेल.

(२) त्यांची वस्ती असलेल्या विभागाच्या एकूण आर्थिक विकासात त्यांचा सहभाग आणि सहकार्यासह त्यांची रहाण्याची परिस्थिती, कामाची परिस्थिती आणि आरोग्य व शिक्षण यांची पातळी यात सुधारणा घडवून आणणे ह्या गोष्टीला अग्रक्रम दिला जाईल. अशा विभागांचा विकास करण्यासाठी खास प्रकल्प राबविले जातील.

(३) शक्य तेवढे नियोजीत विकासयोजनांचा संबंधित लोकांची सामाजिक, आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि वातावरण विषयक परिस्थिती यावर काय परिणाम होतो याविषयी अभ्यास केले जातील. असे अभ्यास संबंधित लोकांच्या सहकार्याने केले जातील. विकास योजनांची अंमलबजावणी करतांना अशा अभ्यासातील निष्कर्ष, मूलभूत निकष म्हणून मानले जातील.

(४) संबंधित लोकांच्या सहकार्याने त्यांची वस्ती असलेल्या प्रदेशातील, वातावरणाचे संरक्षण होईल अशी उपाययोजना सरकारे करतील.

### कलम - ८

(१) संबंधित लोकांच्या बाबतीत राष्ट्रीय कायदे व नियम यांची अंमलबजावणी करतांना, त्यांच्या चालीरीती आणि परंपरागत कायदे यांचा योग्य तो विचार केला जाईल.

(२) राष्ट्रीय कायदेव्यवस्था आणि आंतरराष्ट्रीय मान्यता असलेले, मानवी हक्क यांच्याशी विसंगत नसतील अशा चालीरिती आणि संस्था जतन करण्याचा हक्क संबंधित लोकांना असेल. याबाबतीत निर्माण होणारे विवादात्मक प्रश्न सोडविण्यासाठी कार्यपध्दती ठरवली जाईल.

(३) वरील कलमाच्या एक व दोन परिच्छदातील तरतुदींची अमलबजावणी करतांना संबंधित लोकांना सर्व नागरिकांना दिलेल्या हक्काचा उपभोग घेण्यापासून आणि त्यानुसार कर्तव्ये पार पाडण्यापासून वंचित केले जाणार नाही.

### कलम - ९

(१) राष्ट्रीय कायदा व्यवस्था आणि आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त मानवी हक्क यांच्याशी सुसंगत अशा संबंधित लोकांच्या त्यांच्या सभासदांनी केलेल्या गुन्हयांच्या न्यायनिवाडयासाठी पारंपारिकरित्या चालत असलेल्या पध्दतींविषयी आदर राखला जाईल.

(२) अशी प्रकरणे हाताळतांना अधिकारी आणि न्यायालये, संबंधित लोकांच्या गुन्ह्याबद्‌दल शिक्षा देण्याच्या पध्दतींचा विचार करतील.

### कलम - १०

(१) संबंधित लोकांना सर्वसामान्य कायद्याने ठरविलेल्या शिक्षा देतांना त्यांची आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतीक वैशिष्टये लक्षात घेतली जातील.

(२) शिक्षेच्या पध्दतीत तुरूंगवासाच्या शिक्षेपेक्षा इतर पध्दतींना प्राधान्य दिले जाईल.

### कलम - ११

सर्व नागरिकांना कायद्याने ठरवून दिलेल्या गोष्टीशिवाय, संबंधित लोकांकडून कोणत्याही स्वरूपात मोबदला असलेली किंवा नसलेली कोणत्याही स्वरूपातील सक्तीची व्यक्तीगत सेवा घेण्यास प्रतिबंध राहील आणि असे करणारा कायद्यान्वये शिक्षेस पात्र होईल.

## कलम - १२

संबंधित लोकांच्या हक्कांवर आक्रमण होणार नाही अशी खबरदारी घेतली जाईल आणि अशा हक्कांच्या प्रभावी संरक्षणासाठी त्यांना व्यक्तिशः किंवा त्यांच्या प्रातिनीधिक संस्थामार्फत कायदेशीर कारवाई करता येईल. कायदेशीर कारवाईत संबंधित लोकांना समजेल यासाठी दुभाषा किंवा इतर उपायांची योजना केली जाईल.

### भाग २ : भूमी

## कलम - १३

(१) या विभागातील तरतुदींचा अंमल करतांना सरकारे संबधित लोकांच्या ताब्यात किंवा वापरात असलेल्या जमिनींशी किंवा प्रदेशांशी निगडीत असलेल्या सांस्कृतिक आणि अध्यात्मिक मूल्यांचे विशेषतः या संबंधाबाबतच्या सामुदायिक संबंधांचे खास महत्व लक्षात घेतील व त्यांचा आदर राखतील.

(२) कलम १५ आणि १६ यात वापरलेल्या 'भूमी' या संज्ञेत भूप्रदेशांचाही समावेश होईल अशा भूप्रदेशात संबंधित लोक रहात असलेल्या किंवा इतर वापर करीत असलेल्या प्रदेशातील एकूण वातावरणाचा समावेश होईल.

## कलम - १४

(१) संबंधित लोकांच्या पारंपारिकरित्या ताब्यात असलेल्या जमिनींवरील त्यांचे मालकी हक्क आणि ताबा असण्याचे हक्क मान्य केले जातील. त्याशिवाय संबंधित लोक वापरीत असलेल्या परंतु केवळ त्यांच्याच पूर्ण ताब्यात नसलेल्या परंतु उदरनिर्वाहासाठी आणि पारंपारिक कामासाठी त्यांना प्रवेश असलेल्या जमिनींवरील त्यांचे हक्क जतन करण्यासाठी योग्य ते उपाय योजले जातील. भटके लोक आणि बदलती किंवा स्थलांतरित शेती करणारे यांच्या परिस्थितीकडे विशेष लक्ष दिले जाईल.

(२) संबंधित लोकांच्या पारंपारिकरित्या ताब्यात असलेल्या जमिनी ओळखण्यासाठी सरकारे आवश्यक ते उपाय योजतील आणि त्यांच्या त्यावरील मालकी व ताबा याविषयक हक्कांच्या प्रभावी रक्षणाची हमी देतील.

(३) संबंधित लोकांचे त्यांच्या भूमिविषयक हक्कांचे वाद सोडविण्यासाठी राष्ट्रीय कायदे व्यवस्थेत योग्य ती कार्यपध्दती बनवली जाईल.

## कलम - १५

(१) संबंधित लोकांचे त्यांच्या भूमीशीं निगडीत असलेल्या नैसर्गिक साधनसंपत्तीवरिल हक्कांचे खास रक्षण केले जाईल. अशा हक्कात अशी साधनसंपत्ती वापरण्याचा, तिचे व्यवस्थापन आणि जतन करण्याच्या हक्कांचा समावेश होईल.

(२) सरकारने खनिजांवरिल किंवा भूमी अतर्गत साधनसंपत्तीवरील तसेच भूमीवरील इतर साधनसंपत्तीवरील हक्क स्वतःकडे ठेवल्यास अशा साधनसंपत्तीच्या वापराचे कार्यक्रम अंमलात आणण्यापूर्वी सरकारे संबंधित लोकांचे विचार आणि अशा कार्यक्रमांचा त्यांच्या हितावर होणारा परिणाम समजावून घेण्यासाठी संबंधित लोकांशी सल्लामसलत करणारी कार्यपध्दती आणि यंत्रणा स्थापन करील. शक्य तेथे अशा कार्यक्रमांचे फायदे संबंधित लोकांना मिळतील आणि अशा कार्यक्रमामुळे होणा-या नुकसानीबाबत त्यांना योग्य ती भरपाई मिळेल.

## कलम - १६

(१) पुढील परिच्छेदात नोंद केलेल्या तरतुदींखेरीज इतर कारणांसाठी संबंधित लोकांना त्यांच्या ताब्यात असलेल्या जमिनींवरून हलवण्यात येणार नाही.

(२) अपवादात्मक परिस्थितीत अशा लोकांना इतर ठिकाणी वसविणे आवश्यक वाटल्यास असे पुनर्वसन त्यांच्या मुक्त आणि पुरेशा माहितीवर आधारलेल्या संमतीनेच होईल. जर अशी संमती मिळविणे अशक्य असेल तर असे पुनर्वसन राष्ट्रीय कायदेकानूनी ठरवून दिलेल्या पध्दतीनुसारच होईल. या कार्यपध्दतीत योग्य तेथे सार्वजनिक चौकशीचा समावेश होईल आणि अशा चौकशीत संबंधित लोकांना निवेदन करण्यास संधी दिली जाईल.

(३) ज्या कारणामुळे स्थलांतर झाले ती दूर झाल्यास, शक्य तेथे अशा लोकांना त्यांच्या परंपरागत जमिनींवर परत जाण्याचा हक्क राहील.

(४) जर असे परत जाणे शक्य नसेल तर संबंधित लोकांची मान्यता घेऊन किंवा अशी मान्यता नसल्यास योग्य कार्यपध्दतीच्या व्दारे शक्य तेथे अशा लोकांना किमान ते अगोदर वापरीत असलेल्याजमिनींच्या एवढयाच गुणवत्तेच्या आणि कायदेशीर दर्जाच्या जमिनी दिल्या जातील. जर संबंधित लोकांनी आपली नुकसानभरपाई पैशाच्या किंवा इतर स्वरुपात घेण्यास मान्यता दर्शवली तर ती त्यांना त्या स्वरूपात देण्याची हमी दिली जाईल.

(५) अशा पुनर्वसित लोकांचे होणारे नुकसान पूर्णपणे भरून दिले जाईल.

### कलम - १७

(१) संबंधित लोकांच्या आपापसात भूमीवरील हक्कांचे हस्तांतरण करण्याच्या कार्यपध्दतीविषयी आदर राखला जाईल.

(२) ज्या ज्या वेळी अशा लोकांच्या इतर समाजाकडे जमिनी हस्तांतरीत करण्याच्या किंवा जमिनीवरील हक्क देण्याच्या बाबींचा विचार होईल. त्या त्या वेळी संबंधित लोकांशी सल्लामसलत केली जाईल.

(३) आदिवासी समाजाचे सभासद नसलेल्या लोकांना आदिवासी समाजातील चालीरितींचा किंवा त्यांच्याकायदेविषयक अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांच्या जमिनीची मालकी, ताबा किंवा वापर करण्यास प्रतिबंध राहील.

### कलम - १८

संबंधित लोकांच्या जमिनीवर अनाधिकृत अतिक्रमण करणा-या लोकांना कायद्याने योग्य ती शिक्षा देण्याची व्यवस्था होईल. आणि सरकारे अशा प्रकारचे गुन्हे रोखण्यासाठी उपाययोजना करतील.

### कलम - १९

लोकसंख्येतील इतर विभागांना मिळणा-या वागणुकीसारखीच वागणूक आदिवासींना मिळावी यासाठी राष्ट्रीय शेतकीविकास कार्यक्रमात पुढील तरतुदी केल्या जातील.

अ. ज्या ठिकाणी सर्वसाधारण उदरनिर्वाहासाठी पुरेशी जमिन नाही किंवा लोकसंख्येतील वाढीमुळे निर्माण झालेली जमिनीची गरज आहे. यासारख्या परिस्थितीत संबंधित लोकांना अधिक जमिन देण्याची तरतूद करणे.

ब. संबंधित लोकांच्या ताब्यात असलेल्या जमिनीच्या विकासासाठी आवश्यक ती साधनसामुग्री पुरविणे.

## भाग ३ : नोकरभरती आणि रोजगाराची परिस्थिती

### कलम - २०

(१) राष्ट्रीय कायदेकानूच्या चौकटीत आणि संबंधित लोकांच्या सहकार्याने अशा लोकांचे नोकरभरतीच्या बाबतीत आणि कामाच्या परिस्थितीच्या बाबतीत संरक्षण व्हावे यासाठी सरकारे प्रयत्न करतील. असे संरक्षण जेथे सर्वसामान्य कामगारांचे व्यवस्थित संरक्षण करण्यासाठी कायदे नाहीत अशा ठिकाणी विशेषकरून केले जाईल.

(२) संबंधित लोकांतील कामगार आणि इतर कामगार यामधील पक्षपात टाळण्यासाठी सरकारे सर्व प्रकारचे प्रयत्न करतील यात पुढील गोष्टींचा विशेषकरून समावेश असेल.

अ. रोजगार पुरविणे विशेषत: कुशल रोजगार तसेच कामात बढतीची व प्रगतीची संधी.

ब. समान कामासाठी समान वेतन.

क. आरोग्य आणि सामाजिक सुरक्षा साहाय्य, रोजगाराच्या ठिकाणी सुरक्षा आणि आरोग्यव्यवस्था, सर्व प्रकारच्या सामाजिक सुरक्षा सवलती व कामाशी निगडीत इतर फायदे, आणि निवास व्यवस्था.

ड. संघटनेचा हक्क आणि सर्व प्रकारचे कायदेशीर कामगार संघटना स्वातंत्र्य, मालकांशी किंवा मालक संघटनांशी सामुहिक करार करण्याचा हक्क.

(३) अशा उपायात पुढील उद्दीष्टे साध्य होतील असे प्रयत्न केले जातील.

अ. संबंधित लोकांमधील शेती किंवा इतर रोजगारात तसेच कामगार ठेकेदारांनी लावलेल्या हंगामी, नैमित्तिक व स्थलांतरित कामगारांसह सर्व कामगारांना, तशाच विभागातील इतर कामगारांना राष्ट्रीय कायदा व प्रचलित पध्दतीव्दारे मिळालेल्या हक्कांचा उपभोग घेता यावा व कामगार कायद्याखालील त्यांचे हक्क व

त्यांच्या तक्रारी निवारणासाठी असलेली यंत्रणा याची पूर्ण माहिती व्हावी, यासाठी प्रयत्न करणे.

ब. संबंधित लोकांतील कामगारांना त्यांचे आरोग्य धोक्यात येईल विशेषत: जंतुनाशके आणि इतर विषारी पदार्थांशी त्यांचा संपर्क येईल अशी कामाची परिस्थिती रहाणार नाही, हे पाहाणे.

क. संबंधित लोकांतील कामगारांना बांधिल श्रम किंवा इतर प्रकारचे कर्जाशी संबंधित श्रम यासारखी सक्तीची कामे करावी लागणार नाही, याची व्यवस्था करणे.

ड. संबंधित लोकांतील स्त्रीपुरूष कामगारांना रोजगारात समान संधी आणि समान वागणूक मिळेल व स्त्री कामगारांचे लैंगिक छळवणुकीपासून संरक्षण होईल असे पहाणे.

(४) संहितेच्या या भागातील तरतुदींचे पालन व्हावे यासाठी संबंधित लोक काम करीत असलेल्या विभागात योग्य त्या कामगार निरीक्षकांची योजना करणे.

**भाग ४ : व्यावसायिक शिक्षण, हस्तव्यवसाय व ग्रामीण उद्योग**

**कलम - २१**

व्यावसायिक शिक्षणाच्या बाबतीत इतर नागरिकांना मिळते इतकी किमान संधी संबंधित लोकांना मिळेल.

**कलम - २२**

(१) सर्वसामान्य स्वरूपाच्या व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रमात, संबंधित लोकांचा स्वयंस्फूर्त सहभाग वाढावा यासाठी उपाय योजले जातील.

(२) जेव्हा सर्वसामान्य स्वरूपाच्या प्रचलित व्यावसायिक शिक्षण कार्यक्रमाव्दारे संबंधित लोकांच्या खास गरजा भागण्याचा संभव नसेल तेव्हा या लोकांच्या सहभागाने सरकारे अशा गरजा भागविता येतील असे खास प्रशिक्षण कार्यक्रम राबवतील.

(३) कोणतेही विशेष प्रशिक्षण कार्यक्रम लोकांची आर्थिक परिस्थिती, सामाजिक आणि सांस्कृतीक परिस्थिती आणि प्रत्यक्ष गरजा लक्षात घेऊन राबविले जातील. याबाबतीतील सर्व अभ्यास संबंधित लोकांच्या सहकार्याने केले जातील. आणि अशा कार्यक्रमांची संघटना आणि कार्यपध्दती यांच्याविषयी त्यांच्याशी सल्लामसलत केली जाईल. संबंधित लोकांनी ठरविल्यास व्यवहार्य असेल तेथे, ते लोक क्रमश: अशा विशेष प्रशिक्षण कार्यक्रमांच्या संघटनांची आणि राबविण्याची जबाबदारी घेतील.

**कलम - २३**

(१) अशा लोकांच्या संस्कृती रक्षणात आर्थिक आत्मनिर्भरतेत आणि विकासात, हस्तव्यवसाय, ग्रामीण आणि सामुदायिक उद्योग निर्वाह अर्थव्यवस्था आणि शिकार, मच्छिमारी, फासेपारध आणि वनउत्पादन गोळा करणे हे महत्वाचे घटक मान्य केले जातील. अशा लोकांच्या सहकार्याने आणि योग्य तेथे सरकारे ह्या उपक्रमांना बळकटी येण्यासाठी आणि त्यांच्या वाढीसाठी प्रयत्न करतील.

(२) संबंधित लोकांची पारंपारिक उत्पादनतंत्रे आणि सांस्कृतिक वैशिष्ट्ये तसेच संधारणशील (सतत टिकणा-या ) आणि **समताधिष्टित** विकासाचे महत्व लक्षात ठेवून संबंधित लोकांनी विनंती केल्यास त्यांना योग्य तांत्रिक आणि आर्थिक मदत पुरवली जाईल.

भाग ५ :सामाजिक सुरक्षा आणि आरोग्य

**कलम - २४**

संबंधित लोकांसाठी सामाजिक सुरक्षा योजना क्रमश: वाढविल्या जातील आणि त्यांच्याविरूद्ध पक्षपात न करता त्या अंमलात आणल्या जातील.

**कलम - २५**

(१) संबंधित लोकांना पुरेशा आरोग्य सुविधा उपलब्ध आहेत याची काळजी सरकार घेईल. किंवा त्यांना शक्य तेवढे अधिक शारीरिक आणि मानसिक आरोग्यमान गाठता येईल. यासाठी आरोग्य व्यवस्थांची आखणी आणि अंमलबजावणी त्यांच्या जबाबदारीखाली व नियंत्रणाखाली करणे, यासाठी साधनसामुग्री पुरवील.

(२) शक्य त्या मर्यादेपर्यंत आरोग्यसुविधा सामुहिक स्वरूपाच्या असतील. या सुविधा

अशा लोकांच्या सहकार्याने योजल्या जातील आणि अंमलात येतील. त्यांची आखणी करतांना त्या लोकांची आर्थिक, भौगोलिक, सामाजिक आणि सांस्कृतिक परिस्थिती तसेच त्यांची परंपरागत आरोग्यसंरक्षण पध्दती, उपचारपध्दती आणि औषधपध्दती लक्षात घेतली जातील.

(३) आरोग्यरक्षण पध्दती अंमलात आणतांना, स्थानिक जमातीतील आरोग्यरक्षकांच्या भरतीला आणि प्रशिक्षणाला प्राधान्य दिले जाईल. अशा व्यवस्थेचा भर प्राथमिक आरोग्य रक्षणावर राहील. मात्र त्याच वेळी अशी व्यवस्था इतर पातळयांवरील आरोग्यरक्षण सेवांशी पक्की जोडली जाईल.

(४) अशा आरोग्यविषयक सुविधा देशातील इतर सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक परिस्थितीशी सुसंगत असतील.

## भाग ६ : शिक्षण आणि संपर्काची साधने

### कलम - २६

संबंधित लोकांना शिक्षणाच्या सर्व पातळयांवर पोहोचण्याची संधी राष्ट्रातील इतर समाजाच्या किमान बरोबरीने मिळेल यासाठी उपाययोजना केली जाईल.

### कलम - २७

(१) संबंधित लोकांसाठी शिक्षण कार्यक्रम आणि सेवा त्यांच्या सहकार्याने आखल्या जातील आणि अंमलात आणल्या जातील. या कार्यक्रमात त्यांच्या विशेष गरजा लक्षात घेतल्या जातील आणि त्यांचा इतिहास, ज्ञान तंत्रज्ञान , मूल्यव्यवस्था आणि त्यांच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक आकांक्षा यांचा समावेश राहील.

(२) क्रमश: असे कार्यक्रम राबविण्याची जबाबदारी संबंधित लोक घेतील, असा दृष्टिकोन ठेवून सक्षमयंत्रणा, या लोकांचे प्रशिक्षण आणि त्यांचा शैक्षणिक कार्यक्रम बनविण्यात आणि त्यांच्या अंमलबजावणीत सहभाग याविषयी काळजी घेईल.

(३) त्याशिवाय संबंधित लोकांना त्यांच्या शैक्षणिक संस्था आणि सुविधा निर्माण करण्याचा अधिकार सरकारे मान्य करतील, मात्र अशा संस्थांनी सक्षम यंत्रणेने संबंधित लोकांशी सल्लामसलत करून ठरवलेला किमान दर्जा पाळला पाहिजे. यासाठी आवश्यक ती साधनसामुग्री पुरवली जाईल.

### कलम - २८

(१) संबंधित लोकांच्या मुलांना व्यवहार्य तेथे त्यांच्या स्वत:च्या भाषेतून किंवा त्यांचा समाज वापरीत असलेल्या सर्वसामान्य भाषेतून लिहीणे आणि वाचणे शिकविले जाईल. जर असे करणे व्यवहार्य नसेल तर सक्षम यंत्रणा संबंधित लोकांशी सल्लामसलत करून हे उद्दिष्ट गाठण्याचा प्रयत्न करील.

(२) संबंधित लोकांना राष्ट्रीय भाषेत किंवा राष्ट्रातील अधिकृत भाषांपैकी एखाद्या भाषेत प्राविण्य मिळविण्याची संधी मिळावी, यासाठी आवश्यक ते उपाय योजले जातील.

(३) संबंधित लोकांच्या मूळ भाषांचे संवर्धन, विकास आणि प्रसार व्हावा यासाठी उपाय योजले जातील.

### कलम - २९

संबंधित लोकांच्या शिक्षणाचे उद्दिष्ट त्यांच्या मुलांना सर्वसामान्य ज्ञान आणि कौशल्ये प्राप्त होऊन त्यांना आपल्या समाजाच्या तसेच राष्ट्रीय समाजाच्या व्यवहारात पूर्णपणे आणि समान पायावर भाग घेता येईल, हे असले पाहिजे.

### कलम - ३०

(१) संबंधित लोकांच्या परंपरा आणि संस्कृती यांच्याशी सुसंगत अशा रीतीने त्यांना त्यांचे हक्क व कर्तव्ये विशेषत: श्रम, आर्थिक संधी, शिक्षण आणि आरोग्य, सामाजिक कल्याण आणि या आचारसंहितेव्दारे त्यांना प्राप्त झालेले हक्क माहीत होतील यासाठी सरकारे आवश्यक ती उपाययोजना करतील

(२) आवश्यकता भासल्यास हे लिखित भाषांतरे आणि संबंधित लोकांच्या भाषेत प्रसार माध्यमांचा उपयोग यांच्या मदतीने केले जाईल.

### कलम - ३१

राष्ट्रीय समाजातील सर्व स्तरातील लोकांना विशेषत: संबंधित लोकांशी प्रत्यक्ष संपर्क येणाऱ्या लोकांना, संबंधित लोकांविषयीचे पूर्वग्रह दूर व्हावे यासाठी शैक्षणिक उपाय योजले जातील. यासाठी इतिहासाच्या

पाठयपुस्तकात आणि इतर शैक्षणिक साहित्यात संबंधित समाजाचे योग्य, अचूक आणि माहितीपूर्ण दर्शन होईल असे प्रयत्न केले जातील.

**भाग ७ : सरहद्दीवरील स्थलांतर**

**कलम - ३२**

(अनेक आदिवासी जमाती विविध राष्ट्रात विभागल्या गेल्या आहेत. त्यादृष्टीने आचारसंहितेत पुढील कलमांचा समावेश करण्यात आला आहे.) सरहद्दीवरील आदिवासी आणि वनवासी लोकातील संपर्क आणि सहकार विशेषत: आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि पर्यावरणीय क्षेत्रातील संपर्क आणि सहकार सुकर करण्याच्या दृष्टीने सरकारे योग्य ते उपाय योजतील. अशा उपायात आंतरराष्ट्रीय करारनाम्यांचाही समावेश असेल.

**भाग ८ : प्रशासन**

**कलम - ३३**

(१) या आचारसंहितेतील कलमांच्या **अंमलबजावणीसाठी** जबाबदार असणारी शासकीय यंत्रणा, संबंधित लोकांवर परिणाम करणारे कार्यक्रम अंमलात आणण्यासाठी योग्य ती यंत्रणा आणि पध्दती निर्माण करील आणि त्याव्दारे सर्व कार्यवाही योग्य रीतीने होईल अशी काळजी घेईल.

(२) अशा कार्यक्रमात पुढील बाबींचा समावेश होईल,

अ. संहितेत समाविष्ट असलेल्या उपायांचे नियोजन, समायोजन, अंमलबजावणी आणि मूल्यमापन हे सर्व संबंधित लोकांच्या सहकार्याने केले जाईल.

ब. लोकांच्या सहकार्याने योजावयाच्या उपायांसाठी आवश्यक ते कायदेकानू आणि इतर योजना **सुचविणे**.भाग ९ : सर्वसाधारण तरतुदी

**कलम - ३४**

या संहितेतील कलमांच्या अंमलबजावणीसाठी त्यांचे स्वरूप आणि व्याप्ती यांचा विचार साचेबंद रीतीने न करता प्रत्येक देशातील वैशिष्ट्यपूर्ण परिस्थिती लक्षात घेऊन, लवचिक पध्दतीने केला जाईल.

**कलम - ३५**

या संहितेतील कलमांच्या आधारे संबंधित लोकांना इतर आचारसंहिता, शिफारसी, आंतरराष्ट्रीय करारनामे, तह किंवा राष्ट्रीय कायदे, निवाडे, चालीरिती किंवा करारनामे यांच्याव्दारे मिळालेले **हक्क व फायदे** नाकारले जाणार नाहीत.

**भाग १० : अंतिम तरतुदी**

**कलम - ३६**

या आचारसंहितेव्दारे १९५७ च्या आदिवासी आणि वनवासी लोकसंख्याविषयक आचारसंहितेत **दुरूस्ती** करण्यात येत आहे

(टीप : पुढे दिलेली कलमे सर्वसाधारणपणे आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेच्या सर्व आचारसंहितेचा **शेवटचा भाग** म्हणून दिलेली असतात. त्यामुळे अनेकदा आचारसंहिता प्रसिध्द करतांना, ती गाळली जातात. मात्र कार्यकर्त्यांच्या माहितीसाठी याही कलमांचा स्वैर अनुवाद पुढे दिला आहे.)

**कलम - ३७**

या आचारसंहितेला सरकारची औपचारिक मंजुरी मिळाल्यास ती आंतरराष्ट्रीय मजूर कार्यालयाच्या डायरेक्टर जनरलकडे नोंदणीसाठी पाठविण्यात येईल.

**कलम - ३८**

(१) आचारसंहिता, ज्यांची मंजुरी डायरेक्टर जनरलकडे नोंदली गेली आहे अशा आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेच्या सभासद देशांवरच बंधनकारक राहील.

(२) आचारसंहिता स्वीकृत झाल्यापासून बारा महिन्याच्या कालावधीत दोन सभासद देशांनी आपली मंजुरी कळविल्यावर अंमलात येईल.

(३) त्यानंतर ही कोणत्याही सभासद देशाने मंजूरीची नोंदणी केल्यानंतर त्या देशावर बारा महिन्याच्या कालावधीनंतर बंधनकारक राहील.

**कलम - ३९**

(१) आचारसंहिता प्रथम अंमलात आल्याच्या तारखेपासून दहा वर्षाच्या कालावधीनंतर ती मंजूर केलेल्या सभासद देशाला मंजुरीला नकार देता येईल. त्यासाठी त्या देशाला नोंदणी केलेल्या आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेच्या

डायरेक्टर जनरलला तसे कळवावे लागेल. असा नकार नोंदणी केल्याच्या तारखेपासूनच्या एक वर्षाच्या कालावधीत अंमलात येणार नाही.

(२) ही संहिता मंजुर केलेल्या सभासद देशाने दहा वर्षानंतरच्या कालावधीत आपला नामंजूरीचा अधिकार न बजावल्यास त्या सभासदावर पुढील दहा वर्षे बंधनकारक राहील. मात्र त्यानंतरच्या दहा वर्षानंतर सभासद देशाला आपला नामंजुरीचा हक्क बजावता येईल.

### कलम - ४०

(१) सभासद देशांनी मंजुरीची नोंदणी किंवा नकार यांची माहिती आंतरराष्ट्रीय मजूर कार्यालयाचे डायरेक्टर जनरल सर्व सभासद संघटनांना देतील.

(२) संघटनेच्या सभासदांना दुसऱ्या मंजुरीची नोंदणी कळवतांना कोणत्या तारखेपासून ही आचारसंहिता अंमलात येईल हे डायरेक्टर जनरल कळवतील. (वर नमूद केल्याप्रमाणे दुसऱ्या देशाने नोंदणी केल्यानंतर आचारसंहिता अंमल सुरू होतो.)

### कलम - ४१

आंतरराष्ट्रीय मजूर कार्यालयाचे डायरेक्टर जनरल युनोच्या चार्टरमधील १०२ कलमानुसार मंजुरीविषयी आणि नकाराविषयी सर्व माहिती युनायटेड नेशन्सच्या सेक्रेटरी जनरलला कळवतील.

### कलम - ४२

आवश्यक वाटेल त्यावेळी आंतरराष्ट्रीय मजूर कार्यालयाची कार्यकारी समिती या आचारसंहितेच्या कारवाईसंबंधीचा अहवाल सर्वसामान्य सभेला सादर करील. आवश्यक वाटल्यास परिषदेच्या विषयपत्रिकेत संहिता पूर्णत: किंवा अंशत: सुधारण्याच्या इष्टतेची शिफारस करील.

### कलम - ४३

(१) परिषदेने ही आचारसंहिता पूर्णत: किंवा अंशत: दुरूस्त करून नवीन आचारसंहिता स्वीकृत केल्यास,नवीन आचारसंहितेत वेगळी तरतूद नसेल तर,

अ. कोणत्याही सभासदाची नवीन आचारसंहिता मंजुरी म्हणजे जुन्या आचारसंहितेला नकार असे मानलेजाईल. या गोष्टीच्या आड कलम ३९ मधील तरतुदी येणार नाहीत.

ब. नवीन आचारसंहिता अंमलात आल्याच्या तारखेनंतर कोणत्याही सभासदाला जुन्या आचारसंहितेला मंजुरी देता येणार नाही.

(२) ज्या देशांनी जुन्या आचारसंहितेला मंजुरी देऊन, तिची नोंदणी केली असेल अशा देशांनी सुधारित आचारसंहितेला मंजुरी न दिल्यास जुनी आचारसंहिता त्याच स्वरूपात बंधनकारक राहील.

### कलम - ४४

या संहितेचे इंग्रजी आणि फ्रेंच भाषेतील मसुदे सारखेच अधिकृत मानले जातील.

# संयुक्त राष्ट्रसंघाच्या आदिवासी लोकसंख्याविषयक कार्यगट

सयुंक्त राष्ट्रसंघाने विविध देशातील लोकांच्या हक्करक्षणासाठी अनेक आचारसंहिता व जाहीरनामे प्रसिध्दकेले आहेत. त्यात मानवी हक्कविषयक सार्वत्रिक सनद ही फार महत्त्वाची मानली जाते. राष्ट्रातीलसमाजाचे घटक म्हणून आदिवासी जमातींनाही वरील आचारसंहितांचा आणि जाहीरनाम्यांचा फायदा मिळतो. परंतु केवळ आदिवासी जमातींसाठी व त्यांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी असा जाहीरनामा नाही. पहिल्या महायुध्दानंतर लीग ऑफ नेशन्स अस्तित्वात आली. त्यावेळेपासून आदिवासी जमातींसाठी खास जाहीरनामा असावा असा आग्रह आदिवासी नेत्यांनी धरला. लीग बरखास्त झाल्यानंतरदुस-या महायुध्दानंतर संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना झाली. त्यानंतरही आदिवासी नेत्यांचे हे प्रयत्न चालू राहिले. सार्वत्रिक मानवी हक्क सनदेच्या अंमलबजावणीची जबाबदारी संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्वसाधारण सभेकडे असते. हे काम मुख्यत: सर्वसाधारण सभेतर्फे इकॉनॉमिक ॲण्ड सोशल कौन्सिल( इकोसॉक) म्हणजे आर्थिक आणि सामाजिक परिषद करते. परिषदेच्या या कामात अनेक आयोग व समित्या सहकार्य देतात. १९४६ मध्ये मानवी हक्क आयोग नावाचा आयोग स्थापन करून त्याच्याकडे मानवी हक्कविषयक बाबींचा विचार व कार्यवाही सोपविण्यात आली. या आयोगात ४३ देशांचे प्रतिनिधी असतात. आयोगाची बैठक दरवर्षी फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात सहा आठवडे चालते. या बैठकीत बिनसरकारी संस्था, सरकारे यांचे म्हणणे ऐकून घेतले जाते तसेच आयोगाने नेमलेल्या इतर समित्या उपसमित्यांकडून आलेल्या अहवालांवर विचार होतो.

१९४७ मध्ये या आयोगाने अल्पसंख्यांक लोकांविरूध्द होणारा पक्षपात टाळावा आणि वांशिक, राष्ट्रीय, धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्यांकांना संरक्षण मिळावे म्हणून एक उपआयोग ( सबकमिशन ) नेमला. या उपआयोगाची बैठक दरवर्षी ऑगस्ट महिन्यात होते. १९७१ मध्ये या उपआयोगाने आदिवासी जमातींच्या परिस्थितीविषयी एक खास अभ्यास करावा. अशी शिफारस केली. ही शिफारस मानवी हक्क आयोगाने आणि इकोसॉकने मान्य केली. त्यानंतर १९७२ मध्ये जे.आर.मार्टीनेझ कोबो यांची खास अभ्यासक म्हणून नेमणूक करण्यात आली. या अभ्यासगटाचा अहवाल उपआयोगाला १९८१ साली सादर करण्यात आला. या उपअभ्यासगटाच्या शिफारशींचा विचार करून इकोसॉकने आदिवासी लोकसंख्याविषयक अभ्यासगट स्थापन करण्यास १९८२ मध्ये अनुमती दिली आणि या पाच सभासद असलेला असा अभ्यासगट १९८२ मध्ये स्थापन झाला. या अभ्यासगटाची पहिली बैठक जुलै १९८५ मध्ये भरली. त्यानंतर दरवर्षी ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यात या गटाची खुली बैठक भरवली जाते. ही बैठक सतत पाच दिवस चालते आणि या बैठकीत आदिवासींना आणि त्यांच्या मित्र कार्यकर्त्यांना आपले म्हणणे मांडता येते. आदिवासींना मुक्त वाव असलेले हे पहिलेच आंतरराष्ट्रीय व्यासपीठ आहे. आपले प्रश्न आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर मांडण्यासाठी अधिकाधिक देशातील आदिवासी या बैठकीत भाग घेतांना आढळतात. त्याशिवाय आदिवासींच्या प्रश्नांचा अभ्यास करणा-या 'सर्व्हायव्हल इंटरनॅशनल' सारख्या संस्थांचे प्रतिनिधीही त्यात भाग घेतात. या समितीकडे आदिवासी लोकांच्या हक्काविषयी प्रमाणनियम ( standards ) बनविण्याचे काम आहे.

कार्यगटाचे काम सुरू करतांनाच आदिवासी लोक म्हणजे कोण, हे निश्चित करण्याचा प्रश्न आला. त्यासाठी कार्यगटाने खास अभ्यासकाने बनवलेली व्याख्या स्वीकारली. या व्याखेप्रमाणे आदिवासी लोकांची ४ प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. १) काही भूप्रदेशांवर आक्रमण करून त्यात वसाहती केल्या गेल्या त्यावेळी तेथे असलेल्या मूळ लोकांचे ते वंशज आहेत. २) त्यांच्या प्रदेशात वस्ती करत असलेल्या सामाजिक गटांपेक्षा ते आपणांस वेगळे समजतात. ३) ते समाजातील सत्ता गाजविणा-या प्रभावी गटात मोडत नाहीत. ४) त्यांची आपले वांशिक वेगळेपण जपण्याची व त्यांची संस्कृती, सामाजिक संस्था आणि कायदेपध्दती यानुसार जगण्याची इच्छा आहे. भारत सरकारने या

व्याख्येवर केलेली टीकाटीप्पणी लक्षात घेण्यासारखी आहे. भारत सरकारच्या मते वरीलपैकी भारतातील आदिवासींना फक्त दोन वैशिष्ट्ये लागू पडतात. एकतर ते भारतातील एकमेव मूळ लोक आहेत असा स्पष्ट पुरावा नाही. दुसरे म्हणजे त्यांच्यावर बिगरआदिवासी अधिकार गाजवतात आणि त्यांना पक्षपातीपणाने वागवतात हे खरे नाही. भारतातील आदिवासी जमातींची वेगळी संस्कृती आहे. त्यांच्या सामाजिक, आर्थिक आणिसांस्कृतिक चालीरिती व परंपरा इतर समाजापेक्षा वेगळया आहेत, हे खरे आहे. त्याचबरोबर आदिवासीजमाती त्यांच्या चालीरिती व परंपरानुसार जगू इच्छितात, हेही खरे आहे. भारतातील अनुसूचित जमातींची यादी करतांना भौगोलिक अलगता, वेगळी संस्कृती, प्राथमिक अवस्थेतील समाजाचीकाही लक्षणे, मुख्य समाजापासून अलग रहाण्याचा स्वभाव आणि आर्थिक मागासलेपण यांचा विचार केला आहे. हे निकष कार्यकारी गटाने स्वीकारलेल्या निकषांहून भिन्न आहेत. त्यामुळे त्यांना भारतातील मूळ लोक समजणे योग्य नाही आणि त्यांचा विचार कार्यगटाच्या अधिकार कक्षेत येत नाही. कार्यगटाच्या बैठकींना वेळोवेळी उपस्थित असलेल्या आदिवासी कार्यकर्त्यांनी आणि आदिवासीत काम करणा-या बिगर आदिवासी कार्यकर्त्यांनी भारताच्या भूमिकेला आपला स्पष्ट विरोध व्यक्त केला. भारतातील आदिवासी जमाती इतर समाजापेक्षा वेगळया आहेत, हे दाखविण्यासाठी त्यांनी भारतसरकारने आदिवासींसाठी आखलेल्या पंचशील नीतीचा उल्लेख केला. भारतातील आदिवासींचे जमीन हस्तांतरण विस्थापन, वनजमीन आणि उपज यावरील हक्कांचा -हास यासारख्या त्यांच्या प्रमुख प्रश्नांचाही या कार्यकर्त्यांनी अशा बैठकीत उल्लेख केला. त्याला सरकारच्या प्रतिनिधींनी उत्तरे ही दिली आणि आपली मूळ भूमिकाच बरोबर आहे, असे प्रतिपादन केले.

कार्यगटाच्या बैठकी चालविण्याची एक विशिष्ट पध्दत आहे. पाच दिवसाच्या बैठकीत प्रत्येक दिवशी भोजनाच्या सुटीपर्यंत आदिवासी समाजात कोणत्या घटना घडत आहेत यांचा आढावा घेतला जातो. कार्यगट कोणत्याही सरकारविरूध्द तक्रारी स्वीकारत नाही. त्यामुळे बैठकीत बोलणा-या कार्यकर्त्याला आपण सरकारविरूध्द तक्रार करीत नसून देशात आदिवासी समाजावर होत असलेल्या अन्यायाची आणि अत्याचाराची माहिती देत आहोत, असे सांगून आपले गा-हाणे सांगतो. अर्थात ब-याच वेळा अशा निवेदनांना सरकारी प्रतिनिधीला उत्तर द्यावे लागते. अनेक सरकारे आंतरराष्ट्रीय लोकमत आपल्या विरूध्द जाऊ नये, अशी काळजी घेतात. त्यामुळे अशा तक्रारींचे काही प्रमाणात तरी निराकरण करण्याचा त्या देशातील सरकार प्रयत्न करते. उदा. तीन वर्षापूर्वी ऑस्ट्रेलियात कैदेत असतांना २८ आदिवासी मरण पावले. याविषयी ऑस्ट्रेलियात झालेल्या प्रतिकूल लोकमताची फारशी पर्वा सरकारने केली नाही. परंतु लागोपाठ दोन वर्षे याचा उल्लेख कार्यगटाच्या बैठकीत झाला त्यानंतर या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी ऑस्ट्रेलियन सरकारने खास आयोग नेमला. बांगला देशात चितगॉंग जिल्हयातील डोंगरी विभागात चकमा आणि इतर जमातींचे आदिवासी रहातात. हे लोक बौध्द आहेत. गेली काही वर्षे बांगला देशचे सैन्य हे आदिवासी विभाग ताब्यात घेऊन, त्यात बिगर आदिवासींची वसाहत करण्याचे प्रयत्न करीत आहे. या अत्याचारांमुळे अनेक आदिवासी निराश्रित म्हणून भारतात आले. या अत्याचारांविरूध्द बांगला देशातील आदिवासी प्रतिनिधीनी आपला आवाज मित्रगटांच्या साहाय्याने उठवितात. बांगला देश सरकार मोठ्या प्रमाणावर परदेशी मदतीवर अवलंबून आहे. त्यामुळे व आंतरराष्ट्रीय लोकमत आपल्याविरूध्द जाऊ नये म्हणून काही प्रमाणात तरी असे अत्याचार कमी होत आहेत.

भोजनानंतरच्या काळात आदिवासीविषयी बनवावयाचे आंतरराष्ट्रीय प्रमाणनियम यावर चर्चा होते. बैठकीस सुरूवातीलाच आदिवासी लोकसंख्या की आदिवासी लोक यापैकी कोणती संज्ञा वापरावी यावर चर्चा झाली. कार्यगटाचे नांव आदिवासी लोकसंख्याविषयक कार्यगट असे असले तरी आदिवासी लोक ही संज्ञा अधिक बरोबर आहे असे कार्यकारी

गटाने मान्य केले. अर्थात या गोष्टीला अनेक सरकारी प्रतिनिधींनी जोरदार आक्षेप घेतले.

आदिवासींचे जमिनी व भूप्रदेश यावरील भूगर्भाखालील खनिजांवरील सामुदायिक हक्क हा एक वादग्रस्तमुद्दा बनला. अनेक सरकारांनी व्यक्तिगत हक्क मान्य करण्यास संमती दिली परंतु सामुदायिक हक्कास मान्यता दिली नाही. कार्यगटाने प्रमाणनियमांचा एक प्रारूप मसुदा तयार केला आहे. या मसुद्याचे स्वैर रूपांतर परिशिष्टात दिले आहे.

यावरून सर्वसाधारणपणे कार्यकारी गट आदिवासीना अनुकूल राहिला आहे, हे दिसून येईल. कार्यकारी गटाने आदिवासी लोकांचे भूमीवरील, भूप्रदेशावरील आणि नैसर्गिक साधनसंपत्तीवरील हक्क मान्य करावेत, असे प्रतिपादन केले आहे. मात्र काही देशातील आदिवासींची मुख्य मागणी असलेल्या स्वयंनिर्णयाच्या अधिकाराविषयी स्पष्ट मत व्यक्त करणे, टाळले आहे. मात्र आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेतील मसुद्यापेक्षा अतिशय वेगळया रीतीने हे प्रतिपादन केले आहे. आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेच्यामसुद्यात आदिवासी लोक ही संज्ञा वापरतांना त्यात लोक या संज्ञेला अभिप्रेत असणा-या आंतरराष्ट्रीय कायदेशीर हक्कांचा समावेश नाही, असे म्हटले आहे. कार्यगटाच्या मसुद्यात या मसुद्यातील कलमांचा फायदा घेऊन आदिवासी लोकांना इतर आंतरराष्ट्रीय करार व कायदेकानू यांच्याव्दारे मिळालेल्या स्वयंनिर्णयाच्या हक्काला बाधा आणता येणार नाही, असे म्हटले आहे. त्याचप्रमाणे मसुद्यात नमूद केलेले हक्क हे किमान आवश्यक हक्क आहेत असेही प्रतिपादन मसुद्यात आहे.

पुढील काही वर्षात या मसुद्याला अंतिम स्वरूप दिले जाईल. त्यानंतर कार्यगट हा मसुदा व आपला अहवाल मानवी हक्क आयोगाला सादर करील. त्यानंतर तो इकोसॉककडे जाऊन युनोच्या सर्वसाधारण सभेकडे पाठविला जाईल. सर्वसाधारण सभेने मंजूर केल्यानंतरच तो एक मान्यताप्राप्त आंतरराष्ट्रीय दस्तऐवज बनेल. या गोष्टींना पुढील ७-८ वर्षेतरी लागतील. मात्र काहीही असले तरी या कार्यगटाच्या स्थापनेमुळे सर्व जगातील आदिवासींना एक आंतरराष्ट्रीय व्यासपीठ मिळाले आहे आणि त्याचा फायदा घेण्याची प्रवृती वाढत आहे, यात शंका नाही.

**पान ४८ वरून**

आदिवासी जमातीचे सभासद कोण आहेत, हे ठरविण्याचा हक्क.

२५. जागतिक स्तरावर मान्य झालेले मानवी हक्क आणि मूलभूत स्वातंत्र्ये यांच्याशी सुसंगत असतील अशा पध्दतीने त्यांच्या समाजाच्या सभासदांच्या व्यक्तिगत जबाबदा-या ठरविण्याचा हक्क.

२६. राज्याच्या सरहद्दीबाहेर असलेल्या त्यांच्या बांधवांशी परंपरागत संपर्क आणि सहकार्य चालू ठेवण्याचा आणि विकसीत करण्याचा हक्क. यात सांस्कृतिक आणि सामाजिक देवाणघेवाण आणि व्यापार यांचा समावेश होईल. असा संपर्क सुकर होण्यासाठी उपाययोजना करण्याची जबाबदारी राज्यावर राहील.

२७. आदिवासी लोकांशी झालेल्या तहांचे आणि इतर करारांचे, सरकारने पालन केले पाहिजे, असा दावा करण्याचा हक्क.

**भाग ६**

२८. राज्ये आणि आदिवासी लोक, गट किंवा व्यक्ती यामधील संघर्ष किंवा वाद आणि खाजगी किंवा सार्वजनिक हक्कभंग, याविषयी दोघांनाही मान्य होईल आणि हे पेचप्रसंग सोडविण्यासाठी योग्ययंत्रणा उभारली जाईल, हे पहाण्याचा आणि त्याद्वारे त्वरित निर्णय घेण्याचा आणि अशा निर्णयप्रक्रियेत भाग घेण्याचा वैयक्तिक आणि सामुदायिक हक्क.

**भाग ७**

२९. जगातील आदिवासी लोकांच्या अस्तित्वासाठी आणि कल्याणासाठी वर नमूद केलेले हक्क किमान प्रमाणनियम म्हणून मानले जातील.

३०. या जाहिरनाम्यात नमूद केलेल्या हक्क आणि स्वातंत्र्ये यांना बाधा येईल अशी कृत्ये करण्याचा कोणत्याही राज्याला, गटाला किंवा व्यक्तीला हक्क प्राप्त होईल अशा रीतीने या जाहीरनाम्यातील कोणत्याही तरतुदीचा अर्थ लावता येणार नाही.

# परिशिष्ट

## आदिवासी लोकांच्या हक्काविषयीच्या जागतिक जाहीरनाम्याचा मसुदा

सयुंक्त राष्ट्रसंघाच्या आदिवासी विषयक कार्यगटाच्या अध्यक्ष इरिका-इरिन डायस यांनी या मसुद्याची पहिली सुधारित प्रत बनविली आहे. या मसुद्याचा स्वैर अनुवाद पुढे दिला आहे,

संयुक्त राष्ट्रसंघाची सर्वसाधारण सभा पुढील गोष्टींची नोंद घेत आहे.

आदिवासी लोक स्वतंत्र आणि समान असून त्यांना प्रचलित आंतरराष्ट्रीय नियमानुसार प्रतिष्ठेने जगण्याचा आणि हक्क उपभोगण्याचा अधिकार आहे. विविध व्यक्तीसमुहांना इतरांपासून वेगळे राहण्याचाआपण वेगळे आहोत असे मानण्याचा आणि वेगळे समजले जाण्याचा हक्क आहे.

लोकांच्या वेगवेगळया गटांनी मानव समाजाच्या विकासाला आणि संस्कृतीला हातभार लावला असून त्यातूनच मानवसमुदायाचा समान वारसा निर्माण झाला आहे.

आदिवासी लोकांचा इतिहास, जीवनविषयक तत्त्वज्ञान, परंपरा, संस्कृती आणि सामाजिक व आर्थिक संरचना यामधून निर्माण झालेले त्यांचे हक्क व वैशिष्टये जतन करण्याची आणि पुढे नेण्याची आवश्यकता आहे. यापैकी बरीच वैशिष्टये जतन करण्याची आणि पुढे नेण्याची आवश्यकता आहे. यापैकी बरीच वैशिष्टये ते परंपरागत वस्ती करीत असलेल्या जमिनींशी निगडीत आहे.

अनेक आदिवासी लोकांना त्यांचे मानवी हक्क आणि मूलभूत **स्वातंत्र्ये** उपभोगता येत नाहीत. त्यांच्याकडे अपुरी जमीन व साधनसामुग्री आहे आणि त्या समाजात दारिद्रय आणि दुर्भिक्ष्य मोठया प्रमाणात आहे. त्यांच्याविरूध्द होणारा विविध प्रकारचा पक्षपात आणि त्यांच्यावरील जबरदस्ती दूर करावी अशी त्यांची मागणी आहे.

वांशिक, सांस्कृतिक, जातीय श्रेष्ठत्व प्रतिपादन करणारी सर्व तत्त्वे आणि चालीरिती कायदेशीर दृष्टया चुकीच्या आहेत. नैतिक दृष्टया निंद्य आहेत आणि सामाजिक दृष्टया अन्यायकारक आहेत.

आदिवासी लोकांना त्यांचे हक्क कोणत्याही प्रकारचा पक्षपात न होता, उपभोगता आले पाहिजेत. आदिवासी समाज, त्यांची संस्कृती आणि परंपरा यांचे जतन करण्याची आवश्यकता आहे. त्यांच्या गरजा, मूल्यपध्दती लक्षात घेऊन त्यांच्या सर्वंकष सहभागाने आणि सल्लामसलतीने त्यांच्या विकासाचे प्रयत्न करणे आवश्यक आहे.

आदिवासी स्त्रिया आणि मुले यांचे हक्क आणि कौशल्ये याकडे खास लक्ष देण्याची आवश्यकता आहे. आदिवासींना शक्य तितक्या जास्तीतजास्त प्रमाणात त्यांच्या व्यवहारांचे व्यवस्थापन करता आले पाहिजे आणि त्याचबरोबर देशातील इतर नागरिकांच्या बरोबरीने राजकीय, आर्थिक आणि सामाजिक हक्क उपभोगता आले पाहिजेत.

आदिवासींना मानवी हक्कविषयक करारनामांच्याव्दारे किंवा आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार स्वयंनिर्णयाचा हक्क मिळत असे. अशा परिस्थितीत या जाहीरनाम्यातील कोणत्याही तरतुदींचा आधार घेऊन, असाहक्क नाकारता येणार नाही.

आदिवासींना लागू पडणाऱ्या सर्व आंतरराष्ट्रीय मानवी हक्कविषयक करारनाम्यांची राज्यांनी योग्य रीतीने अंमलबजावणी करावी असे आवाहन ही सभा करीत आहे. जगाच्या विविध भागातील आदिवासी लोकांच्या परिस्थितीतील भिन्नता लक्षात घेता त्यांच्यासाठी काही किमान प्रमाणनियम असण्याची आवश्यकता आहे, असे या सभेला वाटते.

वरील सर्व गोष्टी लक्षात घेवून आदिवासी लोकांच्या हक्कांविषयी हा जाहीरनामा प्रगट करण्यात येत आहे आणि आदिवासी लोकांच्या सहकार्याने त्याची अंमलबजावणी करण्यासाठी त्वरित आणि प्रभावी उपाय योजावेत, अशी विनंती ही सभा सर्व राज्यांना करीत आहे.

### भाग १-

१. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेत आणि प्रचलित आंतरराष्ट्रीय मानवी हक्क विषयक करारपत्रात एकमतानेमान्य करण्यात आलेल्या सर्व मूलभूत हक्कांचा आणि स्वातंत्र्यांचा पूर्ण आणि

प्रभावी उपभोग घेण्याचा हक्क आणि त्या अनुषंगाने आलेल्या जबाबदा-या पार पाडण्याची कर्तव्ये.

२. इतर सर्व मानवी व्यक्तींबरोबर स्वतंत्र आणि समान राहून प्रतिष्ठेने जगण्याचा हक्क आणि कोणत्याही प्रकारच्या पक्षपाती व्यवहारापासून मुक्त रहाण्याचा हक्क.

### भाग २-

३. स्वतंत्र लोक म्हणून अस्तित्व राखण्याचा सामुदायिक हक्क, वंशहत्येपासून संरक्षण होण्याचा हक्क, त्याचप्रमाणे जीवित, शारिरीक सुरक्षा, स्वातंत्र्य आणि व्यक्तिगत सुरक्षा याबाबतचे व्यक्तिगत हक्क.

४. त्यांची वांशिक आणि सांस्कृतिक वैशिष्टये जतन करण्याचा आणि त्यांचा विकास करण्याचा सामुदायिक हक्क आणि स्वतंत्र अस्तिव टिकविण्याचा हक्क. या हक्कात त्यांना योग्य नावांनी व्यक्तीव गट म्हणून संबोधले जाण्याच्या हक्काचा समावेश आहे.

५. सांस्कृतिक हत्येपासून संरक्षण मिळण्याचा व्यक्तिगत आणि सामुदायिक हक्क. या संरक्षणात विशेषकरून त्यांची वांशिक वैशिष्टये किंवा सांस्कृतिक वेगळेपण यांचा लोप होईल अशा कोणत्याही कृत्याला प्रतिबंध, त्यांचे इतर समाजात कोणत्याही स्वरूपात लादलेले सामीलीकरण, परकी जीवनपध्दती लादली जाणे आणि त्यांची प्रतिष्ठा आणि विविधता याविषयी निंदाजनक प्रचार यांना प्रतिबंध, अशा सर्वांचा समावेश होईल.

६. त्यांचे सांस्कृतिक वेगळेपण आणि परंपरा यांचे जतन करून आपला सांस्कृतिक विकास करण्याचा त्यांचा हक्क. आपल्या संस्कृतिदर्शक उत्खनन झालेल्या जागा, आयुधे, उपकरणे, तंत्रज्ञान आणि कलावस्तू यांचे जतन करण्याचा हक्क आदिवासी लोकांना राहील.

७. उपलब्ध साधनसामुग्री मर्यादेत त्यांचे वेगळेपण जपण्यासाठी आणि त्यांचा विकास होण्यासाठी आवश्यक ते साहाय्य राज्यांकडून मिळविण्याचा हक्क.

८. त्यांच्या धार्मिक चालीरिती आणि उत्सव साजरे करण्याचा, शिकविण्याचा, आणि चालू ठेवण्याचात्यांचा हक्क. या हक्कात, त्यांच्या दफनभूमी आणि पवित्र स्थाने येथे प्रवेशाच्या हक्काचा व त्यांचे जतन करण्याच्या हक्काचा समावेश होईल.

९. त्यांच्या भाषांचे जतन करण्याचा आणि त्यांचा विकास करण्याचा आणि त्यांचा प्रशासनीय, न्यायालयीन, सांस्कृतिक आणि इतर कामात त्यांचा उपयोग करण्याचा हक्क.

१०. सर्व प्रकारचे शिक्षण घेण्याचा हक्क. या हक्कात, मुलांना त्यांच्या भाषेत शिक्षण घेण्याचा हक्क तसेच त्यांची स्वत:ची शिक्षणपध्दती आणि शिक्षणसंस्था निर्माण करण्याचा हक्क, चालविण्याच्या आणि नियंत्रण करण्याच्या हक्कांचा समावेश राहील.

११. विविध सांस्कृतिक गटात माहिती आणि शिक्षण घेण्याचा हक्क. असे करतांना त्यांच्या संस्कृती मधील विविधता आणि प्रतिष्ठा मान्य करून इतर लोकांत त्यांच्याविषयी पूर्वग्रह दूर करण्याचा आणिआदिवासी आणि बिगर आदिवासी लोकांत सामंजस्य आणि सलोख्याचे संबंध प्रस्थापित होण्यासाठी आवश्यक उपाय योजना हे राज्याचे कर्तव्य मानले जाईल.

### भाग ३

१२. परंपरागत त्यांच्या ताब्यात असलेल्या किंवा ते वापरीत असलेल्या जमिनी किंवा साधनसामुग्री यावर मालकी, ताबा आणि वापराचा व्यक्तिगत आणि सामुदायिक हक्क. अशा जमिनी त्यांच्या दडपण मुक्त आणि माहितीवर आधारलेल्या अनुमतीनेच आणि तह किंवा समझोता करून घेता येतील.

१३. त्यांचा जमिनीवरील हक्क, ताबा आणि संरक्षण यासाठी अस्तित्वात असलेल्या त्यांच्या भूधारण पध्दतींना मान्यता मिळण्याचा हक्क.

१४. परंपरागत त्यांच्या ताब्यात असलेल्या किंवा वापरात असलेल्या प्रदेशातील साधनसामुग्रीवरील त्यांचीमालकी व नियंत्रण यांचे संरक्षण होण्यासाठी खास उपाययोजना करण्याचा हक्क. त्या साधनसामुग्रीत त्या प्रदेशातील वनसंपत्ती, पशुपक्षी धन, जलसंपत्ती आणि समुद्रावरील बर्फमय प्रदेश यांचा समावेश होईल.

१५. त्यांची संपत्ती त्यांच्या अनुमतीविरूध्द घेतली गेल्यास अशी जमीन किंवा भूपृष्ठावरील साधनसंपत्ती परत मिळविण्याचा आणि जेथे हे शक्य नसेल तेथे त्यासाठी न्याय आणि योग्य

नुकसानभरपाई मिळविण्याचा हक्क. अशी जमीन आणि साधनसंपत्ती, भूप्रदेशाचा शोध, विनामालकी, पडित किंवा वापरात नसलेल्या जमिनी यासारख्या कारणांवर आधारित असेल तर विशेषकरून हा हक्कप्राप्त राहील. उभयपक्षी मान्य झाल्यास, अशी नुकसानभरपाई त्यांच्याकडे त्यांची पूर्वी मालकी असलेल्या मालमत्तेएवढी आणि किमान तेवढयाच गुणवत्तेच्या आणि कायदेशीर दर्जाच्या जमिन किंवा साधनसामुग्रीच्या स्वरूपात देता येईल.

१६. त्यांच्या पर्यावरणाचे रक्षण करण्याचा हक्क. विशेषत: त्यांच्या परंपरागत वस्त्या, जमिनी, तेथील हवा व पाणी, समुद्रावरील बर्फमय प्रदेश, वन्यप्राणी आणि इतर साधनसामुग्री यांवर, त्यांच्या दडपणमुक्त माहितीवर आधारित अनुमतीशिवाय, विपरीत परिणाम करणा-या किंवा प्रदूषण करणा-या कृत्यांना प्रतिबंध करण्याचा त्यांचा हक्क. अशा कोणत्याही कृत्याबद्दल किंवा घटनेविरूध्दन्याय व योग्य नुकसानभरपाई मिळण्याचा त्यांचा हक्क.

१७. देशी किंवा आंतरराष्ट्रीय कंपन्यांनी मोठे प्रकल्प, विशेषत: नैसर्गिक साधनसंपत्तीशी, खनिजांशी किंवा भूपृष्ठाखालील इतर साधनसंपत्तीशी निगडीत असलेले प्रकल्प सुरू करण्यापूर्वी सरकारशी सल्लामसलत करण्याचा त्यांचा हक्क. तसेच अशा प्रकल्पांचे आर्थिक, सामाजिक, पर्यावरणीय आणि सांस्कृतिक विपरीत परिणाम कमी करण्याच्या दृष्टीने सल्लामसलत करण्याचा हक्क. अशा कोणत्याहीकृत्याबद्दल किंवा त्याच्या विपरीत परिणामाबद्दल न्याय आणि योग्य नुकसानभरपाई दिली जाईल.

## भाग ४

१८. अशा लोकांना त्यांच्या प्रदेशात त्यांची परंपरागत अर्थव्यवस्था आणि जीवनपध्दती जतन करण्याचा आणि विकसित करण्याचा अधिकार राहील. तसेच त्यांच्या पारंपारिक उदरनिर्वाहाच्या पध्दतींचा अवलंबकरण्याचा आणि त्यांचे परंपरागत आर्थिक व्यवहार मुक्तपणे करण्याचा अधिकार राहील. अशा अधिकारात शिकार, गोडया व खा-या पाण्यातील मच्छिमारी, जनावरांचे कळप पाळणे, वनउपज गोळा करणे, शेती आणि वृक्षतोड यांचा समावेश राहील. कोणत्याही परिस्थितीत आदिवासी लोकांपासून त्यांची उदरनिर्वाहाची साधने हिरावून घेता येणार नाहीत. असे झाल्यास त्यांना न्याय वनुकसानभरपाई मिळविण्याचा हक्क राहील.

१९. त्यांच्या अनुमतीने आणि त्यांचे अग्रक्रम अंमलात येतील, अशा रीतीने त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीच्या त्वरीत प्रभावी आणि सतत सुधारणेसाठी खास सरकारी उपाययोजना मिळविण्याचा हक्क.

२०. आरोग्य, घरबांधणी आणि त्यांच्यासाठी असलेले इतर सामाजिक आणि आर्थिक कार्यक्रम ठरविण्याचा, त्यांचे नियोजन व अंमलबजावणी करण्याचा हक्क. असे कार्यक्रम शक्य तितके त्यांच्याच संस्थांच्या मार्फत आखले जातील आणि त्यांची अंमलबजावणी करण्यात येईल.

## भाग ५

२१. राज्याच्या राजकीय, आर्थिक आणि सामाजिक जीवनात इतर नागरिकांच्या बरोबरीने आणि पक्षपात न होता सहभागी होण्याचा हक्क. कायदेव्यवस्था, राजकीय आणि सामाजिक, आर्थिक संस्था यात आपली विशेष वैशिष्टये प्रकट करण्याचा त्यांना हक्क राहील. अशा गोष्टीत त्यांचे कायदे आणि चालीरिती याकडे विशेष लक्ष दिले जाईल.

२२. त्यांचे जीवन आणि भवितव्य यांच्याशी निगडीत अशा सर्व राष्ट्रीय आणि आंतरारष्ट्रीय बाबी याविषयी त्यांनी स्वत: निवडलेल्या प्रतिनिधींच्या व्दारे निर्णय घेण्याच्या आणि अंमलबजावणीच्या बाबतीत राज्यपातळीवरील प्रक्रियेत पूर्णपणे सहभागी होण्याचा हक्क.

२३. त्यांच्या अंतर्गत आणि स्थानिक कारभारात स्वायत्ततेचा सामुदायिक हक्क यात शिक्षण, माहिती प्रसारण, संस्कृती, धर्म, आरोग्य, घरबांधणी, सामाजिक सुरक्षा, पारंपारिक आणि इतर आर्थिक व्यवहार, भूमी आणि साधनसामुग्री यांचे व्यवस्थापन, पर्यावरण नियंत्रण तसेच ही स्वायत्त कामे पार पाडण्यासाठी लागणारा निधी पुरविण्यासाठी अंतर्गत कर, यांचा समावेश राहील.

२४. अशा स्वायत्त संस्थांची घडण ठरविण्याचा, त्यांचे सभासद निवडण्याचा, आणि त्यासाठी

पान ४५ पर पहा

# दलित जाती आणि आदिवासी जमाती यांच्यावर होणा-या अत्याचारांचा प्रतिबंध करण्यासाठी भारत सरकारने केलेला नवा कायदा

**प्रास्ताविक-**

दलित जाती व आदिवासी जमाती यांच्यावर होणा-या सामुदायिक अत्याचारांची संख्या वाढत आहे. अशा अत्याचारांना आळा बसावा म्हणून भारत सरकारने सप्टेंबर १९८९ मध्ये एक नवा कायदा केला आहे. या कायद्याला राष्ट्रपतींनी ११ सप्टेंबर १९८९ रोजी सम्मती दिली आहे आणि तो सरकारजाहीर करेल त्या तारखेपासून अंमलात येईल. कार्यकर्त्यांच्या सोयीसाठी या कायद्याचे मराठी रूपांतर पुढे दिले आहे. मात्र या कायद्याखाली काही कारवाई करावयाची झाल्यास मुळातील इंग्रजी कायदा पाहणे आवश्यक आहे.

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा १९८९

१९८९ चा ३३ क्रमांकाचा कायदा

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्या सभासदांवर होणा-या अत्याचारात्मक गुन्हयांना प्रतिबंध करण्यासाठी, अशा गुन्हयांच्या चौकशीसाठी खास न्यायालये उघडण्याची व्यवस्था करण्यासाठी आणि अशा गुन्हयांना बळी पडलेल्यांच्या मदतीसाठी व पुनर्वसनासाठी आणि त्याच्याशी संबंधीत अशा गोष्टींच्या तरतूदीसाठी केलेला कायदा,

## प्रकरण - १

**प्राथमिक -**

(१) १. या कायद्यास अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा १९८९ असे म्हटले जाईल.

२. या कायद्याची व्याप्ती जम्मू व काश्मीर राज्य सोडून इतर सर्व भारत अशी राहील.

३. केन्द्र सरकारने जाहीरनामा काढून अधिकृत राजपत्रात नमूद केलेल्या तारखेपासून या कायद्याचा अम्मल सुरू होईल.

(२) १. या संदर्भानुसार वेगळा अर्थ लागणा-या बाबी सोडून इतरत्र या कायद्याखाली संज्ञा पुढीलप्रमाणे स्पष्ट मानल्या जातील.

(अ) अत्याचार म्हणजे कलम ३ खाली शिक्षापात्र ठरविण्यात आलेला गुन्हा.

(ब) कोड म्हणजे १९७३ चे क्रिमिनल प्रोसीजर कोड

(क) अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती म्हणजे राज्यघटनेच्या ३६६ व्या कलमाच्या उपकलम २४ आणि २५ यानुसार गणल्या गेलेल्या जाती आणि जमाती.

(ड) खास न्यायालय म्हणजे कलम १४ अन्वये खास न्यायालय म्हणून नमूद केलेले सेशन न्यायालय.

(इ) स्पेशल पब्लिक प्रॉसिक्यूटर म्हणजे कलम १५ मध्ये खास पब्लिक प्रॉसिक्यूटर म्हणून नमूद केलेला पब्लिक प्रॉसिक्यूटर किंवा वकील.

(फ) या कायद्यात वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द आणि उल्लेख यांचा अर्थ इंडियन पब्लिक कोड किंवा क्रिमिनल प्रोसीजर कोड यात दिलेल्या व्याख्यानुसार लावला जाईल.

(२) या कायद्यात एखाद्या कायद्याचा किंवा कायद्यातील एखाद्या तरतूदीचा उल्लेख सदर कायदा किंवा तरतूद अंमलात असलेल्या विभागातील अर्थानुसार मानला जाईल.

## प्रकरण - २

**अत्याचारी गुन्हे -**

(३) (१) अनुसूचित जात किंवा अनुसूचित जमात यांचा सभासद नसलेल्या व्यक्तीने -

१. अनुसूचित जातीच्या किंवा जमातीच्या सभासदास खाण्यास अयोग्य किंवा अपायकारक पदार्थ पिण्याची किंवा खाण्याची सक्ती केल्यास,

२. अनुसूचित जातीच्या किंवा जमातीच्या सभासदास त्रास देण्याच्या, अपाय करण्याच्या किंवा अपमान करण्याच्या उदेद्शाने त्याच्या राहत्या किंवा शेजारच्या परिसरात विष्ठा, घाण वस्तू, मृत जनावर किंवा दुसरी अपायकारक वस्तू टाकल्यास.

३. अनुसूचित जातीच्या किंवा जमातीच्या सभासदाचे कपडे बळजबरीने काढल्यास किंवा त्याची नग्नावस्थेत किंवा तोंडाला किंवा अंगाला रंग फासून धिंड काढल्यास किंवा मानवी प्रतिष्ठेला हानीकारक असे यासारखे कोणतेही कृत्य केल्यास,

४. अनुसूचित जातीच्या किंवा जमातीच्या सभासदाच्या मालकीची किंवा त्याला सक्षम अधिका-याने दिलेली कोणतीही जमीन गैररित्या ताब्यात घेतल्यास किंवा तिची मशागत केल्यास किंवा ती आपल्याकडे हस्तांतरीत केल्यास,

५. अनुसूचित जातीच्या किंवा जमातीच्या सभासदास त्याच्या जमिनीवरून किंवा जागेवरून गैररित्या बेदखल केल्यास किंवा त्याच्या कोणत्याही जमीन, जागा, किंवा पाणी यांच्या त्याच्या उपभोगाच्या अधिकारात ढवळाढवळ केल्यास,

६. अनुसूचित जातीच्या किंवा जमातीच्या सभासदास वेठ किंवा तशा प्रकारच्या सक्तीच्या किंवा बांधीलश्रमाच्या कृती करण्यास भाग पाडल्यास किंवा अमिष दाखविल्यास यात सरकारने सार्वजनिक हितासाठी केलेल्या सक्तीच्या सेवेचा समावेश नाही.

७. अनुसूचित जातीच्या किंवा जमातीच्या सभासदास एका विशिष्ठ उमेदवारास किंवा कायद्याने आखून दिलेल्या पध्दतीशिवाय इतर पध्दतीने मत देण्याची किंवा न देण्याची सक्ती केल्यास किंवा धमकी दिल्यास,

८. अनुसूचित जातीच्या किंवा जमातीच्या सभासदास त्रास देण्याच्या दृष्टीने खोटा व्देषमूलक किंवा त्रासदायक दावा किंवा गुन्हेगारी व इतर कायदेशीर कारवाई केल्यास,

९. कोणत्याही सार्वजनिक कर्मचा-यास खोटी किंवा क्षूद्र माहिती देऊन त्याच्या करवी त्याचे कायदेशीर अधिकार वापरून अनुसूचित जात किंवा जमातीच्या सभासदास इजा किंवा त्रास होईल अशी कृती केल्यास,

१०. सार्वजनिक ठिकाणच्या कोणत्याही जागेत अनुसूचित जातीच्या किंवा जमातीच्या सभासदांचा अपमान करण्याच्या हेतूने केलेला अपमान केल्यास,

११. अनुसूचित जातीच्या किंवा जमातीच्या महिलेविरूध्द तिचा अपमान करण्याच्या हेतूने किंवा तिला लज्जित करण्याच्या हेतूने हल्ला केल्यास किंवा बळ वापरल्यास,

१२. अनुसूचित जात किंवा जमातीच्या महिलेवर वर्चस्व गाजविता येईल, अशा असलेल्या व्यक्तीने आपला अधिकार ती महिला असहाय्य परिस्थितीशिवाय सम्मती देणार नाही अशा त-हेने तिचे लैंगिक शोषण केल्यास,

१३. अनुसूचित जाती किंवा जमाती यांच्या सर्वसाधारण वापरातील झरे, तळे, किंवा इतर कोणत्याही पाणी पुरवठयाचे साधन या मधील पाणी त्याचा सर्वसाधारण वापरासाठी उपयोग होणार नाही अशा रीतीने खराब केल्यास किंवा नासवल्यास,

१४. अनुसूचित जातीच्या किंवा जमातीच्या सभासदाचा सार्वजनिक जागेवरील जाण्यायेण्याच्या वहिवाटीच्या हक्कास बाधा आणल्यास किंवा इतर व्यक्ती उपभोगीत असलेल्या सार्वजनिक विहीराच्या जागी त्याला ती वापरण्यास किंवा तेथे जाण्यास प्रतिबंध केल्यास

१५. अनुसूचित जातीच्या किंवा जमातीच्या सभासदास त्याचे घर, गाव किंवा वस्तीची इतर जागा सोडण्याची सक्ती केल्यास, अशी व्यक्ती सहा महिन्यांपेक्षा कमी नाही पण ५ वर्षापर्यंतच्या मुदतीच्या कैदेची शिक्षा आणि दंड होण्यास पात्र ठरेल.

(३) (२) अनुसूचित जातीचा किंवा जमातीचा सभासद नसलेल्या व्यक्तीने -

१. खोटा पुरावा देऊन किंवा तयार करून अनुसूचित जातीच्या किंवा जमातीच्या व्यक्तीला गंभीर गुन्ह्यासाठी सजा होईल यासाठी प्रयत्न केल्यास अशा व्यक्तीस जन्मठेपेची किंवा दंडाची शिक्षा होईल. अनुसूचित जाती किंवा जमातीच्या निर्दोष सभासदास अशा रीतीने शिक्षा झाल्यास आणि परिणामी त्याला मृत्यूदंड झाल्यास खोटा पुरावा देणा-या किंवा तयार करणा-या व्यक्तीस मृत्यूदंडाची शिक्षा देण्यात येईल.

२. अनुसूचित जातीच्या किंवा जमातीच्या व्यक्तीला मृत्यूदंडाची शिक्षा नसलेल्या परंतु ७ वर्षे किंवा त्याहून अधिक कैदेच्या शिक्षा

असलेल्या गुन्हयात गुंतविण्यासाठी खोटा पुरावा दिल्यास किंवा तयार केल्यास अशा व्यक्तीस सहा महिन्यांपेक्षा कमी नाही परंतु ७ वर्षापर्यंतच्या किंवा अधिक कैदेची शिक्षाआणि दंड होईल.

३. आग किंवा स्फोटक वस्तूच्याव्दारे अनुसूचित जाती किंवा जमातीच्या सभासदाच्या मालमत्तेचे नुकसान केल्यास अशी व्यक्ती सहा महिन्यांपेक्षा कमी नाही परंतु ७ वर्षांपर्यंतच्या मुदतीच्या कैदेस आणि दंडास पात्र होईल.

४. अनुसूचित जाती किंवा जमातीच्या घरास, प्रार्थनास्थळास किंवा त्याची मालमत्ता असलेल्या स्थानास नुकसान होईल अशा उददेशाने आग किंवा स्फोटक पदार्थ वापरल्यास अशी व्यक्ती जन्मठेपेच्या शिक्षेस आणि दंडास पात्र होईल.

५. इंडियन पीनल कोडनुसार दहा वर्षे किंवा अधिक अशी कैदेची शिक्षा असणारा कोणताही गुन्हा अनुसूचित जातीच्या किंवा जमातीच्या व्यक्ती विरूध्द किंवा त्याच्या मालकीच्या मालमत्तेविरूध्द केल्यास अशी व्यक्ती जन्मठेप आणि दंड अशी शिक्षा होण्यास पात्र होईल.

६. या प्रकरणातील गुन्हा घडला आहे असे माहित असून किंवा असा विश्वास ठेवण्यास कारण असून अशा गुन्हेगारास शिक्षा होऊ नये म्हणून पुराव्यात ढवळाढवळ केल्यास किंवा हेतुपुरस्पर खोटी माहिती दिल्यास अशा व्यक्तीस त्या गुन्हयासाठी नमूद केलेली शिक्षा होईल.

७. सार्वजनिक सेवकाने या कलमात नमूद केलेला कोणताही गुन्हा केल्यास तो एक वर्षापेक्षा कमी नाही परंतु त्या गुन्हयासाठी नमूद केलेल्या शिक्षेस पात्र होईल.

(४) अनुसूचित जाती किंवा जमातीचा सभासद नसलेल्या सार्वजनिक सेवकाने प्रस्तुत कायद्यात नमूद केलेल्या कर्तव्यात हेतूपूर्वक निष्काळजीपणा केल्यास त्यास सहा महिन्यांपेक्षा कमी नाही व एक वर्षापर्यंतच्या मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल.

(५) या प्रकरणात नमूद केलेल्या गुन्हयासाठी शिक्षा झालेल्या व्यक्तीने पुन्हा दुसरा गुन्हा किंवा त्यानंतरचा गुन्हा केल्यास त्यास कमीत कमी १ वर्ष व जास्तीतजास्त त्या गुन्हयासाठी नमूद केलेली शिक्षा होईल.

(६) इंडियन पीनल कोड कलम ३४ प्रकरण ३,४,५,५ए, कलम १४९ आणि प्रकरण २३ या मधील तरतुदी प्रस्तुत कायद्याच्या कलमास लागू राहतील.

(७) १. या प्रकरणातील गुन्हयाबद्दल केस झालेल्या व्यक्तीस शिक्षा देताना गुन्हयासाठी नमूद केलेल्या शिक्षेव्यतिरिक्त खास न्यायालय लेखी हुकूमानुसार अशा गुन्हयाच्या कामी वापरलेली कोणतीही स्थावर किंवा जंगम किंवा दोन्ही प्रकारची मालमत्ता सरकार जमा होईल असा आदेश देऊशकेल.

२. या प्रकरणातील गुन्हयाचा आरोप असलेल्या कोणत्याही व्यक्तीची कोणतीही मालमत्ता किंवा सर्व स्थावर जंगम किंवा दोन्हीही केस चालू असलेल्या काळात जप्त करावी असा आदेश खास न्यायालयास देता येईल. केस संपून व्यक्ती दोषी ठरल्यास त्या गुन्हयासाठी झालेल्या दंडाची रक्कम जमा होईल एवढा जप्त झालेल्या मालमत्तेचा भाग त्यासाठी ताब्यात ठेवावा असा हुकूम खास न्यायालय देऊ शकेल.

(८) या प्रकरणात नमूद केलेल्या गुन्हयाच्या कामकाजाच्या कार्यात -

(अ) आरोपीने असा आरोप असलेल्या व्यक्तीस आर्थिक मदत दिल्यास खास न्यायालयाला अशा व्यक्तीने गुन्हयास मदत केली आहे असे गृहित खास कोर्टाला धरता येईल. मात्र असे गृहित धरता येणार नाही असे आरोपीला सिध्द करता येईल.

(ब) व्यक्तीच्या गटाने या प्रकरणात नमूद केलेला गुन्हा केला आहे आणि असा गुन्हा चालू असलेल्याजमिनीविषयक किंवा दुसऱ्या वादाचा परिणाम आहे असे सिध्द झाल्यास सदरहू गुन्हा सर्व सामाजिक हितसंबंध किंवा हेतू यांच्या पूर्तीसाठी केला आहे असे गृहीत धरले जाईल.

(९) १. क्रिमिनल प्रोसीजर कोड किंवा प्रस्तुत कायद्यातील कोणतेही कलम यातील तरतूदी आधार न घेता राज्यसरकारला आवश्यक वाटल्यास आणि प्रस्तुत कायद्यात नमूद केलेले गुन्हे होऊ नयेत म्हणूनव प्रस्तुत कायद्यातील कोणत्याही प्रकरणासाठी किंवा प्रकरणासाठी

अधिकृत राजपत्रात जाहीर करून कोणत्याही जिल्ह्यात किंवा जिल्ह्याच्या भागात पोलीस अधिका-यांना क्रिमीनल प्रोसीजर कोडान्वये मिळालेले अधिकार कोणत्याही दुस-या अधिकारास वापरता येतील असा आदेश देऊ शकेल.

२. प्रस्तुत कायद्याच्या उपकलम १ मध्ये नमूद केलेल्या अधिका-यास या कायद्यातील तरतूदींचे किंवात्यानुसार केलेल्या नियमांचे पालन करण्याच्या कामी सर्व पोलीस व इतर सरकारी सहाय्य करतील.

३. उपकलम १ मध्ये प्राप्त झालेल्या अधिकारांच्या वापराच्या बाबतीत क्रिमीनल प्रोसीजर कोडमधील तरतूदी लागू पडतील.

## प्रकरण ३ -

**हद्दपारी -**

(१०) १. तक्रार किंवा पोलीस रिपोर्ट मिळाल्यावर एखादी व्यक्ती प्रस्तुत कायद्याच्या प्रकरण २ मध्ये नमूद केलेला गुन्हा राज्यघटनेच्या २४४ कलमात उल्लेखलेल्या अनुसूचित विभाग किंवा आदिवासी विभागांच्या हद्दीत करण्याचा संभव आहे असे खास न्यायालयाचे मत झाल्यास त्या न्यायालयाला लेखी आदेश देऊन सदरहू व्यक्तीस त्यांना अशा विभागाच्या हद्दीबाहेर नमूद केलेल्या मार्गाने आणि नमूद केलेल्या काळात जावे असा आदेश देता येईल तसेच त्यास दोन वर्षापेक्षा जास्तनाही अशा आदेशात नमूद केलेल्या मुदतीत त्याने त्या भागात परत येऊ नये असाही आदेश देण्यातयेईल.

२. वरिल उपकलम १ मधील तरतूदीनुसार आदेश देतांना त्या आदेशामागची कारणे खास न्यायालयाला आदेश दिलेल्या व्यक्तीस कळवावे लागतील.

३. असा आदेश दिलेल्या व्यक्तीच्या जबाबानुसार किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या जबाबानुसार असा जबाब आदेश निघालेल्या दिवसानंतरच्या ३० दिवसात मिळाल्यास खास कोर्टाला आपला आदेश रद्द करता येईल किंवा बदल करता येईल.

(११) कलम १० अन्वये हद्दपारीचा आदेश दिलेल्या व्यक्तीने तो आदेश न पाळल्यास किंवा आदेश दिलेल्या विभागातून बाहेर गेल्यानंतर आदेशबंदी असलेल्या काळात त्या विभागात उपकलम २ अन्वये खास कोर्टाची परवानगी न घेता त्या विभागात पुन्हा प्रवेश केल्यास खास कोर्ट त्याला अटक करून न्यायालयाने आदेश दिलेल्या विभागाबाहेरील पोलीस कस्टडीत ठेवावे असा आदेश देऊ शकेल.

२. कलम १० अन्वये आदेश दिलेल्या व्यक्तीस अशा व्यक्तीच्या विनंतीवरून खास न्यायालय लेखी आदेश देऊन अशा व्यक्तीस बंदी केलेल्या विभागात काही अटींवर प्रवेश करण्याची परवानगी देऊ शकेल त्यासाठी अशा व्यक्तींकडून जामीनासहीत किंवा जामीन विरहीत हमीपत्र घेऊ शकेल.

३. खास न्यायालय कोणत्याही वेळी अशी परवानगी रद्द करू शकेल.

४. अशी परवानगी दिलेल्या व्यक्तीस सदरहू परवानगीची मुदत संपल्यानंतर किंवा परवानगी रद्द केल्यानंतर त्या विभागाबाहेर परत जावे लागेल आणि आदेश दिलेल्या मुदतीत नवीन परवानगी मिळाल्याशिवाय परत येता येणार नाही.

५. अशा व्यक्तीने परवानगीसोबत दिलेले निर्बंध न पाळल्यास किंवा परवानगीशिवाय बंदी केलेल्या विभागात प्रवेश केल्यास खास न्यायालय त्याला अटक करून विभागाबाहेरील निर्देशीत ठिकाणी पोलीस कस्टडीत ठेवावे असा आदेश देऊ शकेल.

(१२) १. कलम १० अन्वये हद्दपारीचा आदेश दिलेल्या व्यक्तीची मोजमापे आणि छायाचित्रे पोलीस अधिका-यांनी घ्यावे असा आदेश खास न्यायालय देऊ शकेल.

२. उपकलम १ मध्ये उल्लेखलेल्या व्यक्तीने मोजमापे किंवा छायाचित्रे घेऊ देण्यास विरोध केल्यास त्यासाठी आवश्यक ते सर्व उपाय योजना कायदेशीर ठरेल.

३. उपकलम २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मोजमापे छायाचित्रे घेऊ देण्यास विरोध केल्यास तो इंडियन पीनल कोडच्या १८६ कलमाखाली गुन्हा मानला जाईल.

४. कलम १० अन्वये दिलेला आदेश मागे घेतल्यास उपकलम २ मध्ये नमूद केलेली सर्व मोजमापे आणि छायाचित्रे ( निगेटिव्ह ) नष्ट

केली जातील किंवा त्या व्यक्तीस परत दिली जातील.

(१३) कलम १० अन्वये खास न्यायालयाने दिलेला आदेश मोडणारी व्यक्ती एक वर्षापर्यंत कैद आणि दंड अशा शिक्षेस पात्र होईल.

**प्रकरण ४ -**

**खास न्यायालये -**

(१४) दाव्याचा लवकर निकाल लागण्याच्या हेतूने या कायद्याखाली दावे चालण्यासाठी उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायधीशाच्या संमतीने आणि राजपत्रात जाहीर करून राज्यसरकार प्रत्येक जिल्हयासाठी एखादे सेशन कोर्ट खास न्यायालय म्हणून नेमू शकेल.

(१५) अशा न्यायालयात दावे चालविण्यासाठी राज्यसरकार राजपत्रात जाहीर करून सरकारी वकील किंवा सात वर्षापेक्षा कमी प्रॅक्टीस नसलेला दूसरा वकील खास सरकारी वकील म्हणून नेमू शकेल.

**प्रकरण ५ -**

**संकीर्ण -**

(१६) या कायद्याखालील सामुदायिक दंड व इतर प्रकरणे चालवीत असतांना संदर्भानुसार नागरी हक्क संरक्षण कायदा १९५५ यातील प्रकरण १० ए मधील तरतूदी विचारात घेतल्या जातील.

(१७) १. जिल्हादंडाधिकारी किंवा उपदंडाधिकारी किंवा इतर कोणताही कार्यकारी दंडाधिकारी किंवा जिल्हापोलीस प्रमुखपदाच्या खाली नसलेला कोणताही पोलीस अधिकारी त्याला अनुसूचित जाती किंवा जमातीचे सभासद नसलेली व्यक्ती किंवा व्यक्ती समूह त्याच्या अधिकार क्षेत्राच्या हद्दीत या कायद्यानुसार नमूद केलेला गुन्हा करण्याच्या खटपटीत आहे असे कळले तर तो अधिकारी जरूर ती चौकशी करून त्या विभागात असा गुन्हा होऊ नये व शांतता आणि सुव्यवस्था राहावी यासाठी प्रतिबंधात्मक कारवाई करू शकेल.

२. अशी कारवाई क्रिमिनल प्रोसीजर कोडच्या प्रकरणे ८, १० आणि ११ यातील तरतूदीनुसार केली जाईल.

३. अशा कारवाईसाठी वापरावयाच्या पध्दती राज्यसरकार राजपत्रात जाहीर करून स्पष्ट करू शकेल.

(१८) या कायद्याखालील दाव्यानुसार अटक झालेल्या कोणत्याही व्यक्तीस किंवा आरोपीस क्रिमिनल प्रोसीजर कोडमधील ४३८ कलमामधील तरतूदी लागू होणार नाहीत.

(१९) या कायद्याखाली दोषी ठरलेल्या १८ वर्षावरील कोणत्याही व्यक्तीस क्रिमिनल प्रोसीजर कोडच्या ३६० कलमामधील आणि प्रोबेशन ऑफ ऑफेन्डर्स ॲक्ट १९५८ मधील तरतूदींचा फायदा मिळणार नाही(२०) या कायद्यात नमूद केलेल्या गोष्टी सोडून या कायद्यातील तरतूदींची कारवाई प्रचलीत असलेल्या कोणत्याही कायद्यांशी किंवा वहिवाटीशी विसंगत आहेत अशा कारणावरून गैर लागू ठरणार नाहीत.

(२१) केन्द्र सरकारने बनविलेल्या नियमसंहितेनुसार राज्यसरकार या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक ती उपाययोजना करू शकेल.

(२) अशा उपाययोजनेत पुढील गोष्टींचा समावेश असू शकेल.

१. अत्याचाराला बळी पडलेल्या व्यक्तींना न्याय मिळण्यासाठी कायदेशीर मदत देणे.

२. या कायद्याखालील दावे आणि चौकशी यासाठी साक्षीदारांच्या आणि अत्याचाराला बळी पडलेल्या व्यक्तींच्या प्रवास खर्चाची व राहण्याच्या खर्चाची सोय केली जाईल.

३. अत्याचाराला बळी पडलेल्या व्यक्तींच्या आर्थिक आणि सामाजिक पुनर्वसनाच्या सोई केल्या जातील४. या कायद्यातील गुन्हयांसाठी चौकशी करणा-या अधिकारांची नेमणूक करणे.

५. राज्य सरकारला या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी मदत करू शकतील अशा राज्य सरकारला योग्य वाटेल त्या ठिकाणी समित्या नेमणे.

६. या कायद्यातील तरतूदीचे योग्य पालन व्हावे म्हणून सूचना करण्यासाठी प्रासंगिक पाहाणीची तरतूद केली जाईल.

७. अनुसूचित जाती आणि जमाती यावर अत्याचार होणा-या विभागांची नोंदणी आणि


या जाती जमातींच्या व्यक्तींच्या सुरक्षिततेसाठी उपाय योजना

(३) उपकलम १ नुसार राज्यसरकारांच्या उपाय योजना परस्पर सुसंगत राहाव्यात यासाठी केंद्रसरकार आवश्यक ते उपाय योजील.

(२२) या कायद्यानुसार योग्य बुध्दीने कारवाई केल्यास कोणत्याही व्यक्ती, सरकारी अधिकारी, राज्यसरकार आणि केन्द्र सरकार या विरूध्द दावा किंवा कायदेशीर कृती करता येणार नाही.

(२३) १. या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी जाहीरनामा देऊन केन्द्र सरकार नियम जाहीर करू शकेल.

२. अशा त-हेने जाहीर केलेला कोणताही नियम शक्य तितक्या लवकर संसदेचे सेशन चालू असलेल्या काळात प्रत्येक सभागृहात ३० दिवसांच्या आत सादर केला जाईल. दोन्ही सभागृहांनी अशा नियमात सुधारणा सुचविल्यास असा नियम सुचविलेल्या नियमासहीत अंमलात येईल. संसदेने सुधारलेला नियम किंवा रद्द केलेला नियम सुधारणा सूचविलेल्या किंवा रद्द केलेल्या काळापूर्वी अंमलात आणला गेल्यास ती कृती अवैध मानली जाणार नाही.






**सूची**

| | | |
|---|---|---|
| - अंक पहिला : जानेवारी-मार्च | १९८० | - जबरन जोत जंगल जमीन |
| अंक दुसरा : एप्रिल-जून | १९८० | - आदिवासी व शिक्षण |
| अंक तिसरा : जुलै-संप्टेंबर | १९८० | - आदिवासी व वनसंवर्धन |
| अंक चौथा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८० | - आदिवासी साहित्य व कला |
| अंक पाचवा : जानेवारी-मार्च | १९८१ | - दलितांना सवलती व राखीव जागा माहिती |
| अंक सहावा : एप्रिल-जून | १९८१ | - आदिवासी व आरोग्य |
| अंक सातवा : जुलै-सप्टेंबर | १९८१ | - वनशेती व संवर्धन |
| अंक आठवा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८१ | - रोजगार हमी योजना |
| अंक नववा : जानेवारी-मार्च | १९८२ | - उत्तरा खंड अभ्यास मोहीम |
| अंक दहावा : एप्रिल-जून | १९८२ | - धरणे व विकास |
| अंक अकरा-बारा : जुलै-डिसेंबर | १९८२ | - जंगल व्यवस्थापन |
| अंक तेरावा : जानेवारी-मार्च | १९८३ | - आदिवासी व दारू |
| अंक चौदावा : एप्रिल-जून | १९८३ | - आदिवासींच्या सामाजिक / राजकीय चळवळी |
| अंक पंधरावा : जुलै-सप्टेबंर | १९८३ | - प्रा. सरदार गौरव अंक / आदिवासी साहित्य |
| अंक सोळावा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८३ | - आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न |
| अंक सतरा-अठरा : जानेवारी-जून | १९८४ | - आदिवासीमधील स्वंयसेवी कार्य |
| अंक एकोणिसावा : जुलै-सप्टेंबर | १९८४ | - आदिवासी स्त्री |
| अंक विसावा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८४ | - आदिवासींचे आरोग्य व शिक्षण |
| अंक एकविसावा : जानेवारी-मार्च | १९८५ | - आदिवासी संघटन |
| अंक बाविसावा : एप्रिल-जून | १९८५ | - जमीन हस्तांतर |
| अंक तेविसावा : जुलै-सप्टेंबर | १९८५ | - आदिवासी महिला |
| अंक चोविसावा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८५ | - आदिवासी व सरकार |
| अंक पंचविसावा : जानेवारी-मार्च | १९८६ | - जंगल व धरण |
| अंक सविसावा : एप्रिल-जून | १९८६ | - आदिवासी कला |
| अंक सत्ताविसावा : जुलै-सप्टेंबर | १९८६ | - आदिवासी व वेठबिगारी |
| अंक अठ्ठाविसावा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८६ | - आदिवासीविषयक ग्रंथ मानवशास्त्र परिचय |
| अंक एकोणतिसावा : जानेवारी-मार्च | १९८७ | - भटक्याविमुक्त जमातीचे प्रश्न |
| अंक तिसावा : एप्रिल-जून | १९८७ | - आदिवासी आणि सांस्कृतिक बदल |
| अंक एकतीस - बत्तीस : जुलै - डिसेंबर | १९८७ | राष्ट्रीय वननीतीचा प्रश्न |
| अंक तेहतीस : जानेवारी - मार्च | १९८८ | सवलती अपहरणाची समस्या |
| अंक चौतीस : एप्रील - जून | १९८८ | आदिवासी साहित्य |
| अंक पस्तीस : जुलै - डिसेंबर<br>छत्तीस | १९८८ | आदिवासी समाज व संसकृती |
| अंक सदतीस : जानेवारी - जून<br>अडतीस | १९८९ | डॉ. वेरीर एलवीन विशेषांक |
| अंक एकूणचाळीस : जुलै - डिसेंबर<br>चाळीस | १९८९ | व्यवसाय मार्गदर्शन |
| अंक एकेचाळीस : जानेवारी - जून<br>बेचाळीस | १९९० | म्हाराष्ट्रातील आदिवासींची परिस्थिती |

THE MAHARASHTRA ASSOCIATION OF ANTHROPOLOGICAL SCIENCES

Registered with the Registrar of News Papers of India Under No.35835\80

**महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद**

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन चर्चा व प्रकाशन कार्यकर्त्यांचे शिबिराव्दारे प्रशिक्षण.

शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणा-या कार्यकर्त्यांना एकत्र व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्याबाबत आणि विकासाबाबत सुसंवार घडवून आणणे.

मानव विज्ञान व सामाजिक शास्त्रे यांच्या शिक्षकांना व विचारवंतांना, मुख्यत: आदिवासींबाबत अभ्यासकांना एकत्र आणणे.

मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन प्रकाशन.

या उद्देशांना 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशाने मूर्त स्वरूप म्हणून 'हाकारा' सुरू करण्यात आला आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारून आपणही या कार्यात सहभागी व्हावे.

मानव विज्ञान परिषदेचे सदस्तत्व

आजीव सभासद २५० रूपये

परिषद वार्षिक सभासद २५ रूपये

परिषदेच्या सभासदांना 'हाकारा' विनामूल्य पाठविला जातो. आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपयाखालील पत्यावर 'महाराष्ट्र मानव परिषद' (दि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ ॲन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस) यांचे नावे डिमांड ड्राप्ट अथवा मनीऑर्डरने पाठवावी. मनीऑर्डर करतांना फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नांव व पूर्ण पत्ता लिहिण्यास विसरू नये.

**पत्रव्यवहाराचा पत्ता -:**

रा. के. मुटाटकर, सचिव
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११ ००७.

**आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे.**

हाकारा त्रैमासिकास महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ व भारतीय सामाजिकशास्त्र अनुसंधान परिषद, पश्चिम विभागीय केंद्र यांचेकडून अर्थसहाय्य मिळाले आहे.